सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, १८ जून २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २०० | पाने १२ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



या मातृभूमीचे आपण पुत्र आहोत, या संस्कृतीचे आपण वारस आहोत, या हिंदू संस्कृतीचे आपण घटक आहोत म्हणूनच या देशाशी, या भूमीशी आपण सदैव कृतज्ञ असले पाहिजे. या भूमीचे आणि समाजाचे ऋणी असले पाहिजे. व्यक्तिशः आणि संघटितरीत्या आपल्या सर्वांना हे ऋण फेडावयाचे आहे.

- पद्मविभूषण
स्व. पी. परमेश्वरन्
संस्थापक, भारतीय विचार केंद्र, पूर्व अध्यक्ष विवेकानंद केंद्र

# 'ऑपरेशन टायगर' सुरू

## उबाठा सांसदीय पक्षात फुटीची चर्चा

नवी दिल्ली, १७ जून

उबाठा सांसदीय पक्षात पुन्हा एकदा फूट पडल्याची चर्चा आहे. उबाठाच्या सहा खासदारांनी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना पत्र पाठवत आपल्या गटाला लोकसभेत वेगळा गट म्हणून मान्यता देण्याची मागणी केली असल्याचे समजते. मात्र, याला अधिकृतपणे कुणाकडूनही दुजोरा मिळाला नाही.

ओम बिर्ला यांना पाठवलेल्या पत्रावर उबाठाच्या संजय देशमुख, संजय जाधव. संजय दिना पाटील, नागेश आष्टीकर पाटील, भाऊसाहेब वाकचोरे आणि ओमराजे निंबाळकर या सहा खासदारांच्या स्वाक्षऱ्या असल्याचे सांगितले जाते. मात्र, या गटाकडून असे पत्र मिळाल्याबाबत लोकसभा सचिवालयाकडून दुजोरा मिळाला नाही तसेच या सहा खासदारांपैकी कुणीही याबाबत अधिकृतपणे काही सांगितले नाही.

उबाठाचे लोकसभेत नऊ खासदार होते, त्यातील दोनतृतीयांश म्हणजे सहा खासदारांनी बंडखोरी केल्याचे मानले जाते. यातील संजय देशमुख हे यवतमाळचे, संजय जाधव परभणीचे, नागेश आष्टीकर हिंगोलीचे, भाऊसाहेब वाकचोरे शिर्डीचे, ओमराजे निंबाळकर धाराशिवचे तर संजय दिना पाटील उत्तर पूर्व मुंबईचे खासदार आहेत. त्यामुळे उबाठाकडे आता अनिल देसाई, अरविंद सावंत आणि राजाभाऊ वाजे असे तीनच खासदार उरले आहेत.

शिवसेनेचा हिरकमहोत्सवी स्थापना दिन १९ जूनला असताना उबाठाच्या खासदारांनी उद्धव ठाकरे यांना घरचा अहेर दिला आहे.

विशेष म्हणजे उबाठाचे नेते उद्धव ठाकरे यांनी रविवारी मातोश्रीवर बोलावलेल्या बैठकीला पक्षाचे नऊपैकी फक्त चार खासदार उपस्थित होते, त्याचवेळी शिवसेना सांसदीय पक्षात फूट पडणार असल्याचे संकेत मिळाले होते.

मंगळवारी रात्री सर्व बंडखोर खासदार दिल्लीत दाखल झाल्याची जोरदार चर्चा होती. नंतर शिवसेना सांसदीय पक्षात फूट पडण्याच्या हालचालींना वेग आला.

### नेत्यांनी घेतली बिर्ला यांची भेट

उबाठाचे संजय राऊत, अनिल देसाई आणि अरविंद सावंत यांनी बुधवारी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांची भेट घेतली. शिवसेनेच्या सहा खासदारांनी बुधवारी सकाळी ओम बिर्ला यांना पत्र दिल्याची चर्चा सुरू झाल्यानंतर शिवसेनेच्या या नेत्यांनी बिर्ला यांची भेट घेतल्याचे समजते. बिर्ला यांनी कायदा आणि घटनेनुसार आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी यावेळी या नेत्यांनी केल्याचे समजते.

### राऊतांनी चढवला हल्ला

शिवसेनेच्या सहा खासदारांनी बंडखोरी केल्याच्या चर्चेनंतर शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी बुधवारी सकाळी निवासस्थानी आयोजित पत्रपरिषदेत अपशब्दांचा वापर करीत त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. यावेळी अनिल देसाई, अरविंद सावंत आणि राजाभाऊ वाजे हे उबाठाचे तीनच खासदार उपस्थित होते. त्याचवेळी शिवसेनेत फूट पडली, हे स्पष्ट झाले होते.

रविवारच्या बैठकीत खासदारांनी पक्ष न सोडण्याची शपथ घेतली होती, मात्र त्यांनी आपली शपथ मोडत गद्दारी केली, अशा लोकांना आम्ही सोडणार नाही, असे ते म्हणाले. हे लोक बेईमान आहे, बेईमानी त्यांच्या रक्तात भिनलेली आहे, या शब्दांत संजय राऊत यांनी टीका केली. मी बंडखोरांवर ज्या शब्दांत टीका केली, तेच शब्द वापरा, 'बीप'चा वापर करू नका, माझे वाक्यही कापू नका, ते जसेच्या तसे वापरा असे राऊत म्हणाले.

ज्या खासदारांना जायचे त्यांनी जावे, मात्र आधी खासदारकीचा राजीनामा द्यावा, असे आव्हान देत संजय राऊत म्हणाले की, पक्षाच्या तिकिटावर जे निवडून आले त्यांना जनादेशासाबेत विश्वासघात करण्याचा कोणताही अधिकार नाही. पक्ष सोडण्यासाठी या खासदारांना आर्थिक आमिष दाखवण्यात आले, असा आरोपही त्यांनी केला.

(तभा वृत्तसेवा)



नवी दिल्लीत बुधवारी सकाळी आयोजित पत्रकार परिषदेला उपस्थित उबाठा खासदार संजय राऊत, अरविंद सावंत, अनिल देसाई आणि राजाभाऊ वाजे

### उबाठा सांसदीय पक्षाची आज बैठक

विशेष म्हणजे, शिवसेना उबाठाने गुरुवारी आपल्या सांसदीय पक्षाची बैठक बोलावली आहे. या बैठकीला उपस्थित राहण्याबाबतचा पक्षादेश (व्हीप) बजावण्यात आला असल्याचे उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

# महाराणा प्रताप यांनी केला धर्मासाठी संघर्ष

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

### हल्दिघाट विजयाच्या ४५० व्या वर्धापन दिनानिमित्त जाणिवेचा भव्य संगम



उदयपूर, १७ जून

भारताचा इतिहास हा परकीयांच्या गुलामगिरीचा नसून, तो परकीय आक्रमकांविरुद्ध सातत्याने केलेला संघर्ष, प्रतिकार आणि राष्ट्रीय अभिमानाचा इतिहास आहे. हल्दिघाटीची लढाई ही केवळ दोन सैन्यांतील नव्हती, तर राष्ट्रीय चेतना आणि स्वाभिमान जपण्यासाठी संपूर्ण समाजाने दिलेला एक महान लढा होता, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी बुधवारी केले.

हल्दिघाट येथील विजयाचा ४५० वा वर्धापन दिन आणि वीर महाराणा प्रताप यांची ४८६ वी जयंती साजरी करण्यासाठी 'प्रताप गौरव केंद्र-राष्ट्रीय तीर्थ'च्या वतीने गांधी मैदानावर आयोजित 'राष्ट्र चेतना संकल्प सभे'ला डॉ. मोहनजी भागवत संबोधित करीत होते.

युद्धाच्या विविध टप्प्यांवर मुघल सैन्याला माघार घेण्यास भाग पाडले गेले होते, असे उपलब्ध ऐतिहासिक वृत्तांत, समकालीन साधने आणि खुद्द मुघल इतिहासकारांच्या लेखनातून स्पष्ट होते, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी हल्दिघाटच्या विजयाच्या ४५० व्या वर्धापनदिन सोहळ्याला संबोधित करताना सांगितले. जर संघर्षानंतरही शत्रू भीती आणि असुरक्षिततेच्या छायेत राहिला असेल, तर खरा विजय कोणाचा (शेवटच्या पानावर)

### भारताची शक्ती एकता, आत्मविश्वासात

भारताची शक्ती ही त्याची एकता, सामाजिक समरसता आणि आत्मविश्वास यात सामावलेली आहे. केवळ संकटकाळातच नव्हे, तर सामान्य परिस्थितीतही समाजाने संघटित आणि सतर्क राहिले पाहिजे. स्वाभिमानाची भावना आणि स्वतःच्या अस्मितेची जाणीव जिवंत राहील, तोपर्यंत भारत प्रत्येक आव्हानावर मात करीत विजयाची नवनवीन गाथा लिहीत राहील.

## महत्त्वाचे

### महिला टी-२० विश्वचषक; भारताचा सलग दुसरा विजय

लीड्स : भारताने नेदरलँड्सला ९५ धावांनी पराभूत करून महिला टी-२० विश्वचषकात आपला सलग दुसरा विजय नोंदवला. प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकांत ५ गडी गमावून २०९ धावा केल्या. ही या स्पर्धेतील त्यांची सर्वोच्च धावसंख्या आहे. प्रत्युत्तरात, हेडिंग्ले येथील लीड्स स्टेडियमवर नेदरलँड्सचा संघ १७.३ षटकांत ११४ धावांवर आटोपला. भारताच्या विजयात स्मृती मंधाना आणि शेफाली वर्मा यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी पहिल्या विकेटसाठी ११५ धावांची भागीदारी केली. मंधानाने ७४ आणि शफालीने ५५ धावा केल्या. मंधानाला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. गोलंदाजीत, श्री चरणीने चार तर शफाली वर्मानेही तीन बळी घेतले. शेफालीने दोन चेंडूंमध्ये दोन बळी घेऊन विजय निश्चित केला. भारताने नेदरलँड्सला ९५ धावांनी पराभूत करून महिला टी-२० विश्वचषकात आपला सलग दुसरा विजय नोंदवला. २१० धावांचे लक्ष्य गाठताना नेदरलँड्सचा संघ १७.३ षटकांत ११४ धावांवर सर्वबाद झाला.

(सविस्तर वृत्त पान ६वर...)

### भारताने अफगाणिस्तानला १७० धावांनी हरवले

लखनौ : दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताने अफगाणिस्तानचा १७० धावांनी पराभव केला. या विजयामुळे भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना भारताने ४०२ धावा केल्या. प्रत्युत्तरात अफगाणिस्तानचा डाव ४४.३ षटकांत २३२ धावांवर आटोपला. दरविश रसूली दुखापतग्रस्त होऊन निवृत्त झाला आणि पुन्हा फलंदाजीला आला नाही. कर्णधार शुभमन गिल आणि इशान किशन हे भारताच्या विजयाचे शिल्पकार ठरले. गिलने १५४ धावा आणि इशानने १२५ धावा केल्या. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी २२४ धावांची भागीदारी केली आणि संघाला ४०० धावांच्या पुढे नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. गोलंदाजीमध्ये अर्शदीप सिंग आणि गुरनूर ब्रार यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले. अफगाणिस्तानकडून रहमत शाहने ६१ धावा केल्या, परंतु त्याला दुसऱ्या टोकाकडून पुरेशी साथ मिळाली नाही. भारताने धर्मशाला येथे पहिला एकदिवसीय सामना ७ गडी राखून जिंकला होता आणि आता दुसरा सामना १७० धावांनी जिंकून त्यांनी मालिका आपल्या नावावर केली आहे.

(सविस्तर वृत्त पान ६वर...)

# भारतावर हल्ला झाल्यास अमेरिका पाठीशी

## द्विपक्षीय बैठकीत ट्रम्प यांची ग्वाही, पंतप्रधान मोदींची स्तुती

एव्हियन, १७ जून

फ्रान्समध्ये जी-७ शिखर परिषदेच्या निमित्ताने पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यात द्विपक्षीय बैठक झाली. तब्बल १६ महिन्यांनंतर दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या बैठकीत तंत्रज्ञान, एआय, संरक्षण, उद्योग-व्यापार, जागतिक मुद्यांवर चर्चा झाली. बैठकीनंतर झालेल्या संयुक्त पत्रपरिषदेत ट्रम्प म्हणाले, मोदी पंतप्रधान असताना भारतावर हल्ला झाल्यास अमेरिका मदतीसाठी कायम पाठीशी असेल. भारताच्या सुरक्षेसाठी अमेरिका वचनबद्ध आहे.

मोदी यांची प्रशंसा करीत ट्रम्प म्हणाले की, मोदी कठोरपणे कणखर आणि वाटाघाटीकार आहेत. अमेरिकेच्या लष्करी कारवाईत प्राण गमावलेल्या खलाशांबद्दल मी शोक व्यक्त करतो. हे एक अवघड काम आहे आणि आम्ही त्यावर काम करीत आहोत. पंतप्रधान मोदी सत्तेवर असेपर्यंत जगभरात शांततेसाठी भारत महत्त्वाची भूमिका बजावेल. (वृत्तसंस्था)





जी-७ शिखर परिषदेत पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यात झालेल्या द्विपक्षीय बैठकीनंतर आयोजित संयुक्त पत्रपरिषदेला दोन्ही नेत्यांनी संबोधित केले

### होर्मुझमध्ये मुक्त संचार आवश्यक : पंतप्रधान

पंतप्रधान मोदी म्हणाले, आमच्यात अनेक मद्यांवर चर्चा झाली, त्यातील प्रमुख मुद्दा होर्मुझ जलमार्गातील वाहतूक खुली ठेवणे हा होता. भारतीय खलाशांची सुरक्षा आमच्यासाठी सर्वोच्च महत्त्वाची आहे. इराणसोबतच्या कोणत्याही शांतता करारात खलाशांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही ट्रम्प यांनी दिली आहे. मध्यपूर्वेत शांतता राखण्यासाठी ट्रम्प यांच्याकडून सुरू असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहे. पुरवठा साखळी सुरळीत होणे भारतासह जागतिक अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक आहे.

# विधानपरिषदेसाठी आज मतदान



### ३१ उमेदवार रिंगणात, ११ जागांवर थेट लढत

मुंबई, १७ जून

महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील अकरा जागांसाठी गुरुवारी मतदान होणार आहे. या निवडणुकीत एकूण ३१ उमेदवार रिंगणात असून ७,०४३ मतदार त्यांच्या राजकीय भवितव्याचा निर्णय घेणार आहेत. मतदान प्रक्रिया सकाळी ला ते दुपारी चार या वेळेत पार पडणार आहे, अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

निवडणुकीसाठी एकूण सतरा जागा जाहीर करण्यात आल्या होत्या. मात्र अहिल्यानगर, ठाणे, यवतमाळ, पुणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली या सहा मतदारसंघांमध्ये उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे आता सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी यांच्यात उर्वरित अकरा जागांवर थेट लढत रंगणार आहे. छत्रपती संभाजीनगर, नाशिक, जळगाव, भंडारा-गोंदिया, धाराशिव-लातूर-बीड, सोलापूर, परभणी-हिंगोली, नांदेड, सांगली-सातारा, अमरावती आणि नागपूर या मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे.बहुतांश ठिकाणी तिरंगी लढतीचे चित्र असून, जळगावमध्ये चौरंगी लढत रंगणार आहे. सोलापूर, नागपूर आणि धाराशिव-लातूर-बीड येथे थेट लढती अपेक्षित आहेत. या निवडणुकीची मतमोजणी २२ जून रोजी होणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

(तभा वृत्तसेवा)

### 'या' ठिकाणी महत्त्वाच्या लढती

नाशिकमध्ये शिवसेनेचे नरेंद्र दराडे आणि शरद पवार गटाचे गोरख बोडके यांच्यात चुरशीची लढत होत आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपाचे सुहास शिरसाट, ठाकरे गटाचे गणेश लोखंडे आणि एमआयएम पुरस्कृत इशाक खान संदुखान यांच्यात तिरंगी संघर्ष होण्याची शक्यता आहे. सर्वच राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत बंडखोरी आणि क्रॉस व्होटिंगची भीती वाढली आहे.

# महापालिकेतील दोन कनिष्ठ लिपिक निलंबित

तभा वृत्तसेवा

सोलापूर, दि. १७ जून-

सोलापूर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागातील आप्पाराव गुंडप्पा गोरे आणि जब्बार अ. रहिमान नदाफ या दोन कनिष्ठ श्रेणी लिपिकांवर निष्काळजीपणा व वरिष्ठांच्या आदेशांचे पालन न केल्याप्रकरणी निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी बुधवारी यासंदर्भातील आदेश जारी केले.

त्यांना २८ मे २०२६ रोजी झालेल्या बैठकीत मिळकतदारांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे, नवीन मिळकतींचा शोध घेणे, अपार्टमेंटमधील शिल्लक फ्लॅट व गाळ्यांची आकारणी करणे तसेच दररोज किमान पाच मिळकतींची आकारणी पूर्ण करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच कर निरीक्षक व वसुली लिपिकांना पेठनिहाय उद्दिष्टे निश्चित करून देण्यात आली होती. मात्र, वारंवार सूचना व समज देऊनही संबंधित कर्मचाऱ्यांच्या कामकाजात अपेक्षित सुधारणा झालेली नाही. कार्यालयात बायोमेट्रिक हजेरी नोंदवून प्रत्यक्ष क्षेत्रीय काम न करता कार्यालयातून निघून जाणे, वरिष्ठांच्या आदेशांचे उल्लंघन करणे, निर्धारित उद्दिष्टांची पूर्तता न करणे आणि शासकीय कामकाजात निष्काळजीपणा करणे, अशा बाबी प्रशासनाच्या निदर्शनास आल्या. या प्रकरणात संबंधित कर्मचाऱ्यांनी म हाराष्ट्र नागरी सेवा नियमाचे उल्लंघन केले असून शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित असून सखोल चौकशी करण्यात येणार आहे.

# चौघा मित्रांची एक कोटीची फसवणूक

### जुळे सोलापुरातील म्हाडाची खुली जागा मिळवून दिल्याची थाप

तभा वृत्तसेवा

सोलापूर, दि. १७ जून-

जुळे सोलापूर येथील म्हाडाची खुली जागा मिळवून देतो, अशी थाप मारून १ कोटी ३ लाख ६७ हजार ९६१ रुपये घेऊन चौघा मित्रांची फसवणूक केल्याप्रकरणी येथील एका व्यक्तीविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फसवणुकीची ही घटना ऑक्टोबर २०२४ ते आजतागायत येथील कोटक महिंद्रा बँकेत घडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

काशिनाथ ऊर्फ देवा तुकाराम चिंचोळीकर (रा. जुळे सोलापूर) असे गुन्हा दाखल आरोपीचे नाव असून याबाबत महांतया गुरप्पा हिरेमठ (रा. १३६, जंगम वस्ती, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. या आरोपीने यातील फिर्यादी व मित्र राधेश्याम, अतुल, आदित्य व सुरेश ठाकूर पवार यांना म्हाडा ऑफिस मधील विजय ठाकूर, मंगेश नाईकवाडी, सचिन जाधव यांनी फिर्यादीस म्हाडाची जागा मिळवून दिली आहे. माझे त्या अधिकाऱ्यांशी चांगले संबंध आहेत. मी तुम्हाला ही जुळे सोलापूर येथील म्हाडाची खुली जागा मिळवून देतो, असे सांगुन फिर्यादी व त्यांचे मित्रांचे पत्नीचे नावे असलेल्या बँक खात्यातुन म्हाडा नाव असलेल्या कोटक महिंद्रा बँकेच्या खात्यावर ही रक्कम भरायला लावली. पैसे देऊन दोन वर्ष होत आले तरी आरोपींनी सांगितल्याप्रमाणे प्लॉटही देऊ घातला नाही व घेतलेली रक्कम देखील परत केली नाही.

सहाय्यक पोलिस निरीक्षक कुलकर्णी हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

# देशाच्या ४० टक्के भागात कमी पाऊस

नवी दिल्ली, १७ जून

गेल्या १३ दिवसांत देशाच्या १९ राज्यात मान्सूनचे आगमन झाले असले तरी, प्रत्यक्षात अद्याप ४० टक्के भागात सामान्यापेक्षा कमी पाऊस पडला. उपग्रह चित्रांमध्ये महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान आणि कर्नाटकवर मान्सूनचे ढग नाहीत. या राज्यांमध्ये आकाश निरभ्र असल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने बुधवारी दिली.

देशातील ७२३ जिल्ह्यांपैकी केवळ १०३ जिल्ह्यांमध्येच सामान्य पाऊस झाला आहे. देशाच्या ४० टक्के भागात अजूनही सामान्यपेक्षा कमी पाऊस झाला, याचे मुख्य कारण म्हणजे बंगालच्या उपसागरात मजबूत कमी दाबाचे क्षेत्र तयार न होणे हे असल्याचे हवामान विभागाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. ४ जून रोजी केरळममध्ये दाखल झाल्यानंतर मान्सून १३ दिवसांत १९ राज्यांपर्यंत पोहोचला. गेल्या ७ दिवसांपासून तो तेलंगणात अडकून पडला आहे. यामुळेच छत्तीसगड, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात पावसाला उशीर झाला. बहुतांश भागांत मान्सूनपूर्व पावसाच्या सरी कोसळल्याने तापमानात घट झाली आहे. आठवड्याभरात मान्सून महाराष्ट्रासह उर्वरित राज्यात सक्रिय होईल असा अंदाज आहे.

(वृत्तसंस्था)





### देशात केवळ ३९.७ मिमी पावसाची नोंद

आतापर्यंत देशात ६५.९ मिमी या सरासरी पावसाच्या तुलनेत केवळ ३९.७ मिमी पावसाची नोंद झाली. अनेक प्रमुख राज्यांना पावसाच्या तीव्र टंचाईचा सामना करावा लागत आहे. यात गुजरात ९८ टक्के तूट, महाराष्ट्र ७९ टक्के तूट, मेघालय ८५ टक्के तूट, झारखंड ६६ टक्के तूट, छत्तीसगडमध्ये ६५ टक्के पावसाची तूट आहे.

### मान्सून रेंगाळण्याचे कारण काय?

- वातावरणातील प्रतिकूल आणि मोठ्या प्रमाणावरील बदलांमुळे मान्सूनचा वेग मंदावला
- अरबी समुद्रातून येणारा बाष्पाचा पुरवठा कमकुवत राहिल्याने मान्सूनची उत्तरेकडील वाटचाल ठप्प झाली
- मध्य आणि पश्चिम भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस देणाऱ्या प्रणाली तयार होण्यास अडथळा आणत आहेत.

# खडगेंविरुद्ध विशेषाधिकार उल्लंघनाची नोटीस

नवी दिल्ली, १७ जून

विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात केलेल्या कथित वक्तव्यावरून राज्यसभेत वाद निर्माण झाला आहे. भाजपाच्या सहा खासदारांनी त्यांच्याविरोधात विशेषाधिकार नोटीस दाखल केली आहे. भाजपा खासदारांचा आरोप आहे की, मल्लिकार्जुन खडगे यांनी सभागृहाची प्रतिष्ठा आणि संसदीय परंपरांचे उल्लंघन करून सभागृहात पंतप्रधानांबद्दल अपमानजनक टिप्पणी केली. याच आधारावर ही नोटीस दाखल करण्यात आली आहे.

राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी या नोटीसची दखल घेत पुढील छाननीसाठी हे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे सोपवले आहे. ही समिती या प्रकरणाची चौकशी करून अहवाल अध्यक्षांना सादर करेल. (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### तृणमूल उद्या बाजू मांडणार



**नवी दिल्ली :** ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसमधील फुटीवर आपली बाजू मांडण्यासाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांनी तृणमूल काँग्रेसचे नेते अभिषेक बॅनर्जी यांना शुक्रवारी बैठकीसाठी बोलावले आहे, अशी माहिती संसदीय सूत्रांनी दिली. त्यामुळे अभिषेक १९ जूनला लोकसभा अध्यक्षांसमोर बाजू मांडतील, असे बोलल्या जात आहे.

तृणमूल काँग्रेसच्या २० बंडखोर खासदारांचा गट 'नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया'मध्ये विलीन झाल्यानंतर त्यांनी लोकसभा अध्यक्षांकडे स्वतंत्र गट म्हणून मान्यता देण्याची मागणी केली आहे. या मागणीच्या पार्श्वभूमीवर निर्णय घेण्यापूर्वी दोन्ही गटांचे म्हणणे ऐकून घेण्याचा निर्णय बिरला यांनी घेतला आहे. बंडखोर खासदारांनी यापूर्वीच बिरला यांची भेट घेतली आहे, तर ममता यांच्या गटाने त्यांना भेटण्याची वेळ मागितली होती.

### तात्पुरत्या बंदीविरोधात 'टेलिग्राम' हायकोर्टात

**नवी दिल्ली :** नीट-यूजीच्या २१ जून रोजी होणाऱ्या फेरपरीक्षेपूर्वी लादलेल्या तात्पुरत्या बंदीविरोधात मेसेजिंग अ‍ॅप टेलिग्रामने बुधवारी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्या. तेजस कारिया यांच्या सुटीकालीन खंडपीठासमोर हे प्रकरण दाखल करण्यात आले असून, न्यायालयाने त्यावर तातडीने सुनावणी घेण्याचे मान्य केले आहे. मंगळवारी केंद्र सरकारने केलेल्या कारवाईचा परिणाम १५ कोटींपेक्षा जास्त वापरकर्त्यांवर परिणाम झाला, असा युक्तिवाद टेलिग्रामच्या वकिलाने केला. एनटीएच्या शिफारसींनुसार, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने माहिती तंत्रज्ञान कायदा-२००० च्या कलम ६९ ए अन्वये एक निर्देश जारी केला आहे. यानुसार भारतात टेलिग्राम मंचावरील अ‍ॅक्सेसवर एका निश्चित मर्यादित कालावधीसाठी निर्बंध घालण्यात आला आहे. हा कालावधी २२ जून रोजी संपणार असून, नीट-यूजीची फेरपरीक्षा आणि त्यानंतरच्या तात्काल कालावधीचा यात समावेश आहे.

### ट्रॅक्टर- ई-रिक्षाची धडक, ६ महिलांचा मृत्यू

**बदायूं :** उत्तर प्रदेशातील बदायूं जिल्ह्यात ट्रॅक्टर- ई-रिक्षाच्या धडकेत ६ महिलांचा मृत्यू झाला असून ३ जण गंभीर जखमी आहेत. उझानी कोतवाली परिसरातील बरेली-मथुरा महामार्गावर हा अपघात झाला. लग्नासाठी या महिला जात असताना ई-रिक्षा आणि ट्रॅक्टरची जोरदार धडक झाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदत आणि बचावकार्य सुरू केले. जिल्हा दंडाधिकारी अवनीश राय आणि वरिष्ठ पोलिस अधीक्षक अंकिता शर्मा यांनीही तातडीने घटनास्थळाकडे धाव घेतली. अवनीश राय यांनी सांगितले की, प्राथमिक तपासानुसार ई-रिक्षा चालक एका ट्रॅक्टरपासून वाचवण्याचा प्रयत्न करत असताना त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले.समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या दुसऱ्या ट्रॅक्टरने ई-रिक्षाला जोरदार धडक दिली, ज्यामुळे हा भीषण अपघात घडला. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### जहांगीरला सोडवण्यासाठी पोलिस ठाण्यावर हल्लाबोल

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या फालता परिसरात मंगळवारी मोठा नाट्यमय प्रसंग घडला. तृणमूल काँग्रेसचे बाहुबली नेते जहांगीर खानला पोलिस कोठडीतून सोडवण्यासाठी मोठा जमाव जमला होता. या जमावाचे नेतृत्व जहांगीर खानची पत्नी करत होती. आंदोलक पोलिस ठाण्यावर हल्ला करण्याच्या प्रयत्नात असताना पोलिसांनी समर्थकांवर लाठीचार्ज केला. फालता शातोल कालसा परिसरात जमावाने गोंधळ घालताच पोलिस आणि केंद्रीय दलांनी तात्काळ कारवाईला सुरुवात केली. मोठ्या संख्येने आंदोलक पोलिस ठाण्याच्या दिशेने पुढे सरकत होते. त्यांना रोखण्यासाठी सुरक्षा दलांनी सूत्रे हाती घेतली.

# लोकशाही दृढीकरणात संघाचे मोलाचे योगदान

## रा. स्व. संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांचे प्रतिपादन

**पुणे, १७ जून**

देशाच्या स्वातंत्र्याच्यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य मोठ्या प्रमाणावर विस्तारले नव्हते. आजसारखी लाखो स्वयंसेवकांची शक्ती संघाकडे नव्हती. त्यामुळेच देशाचे विभाजन करण्यात इंग्रज यशस्वी झाले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशभरात घडलेल्या उलथापालथीमध्ये संघावर बंदी घालण्यात आली. या बंदीला संघाने सत्याग्रहाच्या मार्गाने विरोध करून सरकारला माघार घ्यायला भाग पाडले. स्वातंत्र्यानंतर लोकशाहीचे रक्षण करणारी संघ ही पहिली संघटना असून लोकशाही दृढीकरणात संघाचे मोलाचे योगदान आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी केले.




राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी निमित्ताने पत्रकार भवन येथे पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने सुनील आंबेकर यांच्यासोबत वार्तालाप आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील आणि सरचिटणीस मंगेश फल्ले उपस्थित होते. याप्रसंगी पत्रकारांच्या विविध विषयांवरील शंकांचे आंबेकरांनी समाधान केले.

आंबेकर म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेतील भाषणात संविधानाला साम्यवादी आणि मुस्लिम लीगपासून धोका असल्याचे स्पष्टपणे सांगितले होते. आंबेडकर स्वतः संघाचे समर्थक होते. आपल्या हयातीत आंबेडकरांनी कधीही संघावर टीका किंवा पुस्तकातून एकही विरोधी शब्द लिहिला नाही. पुणे आणि कराड येथील संघाच्या कार्यक्रमात त्यांनी आवर्जून उपस्थिती लावली. त्यामुळेच बाबासाहेबांसारखाच संघाने अलगाववाद, नक्षलवाद आणि देशविरोधी शक्तींना कायम विरोध केला.

संघशताब्दी संबंधी माहिती देताना ते म्हणाले की, समाजाचे समर्थन आणि स्वयंसेवकांचे परिश्रम यातून संघ वाढला आहे. सध्या समाजदेखील मोठ्या प्रमाणात संघकार्यामध्ये सहभागी होत आहे. शताब्दी कालखंडात समाजाभिमुख कार्य अधिक वेगाने पुढे नेण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामध्ये वस्तीस्तरावर हिंदू संमेलने झालीत, बुद्धिजीवी नागरिकांसाठी शताब्दी मंथन झाले, सेवा संगम झाले, तसेच सर्व जातीतील प्रतिनिधींसोबत सद्भाव बैठका घेण्यात आल्या.

### धर्मांतरण म्हणण्याऐवजी मतांतरण म्हणायला हवे

देशातील हिंदूंच्या होणाऱ्या धर्मांतरणावर आंबेकर म्हणाले की, धर्मांतरण म्हणण्याऐवजी आपण मतांतर म्हणायला हवे. कारण धर्म हा शब्द कर्तव्याशी संलग्न असतो. देशातील जे मुस्लिम धर्मगुरू आणि ख्रिश्चन मिशनरी मतांतरण करतात, हे बेकायदेशीर आहे. अनेक राज्यांत त्याविरोधात कायदे आहेत. संघाची संमेलने, सद्भाव बैठका यांच्या माध्यमातून संपूर्ण हिंदू समाजाशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू असून मतांतरण थांबवण्याचे काम केले जात आहे.

### युवा पिढी देव, देश आणि धर्माशी जोडलेली

कॉक्रोच पार्टीच्या प्रश्नावर आंबेकर यांनी सांगितले की, आपण लोकशाहीमध्ये असल्याने असे अनेक आवाज उठणारच आहेत. परंतु, आपली लोकशाही मजबूत आहे. त्यामुळे कुणीही आवाज उठवला म्हणून धक्का बसण्याची गरज नाही. आपल्या देशाची युवा पिढी एकमेकांशी आणि कुटुंबाशी जोडलेली असून अत्यंत सकारात्मक आहे. भारतातल्या युवकांना भारत माता की जय आवडते, जय श्रीराम आवडते आणि छावा चित्रपट देखील आवडतो. त्यामुळे नवीन पिढीवर संघाचा पूर्ण विश्वास आहे. ही पिढी देव, देश आणि धर्माशी जोडलेली आहे.

संघाचे सर्व प्रयत्न देशाच्या कानाकोपऱ्यात आणि समाजाच्या सर्व स्तरांत सुरू आहेत.

पत्रकार संघाचे अध्यक्ष पाटील यांनी प्रास्ताविक केले तर सरचिटणीस फल्ले यांनी आभार मानले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, क्षेत्र प्रचार प्रमुख प्रमोद बापट, प्रांत प्रचार प्रमुख अतुल अग्निहोत्री उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

# इराणसोबत शांतता करार अंतिम नाही

## ट्रम्प यांची पुन्हा कोलांटउडी, अटी न पाळल्यास हल्ले करणार

**एव्हियन, १७ जून**

इराणसोबत झालेला करार हा अंतिम नाही, तो केवळ एक सामंजस्य करार आहे, त्यांनी करारातील अटी पाळल्या नाहीतर त्यांच्यावर पुन्हा हल्ले केले जाईल, अशा इशारा देत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी करारावरून पुन्हा कोलांटउडी घेतली.

सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्यापासून इस्त्रायलने ८४ वेळा लेबनॉनमधील युद्धबंदीचे उल्लंघन केल्याचा आरोप इराणने केला. हे हल्ले थांबले नाहीत तर कठोर प्रत्युत्तर दिले जाईल आणि हल्ले थांबविल्याशिवाय करार अंतिम नसल्याचे इराणच्या परराष्ट्र मंत्र्याने स्पष्ट केल्याने ट्रम्प संतप्त झाले. स्वित्झर्लंडमध्ये अमेरिका आणि इराण यांच्यात अधिकृतपणे करारावर स्वाक्षरी होण्याच्या दोन दिवस आधी



फ्रान्समधील जी-७ शिखर परिषदेत इराणच्या परराष्ट्र मंत्र्याच्या टिप्पणीचा समाचार घेताना ट्रम्प म्हणाले, इराणसोबत झालेला करार हा अंतिम नाही. तो एक सामंजस्य करार आहे.

करार आवडला नाही किंवा वर्तन व्यवस्थित नसले तर इराणवर पुन्हा बॉम्बवर्षाव केला जाईल. गेली ४७ वर्षे त्यांचे वर्तन योग्य नव्हते, आम्ही सामंजस्याची भूमिका घेऊन वाटाघाटी केल्या.

कराराच्या मसुद्यात १४ अटींचा समावेश आहे. यापैकी एकाही अटीचे उल्लंघन झाल्यास तत्काळ हल्ले सुरू केले जाईल. होर्मुझ सामुद्रधुनी अगोदरच अंशतः खुली करण्यात आली आहे. येत्या एक ते दोन दिवसात ती पूर्णपणे खुली केली जाईल. (वृत्तसंस्था)

### आम्ही धमक्यांना घाबरत नाही : अराघची

ट्रम्प यांच्या टिप्पणीवर बोलताना इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची म्हणाले, आम्ही कुणाच्याही धमक्यांना भीक घालत नाही. लेबनॉनवरील हल्ले थांबवणे ही करारातील मुख्य अट आहे. त्याची अंमलबजावणी व्हायला हवी. वचनभंग आणि करार मोडीत काढल्याचा इतिहास आम्ही विसरलो नाही. हल्ले झाल्यास सडेतोड प्रत्युत्तर देण्यास आमचे सैन्य सज्ज आहे.

# भारताचे संरक्षण उत्पादन विक्रमी पातळीवर

## संरक्षण क्षमतेत लक्षणीय बदल

**नवी दिल्ली, १७ जून**

संरक्षण उत्पादनात भारताने नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये देशातील एकूण संरक्षण उत्पादन १.७८ लाख कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचले. मागील वर्षी १.५४ लाख कोटी रुपयांच्या तुलनेत यंदाचे उत्पादन १५.६ टक्क्यांनी जास्त आहे.

मागील दशकभरात भारताच्या संरक्षण क्षमतेत मोठा बदल झाला आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये म्हटले. आत्मनिर्भरतेचे व्हिजन, नवीन तंत्रज्ञान आणि स्वदेशी निर्मितीमुळे भारताला बळकटी मिळाली आहे. भारताने जमीन, पाणी आकाशात आपली ताकद वाढवली आहे, असे नरेंद्र मोदी यांनी मागील १२ वर्षांच्या प्रवासाचा उल्लेख करताना सांगितले. राष्ट्रीय सुरक्षेसाठी हा एक मजबूत पाया असल्याचे त्यांनी सांगितले. मागील काही वर्षांच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास संरक्षण उत्पादनात आपण मोठी उसळी घेतल्याचे दिसून येते.

> हा विकास देशातील बळकट होत असलेल्या संरक्षण तंत्रज्ञानाचा पुरावा आहे. सरकारी विभाग आणि खाजगी उद्योगांचे यासाठी कौतुक केले पाहिजे. सरकारी धोरणे आणि खाजगी क्षेत्रातील वाढत्या भागीदारीमुळे येत्या काळात हा वेग आणखीन वाढेल.
>
> **राजनाथसिंह, संरक्षण मंत्री**

# सपाचे २६ खासदार भाजपाच्या संपर्कात

## उपमुख्यमंत्री केशव मौर्य यांचा दावा

**लखनौ, १७ जून**

समाजवादी पक्षाचे २६ खासदार भाजपाच्या संपर्कात आहे आणि ते लवकरच पक्षप्रवेश करतील, असा दावा उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांनी बुधवारी केला.

खासदारांचा अखिलेश यादव यांच्यावर विश्वास राहिलेला नाही, समाजवादीच्या २५ ते २६ खासदारांचा एक गट आमच्या संपर्कात असून, ते लवकरच भाजपात प्रवेश करतील असे मौर्य यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.



२०२७ च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीपर्यंत समाजवादी पक्षातील चित्र बदलेल. उत्तर प्रदेशचे मंत्री मनोज पांडे यांनीही म्हटले की, सत्तेत असताना लोकांना दूर लोटणाऱ्या समाजवादी पक्षासोबत कोणीही राहू इच्छित नाही. राज्य सरकारचे मंत्री ओम प्रकाश राजभर यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, समाजवादी पक्षात मोठी फूट पडणार असून राम गोपाल यादव यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र सादर केले आहे. दुसरीकडे समाजवादी पक्षाने खासदारांच्या फुटीचा दावा फेटाळून लावला. विधानसभेतील विरोधी पक्षनेत्या माता प्रसाद पांडे यांनी म्हटले की, ओम प्रकाश राजभर हे स्वतःच एक घोटाळेबाज आहेत. पक्षाचा एकही नेता भाजपामध्ये सामील होणार नाही आणि २०२७ मध्ये अखिलेश यादव यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन होईल. (तभा वृत्तसेवा)

# पुण्यात ढाकणेची नियुक्ती, कोळवतेची अमरावतीला बदली

**मुंबई, १७ जून**

राज्य शासनाने पोलिस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभागातील काही वरिष्ठ अधिकार्यांच्या बदल्या आणि पदस्थापना जाहीर केल्या आहेत. शासन आदेशानुसार मुंबई येथील पोलिस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभागाच्या उत्तर विभागात कार्यरत असलेले सहायक पोलिस आयुक्त चंद्रकांत ढाकणे यांची सहायक पोलिस आयुक्त (प्रशासन), पोलिस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान (बिनतारी), पुणे या पदावर बदली करण्यात आली आहे. तर, नागपूरचे

पुणे शहरातील पोलिस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभागात कार्यरत असलेले सहायक पोलिस आयुक्त विवेक पवार यांची पिंपरी-चिंचवड येथील पोलिस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग (बिनतारी) येथे बदली करण्यात आली आहे. (तभा वृत्तसेवा)

# जहाल महिला माओवाद्याची कोलकात्यात शरणागती

**कोलकाता, १७ जून**

शकुंतला आणि पुष्पा नावाने वावरणाऱ्या जहाल महिला माओवाद्याने कोलकाता पोलिसांसमोर शरणागती पत्करली, अशी माहिती पोलिस आयुक्त अजयकुमार नंद यांनी बुधवारी दिली. तिने बंदूक आणि ४० काडतुसे ठेवल्याचे त्यांनी सांगितले.

ती मूळची झारग्राम जिल्ह्यातील बेलपहाडीच्या मेचुआची रहिवासी आहे. ती प्रतिबंधित सीपीआय माओवादी पार्टीची दलम् सदस्य होती. माओवादी चळवळीत तिने २०२१ मध्ये प्रवेश केला, असी माहिती नंद यांनी दिली. शकुंतलाने फेब्रुवारीमध्ये शरणागती पत्करली. ती बेलपहाडी येथील असली, तरी तिचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने झारखंडचा भाग होते. तिच्या शिरावर झारखंडमध्ये १० लाख रुपयांचे बक्षीस होते. पश्चिम बंगाल आणि शेजारी राज्यात तिच्यावर चार खटले दाखल आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. पाचवीत असताना ती माओवादी चळवळीत दाखल झाली. ती ओडिशा, झारखंड आणि बिहारमध्ये सक्रिय होती. (वृत्तसंस्था)



मुंबईतील नीता मुकेश अंबानी सांस्कृतिक केंद्रात होणाऱ्या 'अँलॉईड वेबर' यांच्या 'कॅट्स' या संगीत नाटकाच्या प्रयोगापूर्वी देशभरातून आलेले कलाकार तालीम करताना

# आंदोलकांवरील खटले घेणार मागे

## मंत्रिमंडळ उपसमितीची शिफारस

**मुंबई, १७ जून**

राज्यातील धार्मिक, सामाजिक आणि राजकीय आंदोलनांदरम्यान दाखल करण्यात आलेले ४४ खटले मागे घेण्याचा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीने घेतला असून त्याबाबतची शिफारस राज्य सरकारला करण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री तथा उपसमितीचे अध्यक्ष अ‍ॅड. आशिष शेलार यांनी ही माहिती दिली.

राज्यातील विविध आंदोलनांशी संबंधित खटल्यांचा आढावा घेण्यासाठी अ‍ॅड. आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत समितीने पोलिसांकडे प्राप्त झालेल्या १३३ अर्जांचा विचार केला. त्यापैकी ४४ अर्जदारांवरील खटले मागे घेण्याची शिफारस करण्यात आली. यापूर्वी झालेल्या बैठकीत ७७ खटले मागे घेण्यात आले होते.

समितीने १४ अर्जांवर पुनर्विचार करण्याची शिफारस केली असून ही प्रकरणे पोलिस उपायुक्तांच्या अध्यक्षतेखालील क्षेत्रीय समितीसमोर ठेवण्यात येणार आहेत. महिला अत्याचाराशी संबंधित गुन्हे, गंभीर स्वरूपाचे फौजदारी खटले तसेच वैयक्तिक आणि दिवाणी स्वरूपाची प्रकरणे शासनाच्या धोरणानुसार मागे घेता येत नसल्याने अशा प्रकरणांबाबत समितीने स्पष्ट नकार दिला आहे. तसेच आमदार, माजी आमदार, खासदार आणि माजी खासदारांशी संबंधित खटल्यांबाबत शासन निर्णय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार मुंबई उच्च न्यायालयातच अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, आंदोलक तसेच विविध विचारधारात्मक चळवळींमध्ये सहभागी झालेल्या नागरिकांवर अनेकदा आंदोलनांच्या काळात खटले दाखल होतात. अशा अनावश्यक खटल्यांपासून नागरिकांची मुक्तता करणे हे सरकारचे कर्तव्य असल्याचे अ‍ॅड. आशिष शेलार यांनी सांगितले. समितीने मागे घेण्याची शिफारस केलेल्या खटल्यांमध्ये गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी, गोवंश संरक्षण आंदोलन, कामगार आंदोलन तसेच विविध सामाजिक कार्यक्रमांशी संबंधित प्रकरणांचा समावेश आहे. (तभा वृत्तसेवा)

### महाराणा प्रताप यांनी केला धर्मासाठी संघर्ष

(पान १ वरून)

झाला, हे इतिहासच ठरवतो, असे ते म्हणाले.

महाराणा प्रताप यांच्या सैन्याने केलेल्या पहिल्याच हल्ल्यामुळे मुघल सैन्याला बऱ्याच अंतरापर्यंत माघार घ्यावी लागली. मर्यादित संसाधने असूनही चेतकचे असाधारण शौर्य, महाराणा प्रताप यांची युद्धनीती आणि सैनिकांचे उच्च मनोबल यामुळे एका विशाल साम्राज्याच्या सामर्थ्याला आव्हान दिले. महाराणा प्रताप यांच्या सैन्यात केवळ राजघराणे किंवा योद्धा वर्ग नव्हता, तर संपूर्ण समाज सहभागी होता. जात, धर्म, प्रदेश आणि सामाजिक भेदाभेदांच्या सीमा ओलांडून हा समाज देशाच्या रक्षणासाठी एकवटला होता, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले.

भारतीय समाजाने कधीही स्वेच्छेने पारतंत्र्य स्वीकारले नाही. जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमकांनी या भूमीवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा-तेव्हा प्रतिकाराची ज्वाला प्रज्वलित झाली, असे डॉ. मोहनजी भागवत म्हणाले. कोणत्याही आक्रमकाला भारताचा आत्मा पराभूत करणे अशक्य होते, असे त्यांनी बाप्पा रावळ, ललितादित्य, महाराणा प्रताप आणि इतर वीरांचा उल्लेख करताना सांगितले.

इतिहास अनेकदा सत्तेच्या वर्तुळातील लोकांच्या दृष्टिकोनातून मांडला गेला आहे. त्यामुळे अनेक राष्ट्रीय नायकांच्या योगदानाला योग्य ती मान्यता मिळाली नाही. तसेच हल्दिघाटीच्या युद्धाशी संबंधित तथ्यांचे पुनर्परीक्षण करणेही आवश्यक आहे. आज देशभरात महाराणा प्रताप यांची जयंती ज्या आदरभावाने आणि सन्मानाने साजरी केली जात आहे, तोच या गोष्टीचा सर्वांत मोठा पुरावा आहे की, राष्ट्र आपल्या खऱ्या नायकांना कधीच विसरत नाही, असे डॉ. मोहनजी भागवत म्हणाले. जगात कुठेही अकबराची जयंती साजरी केली जात नाही, उलट महाराणा प्रताप यांना आजही जनसामान्यांकडून आदराने स्मरले जाते. विजय कुणाचा झाला, हे इतिहासाचा हाच निर्णय स्पष्ट करतो. महाराणा प्रताप यांना उगाचच हिंदूंचा सूर्य म्हटले जात नव्हते. त्यांनी आपल्या श्रद्धा, संस्कृती, स्वाभिमान आणि राष्ट्रहितासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचे जीवन हे सत्तेच्या लालसेचे नव्हे, तर जनहित, आदर्श शासन आणि राष्ट्रीय अस्मितेच्या जतनाचे उदाहरण आहे. त्यांनी भावी पिढ्यांसमोर असा एक आदर्श निर्माण केला, जो आजही राष्ट्राच्या जीवनाला प्रेरणा देत आहे, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले.

**महाराणा प्रतापांच्या जीवनातून प्रेरणा घ्यावी**

महाराणा प्रताप यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन सर्व नागरिकांनी राष्ट्रोत्थान, सामाजिक संघटना आणि विश्व कल्याणासाठी कार्य करण्याचा संकल्प केला पाहिजे. भारताचा उत्कर्ष जागतिक कल्याणाचा मार्ग प्रशस्त करतो आणि या दिशेने कार्य करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# ठाकरेंना गळती लागताच पवारांच्या तंबूत भीती

## 'ऑपरेशन टायगर'चा इम्पॅक्ट, 'तुतारी' वाचविण्यासाठी हालचाली

**मुंबई, १७ जून**

उद्धव ठाकरे यांच्या उरल्यासुरल्या शिवसेनेत 'ऑपरेशन टायगर'मुळे मोठा राजकीय भूकंप झाला आहे. ठाकरेंचे तब्बल सहा खासदार बंडाचे निशाण फडकवत दिल्लीत दाखल झाल्याने आणि थेट लोकसभा अध्यक्षांकडे धाव घेतल्याने महाविकास आघाडीत मोठी खळबळ उडाली आहे. ठाकरेंची अवस्था पाहून आता शरद पवार गटाचेही धाबे दणाणले असून शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने तातडीने 'डॅमेज कंट्रोल' सुरू केले आहे.

ठाकरे गटाच्या खासदारांनी अचानक दिल्लीची वाट धरल्याने राजकीय वर्तुळात आता पवारांच्या पक्षातील संभाव्य फुटीची जोरदार कुजबूज सुरू झाली आहे. परिणामी




खडबडून जाग्या झालेल्या शरद पवार गटाने आपल्या सर्व आठही खासदारांशी तातडीने संपर्क मोहीम हाती घेतली आहे. पक्षातील कुणीही खासदार दुसऱ्या गळाला लागू नये आणि त्यांची निष्ठा डळमळू नये, यासाठी पक्षाचे वरिष्ठ नेते 'फिल्डिंग' लावून बसले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संभाव्य पडझड रोखण्यासाठी शरद पवार गटाकडून येत्या काही दिवसांतच या सर्व खासदारांची एक 'तातडीची आणि अत्यंत गुप्त' बैठक बोलावण्यात येणार आहे.

### या खासदारांवर पवारांचे 'खास लक्ष'

शरद पवारांनी आता 'वेट अँड वॉच'ची मवाळ भूमिका सोडून थेट 'अक्शन मोड' स्वीकारला आहे. पक्षाच्या सुप्रिया सुळे वगळता अमर काळे (वर्धा), भास्कर भगरे( दिंडोरी), सुरेश ऊर्फ बाळ्या मामा म्हात्रे (भिवंडी), नीलेश लंके(अहमदनगर), डॉ. अमोल कोल्हे(शिरूर), धैर्यशील मोहिते-पाटील(माढा) आणि बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांच्यावर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### ट्रम्प यांच्यावरील हल्ल्याचा कट उधळला

**वॉशिंग्टन, १७ जून**

अमेरिकेच्या फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन (एफबीआय) ने व्हाईट हाऊसमध्ये आयोजित अल्टिमेट फायटिंग चॅम्पियनशिप (यूएफसी) च्या कार्यक्रमात राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर हल्ला करण्याचा कट उधळून लावत पाच जणांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून अत्याधुनिक शस्त्रे जप्त करण्यात आली. तपासात ड्रोन आणि स्नायपर हल्ल्याची कथित योजना उघड झाली आहे. या प्रकरणात पाच संशयितांना अटक करण्यात आली आहे, तर २३ लोकांच्या नेटवर्कचा तपास सुरू आहे. गेल्या रविवारी व्हाईट हाऊस परिसरात यूएफसी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्याला ट्रम्प, त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी आणि विशेष पाहुणे उपस्थित होते. (वृत्तसंस्था)

# खलाशांची सुरक्षितता आंतरराष्ट्रीय जबाबदारी

**| जी-७ शिखर परिषदेत पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन**
**| मध्यपूर्वेतील संघर्षात भारतीयांनी गमावले प्राण**
**| सागरी मार्गातील असुरक्षा अर्थव्यवस्थेसाठी धोकादायक**



फ्रान्समधील जी-७ परिषदेच्या बैठकीत उपस्थित पंतप्रधान नरेंद्र मोदी, डोनाल्ड ट्रम्प, इतर सदस्य देशांचे नेते

**एव्हियन, १७ जून**

मध्यपूर्वेतील सध्याच्या तणावामुळे सागरी मार्गातील असुरक्षा अधिक गंभीर बनली आहे. व्यापारातील व्यत्ययामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला आहे. सागरी मार्गांची सुरक्षा आणि खलाशांची सुरक्षितता ही आंतरराष्ट्रीय जबाबदारी आहे, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक समुदायाला सुनावले. फ्रान्समधील जी-७ परिषदेला ते संबोधित करीत होते. विशेष म्हणजे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या उपस्थितीतच मोदी यांनी जलमार्गातील सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला.

गेल्या आठवड्यात भारतीय खलाशी असलेल्या जहाजांवर अमेरिकेच्या सैन्याने केलेल्या हल्ल्याचा उल्लेख करताना मोदी म्हणाले, होर्मुझच्या सामुद्रधुनीतील सागरी व्यापारातील व्यत्ययामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. जलमार्गात झालेल्या हल्ल्यात निष्पाप भारतीय खलाशांना जीव गमवावा लागला. खलाशांची सुरक्षितता ही आंतरराष्ट्रीय जबाबदारी असून, जहाजांवर हल्ले करणे आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन आहे. अलीकडील संघर्षामुळे या प्रदेशातील अनेक मित्र देशांचे जीवित आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले. पश्चिम आशियात शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरू असताना सागरी मार्ग सुरक्षित राहतील आणि खलाशी निर्भयपणे काम करू शकतील हे सुनिश्चित व्हायला हवे. जागतिक व्यवस्थेतील सर्वात मोठे आव्हान विश्वासाचे आहे आणि तणावाच्या परिस्थितीत विश्वासावर आघात होणे गंभीर बाब आहे. कोणत्याही देशाची ऊर्जा सुरक्षा, अन्न सुरक्षा, आरोग्य सुरक्षा, सायबर सुरक्षा आणि आर्थिक समृद्धी आता केवळ त्याच्या सीमांपुरती मर्यादित राहिलेली नाही. यशस्वी भागीदारी केवळ विश्वास आणि भरवशाच्या पायावरच उभारली जाऊ शकते, असेही पंतप्रधान म्हणाले.

**पुरवठा साखळीचा शस्त्रासारखा वापर**

तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळीचा शस्त्रासारखा वापर होणे योग्य नाही. विकासाच्या संधी काही मोजक्या देशांपुरत्या मर्यादित राहणार नाहीत, असा विश्वास असायला हवा. कोराना महामारीचा संदर्भ देत मोदी म्हणाले, या संकटाने जागतिक एकजुटीतील कमकुवतपणा उघड केला आहे. अनेक पिढ्यांच्या योगदानातून दशकांमध्ये निर्माण झालेला विश्वास आता कमकुवत होत आहे, असे मोदी म्हणाले.

**जगात संसाधनांची नव्हे विश्वासाची कमतरता**

आज जगात संसाधनांची नव्हे विश्वासाची कमतरता आहे. कोणतीही भागीदारी आदरावर आधारित असावी, परावलंबनावर नव्हे. भारताने नेहमीच मानवतेला प्रथम स्थान देण्याचा दृष्टिकोन स्वीकारला आहे. (वृत्तसंस्था)

### सर्वांचे कल्याण, सर्वांच्या सुखाला हवे प्राधान्य

जागतिक अस्थिरता आणि संघर्षाच्या काळात सर्व देशांनी मानवतेच्या कल्याणासाठी एकत्र काम करायला हवे. जगाने केवळ आर्थिक वाढच नव्हे, तर सर्वांसाठी समृद्धी आणि सर्वसमावेशक विकास सुनिश्चित केला पाहिजे. सर्वांचे कल्याण आणि सर्वांचे सुख याला प्राधान्य देणे गरजेचे आहे. जागतिक दक्षिणेकडील देशांना केवळ मदतीची नव्हे, तर भागीदारीची गरज आहे. जगाने व्यवहारिक संबंधांच्या पलीकडे जाऊन एकता आणि समानतेवर आधारित भागीदारीकडे वाटचाल केली पाहिजे. ■

## गोवा पोलिस अधीक्षक निलंबित

**पणजी, १७ जून**



पोर्तुगालमध्ये जन्म आणि विवाहाची नोंदणी केल्याच्या तक्रारीनंतर सुमारे १२ वर्षांनी गोव्याच्या दक्षता विभागाने पोलिस अधीक्षक (दहशतवादविरोधी पथक) एडविन कोलाको यांना निलंबित केले आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. दक्षता विभागाचे संचालक अमरसेन राणे यांनी सांगितले की, कोलाको यांना मंगळवारी निलंबित करण्यात आले होते आणि त्यांना औपचारिक आदेश जारी करण्यात आला होता. त्यांच्यावर पणजी पोलिसांनी २०१४ मध्ये एक गुन्हा दाखल केला होता. त्यात कोलाको यांच्यावर २००८ ते २०१० दरम्यान जन्म आणि विवाहाची नोंदणी करण्यासाठी पोर्तुगालला भेट दिल्याचा आरोप होता. याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध चौकशी सुरू करण्यात आली होती. (वृत्तसंस्था)

# इराणसोबतचा करार अमेरिकेचा पराभव

**आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचा दावा, युद्धातून बाहेर पडण्यासाठी निवडला मार्ग**



**वॉशिंग्टन, १७ जून**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प इराणसोबतच्या शांतता करार राजनैतिक विजय असल्याचे सांगत स्वतःची पाठ थोपटत असताना अमेरिकेतील थिंक टॅंकने या करारावर प्रश्न उपस्थित केले आहे. युद्धातून बाहेर पडण्यासाठी ट्रम्प यांच्यावर करार करण्याची नामुष्की आली आणि हा करार प्रत्यक्षात अमेरिका आणि ट्रम्प प्रशासनाचे धोरणात्मक अपयश असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचा एक मोठा वर्ग याला अमेरिकेचा विजय मानत नाही, उलट या कराराकडे अमेरिकेने युद्धातून बाहेर पडण्याचा केलेला प्रयत्न म्हणून पाहतो. अनेक तज्ज्ञांचा विश्वास आहे की हा करार प्रत्यक्षात अमेरिका आणि ट्रम्प प्रशासनाचे धोरणात्मक अपयश उघड करतो. शिकागो विद्यापीठाचे प्राध्यापक रॉबर्ट ए. पेप यांनी या कराराला एक विनाशकारी धोरणात्मक पराभव म्हटले आहे. एक्सवरील पोस्टमध्ये त्यांनी म्हटले की, अमेरिका अशा सापळ्यात अडकली आहे, जिथे युद्ध वाढवणे कठीण आहे आणि माघार घेणे तर त्याहूनही कठीण आहे. दीर्घ संघर्ष, अब्जावधी डॉलर्सचा लष्करी खर्च, जागतिक ऊर्जा पुरवठ्यावरील परिणाम, आखाती प्रदेशातील सागरी व्यापारात झालेला व्यत्यय आणि अमेरिकेतील वाढता संतापामुळे करार करावा लागला. (वृत्तसंस्था)

### विजय की सक्ती?

ट्रम्प प्रशासन या कराराला प्रादेशिक युद्ध टाळण्यात आणि इराणच्या अणुकार्यक्रमावर नियंत्रण मिळवण्यात एक मोठे यश मानत आहे. तथापि, आंतरराष्ट्रीय समुदायाचा एक मोठा वर्ग याकडे एक तडजोड म्हणून पाहतो. इराणने अमेरिकेच्या दबावापुढे झुकण्यास नकार दिला. यामुळेच, ट्रम्प यांना वाटाघाटीचा मार्ग निवडावा लागला. हा खरोखरच अमेरिकेचा विजय आहे की एका महागड्या आणि वादग्रस्त युद्धातून बाहेर पडण्याचा केवळ एक मार्ग आहे, हा प्रश्न जागतिक चर्चेत कायम आहे.

# मोदींची यूएईच्या राष्ट्रपतींसोबत चर्चा

**पश्चिम आशियातील परिस्थिती केंद्रस्थानी**

**एव्हियन-ले-बेन्स, १७ जून**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संयुक्त अरब अमिरातचे (यूएई) राष्ट्रपती शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्यासोबत पश्चिम आशियातील परिस्थितीवर चर्चा केली तसेच या प्रदेशात दीर्घकालीन शांतता, सुरक्षा आणि स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी संवाद, मुत्सद्देगिरी आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर या महत्त्वाच्या या गोष्टींवर त्यांनी भर दिला.

पूर्व फ्रान्समधील एव्हियन-ले-बेन्स येथील जी-७ शिखर परिषदेच्या पृष्ठभूमीवर या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. यूएईच्या राष्ट्रपतींसोबत अतिशय सौहार्दपूर्ण वातावरणात चर्चा झाली. या वेळी आम्ही विविध क्षेत्रांतील द्विपक्षीय मुद्दे आणि भारत-यूएईतील सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीला अधिक गतिमान करण्याच्या मार्गांवर चर्चा केली, असे नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले.

द्विपक्षीय सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी आणखी बळकट करण्याच्या उपाययोजनांचा दोन्ही नेत्यांनी आढावा घेतला आणि पश्चिम आशियातील शांतता, सुरक्षा व स्थैर्याबाबत विचार-विनिमय केला, असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

बैठकीदरम्यान मोदींनी पश्चि आशियाई प्रदेशात दीर्घकालीन शांतात, सुरक्षा आणि स्थिरता प्रस्थापित करण्यासाठी संवाद, मुत्सद्देगिरी आणि आंतरराष्ट्रीय कायदा, सार्वभौमत्व व प्रादेशिक अखंडतेचा आदर करण्याच्या महत्त्वावर भर दिला. दोन्ही बाजूंनी होर्मुझच्या सामुद्रीधुनीतून मुक्त, सुरक्षित आणि विनाअडथळा जहाजांची वाहतूक व व्यापार सुरू ठेवण्याचे आवाहन केले, असे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने निवेदनात म्हटले. (वृत्तसंस्था)

### द्विपक्षीय सहकार्याच्या प्रगतीचा आढावा

यूएईच्या राष्ट्रपतींची जानेवारीतील भारत भेट आणि मोदींची यावर्षी मे महिन्यातील यूएईच्या भेटीनंतर तंत्रज्ञान, व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा आणि संरक्षण यासारख्या क्षेत्रांतील द्विपक्षीय सहकार्याच्या प्रगतीचा आढावा नरेंद्र मोदी आणि अल नाहयान यांनी घेतला.


## चित्रपट वार्ता

### योग्य कथानकानंतरच 'गदर-३'



**मुंबई :** दिग्दर्शक अनिल शर्मा यांनी 'गदर-३' बद्दल चित्रपटावर काम सुरू आहे, परंतु यावेळी त्यांना कोणतीही घाई नाही, असे सांगितले. तिसऱ्या भागाची कथा पहिल्या दोन्ही भागांपेक्षा अधिक प्रभावी असावी, असे त्यांचे म्हणणे आहे. अनिल यांनी आपली विचारसरणी मनोरंजक पद्धतीने समजावून सांगताना जर 'गदर' एक बॉम्ब होता आणि 'गदर २' अणुबॉम्ब, तर 'गदर-३' 'न्यूक्लियर बॉम्ब' सारखी कथा मिळाल्यावर तयार सोईल असे त्यांनी म्हटले. दिग्दर्शकानुसार, सध्याचे उद्दिष्ट २०२७ मध्ये चित्रपटाला फ्लोअरवर आणण्याचे आहे, परंतु हे पूर्णपणे स्क्रिप्टवर अवलंबून असेल. अभिनेता नाना पाटेकर यांच्यासोबत चित्रपटाबद्दल चर्चा झाली आहे. सध्या अनिल आपला मुलगा उत्कर्षसोबत त्यांच्या सध्याच्या 'अर्जुन नागा' या चित्रपटावर लक्ष केंद्रित करत आहेत. यानंतर 'गदर ३' बद्दल घोषणा समोर येऊ शकते. ■

### अंबानीकडून रिहानाला डायमंड ब्रेसलेट भेट



**मुंबई :** पॉप स्टार रिहानाला मुकेश अंबानी कुटुंबाने एक डायमंड टेनिस ब्रेसलेट भेट दिले आहे. याची किंमत सुमारे २.२ कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. रिहानाने समाज माध्यमावर समोर आलेल्या एका व्हिडीओमध्ये हे ब्रेसलेट दाखवले आणि हे तिला भारतात अंबानी कुटुंबाकडून मिळाले आहे, असे स्पष्ट केले. रिहाना एप्रिलमध्ये तिच्या ब्युटी ब्रँडच्या कामासाठी मुंबईला आली होती. तिथे तिने अँटिलियामध्ये अंबानी कुटुंबाची भेट घेतली होती. व्हिडीओमध्ये रिहानाने आपला हात कॅमेऱ्यासमोर पुढे करत मनगटावर घातलेले डायमंड टेनिस ब्रेसलेट दाखवले. तिने ब्रेसलेटकडे बोट दाखवत, हे भारतात अंबानी कुटुंबाकडून मिळाले आहे, असे म्हटले. ■

### सोनू निगमकडून कलाकृती सादर



**मुंबई :** गायक सोनू निगम यांच्या मानेच्या नसा दबल्या आहेत. ही माहिती गायकाने स्वतः समाज माध्यमाद्वारे दिली आणि दाखवले की ते पट्ट्या लावून परफॉर्मन्सची तयारी कशी करत आहेत. ही घटना १३ जूनची आहे. सोनू निगम यांनी अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवरून एक व्हिडीओ पोस्ट केला. ज्यात त्यांनी बघा, माझ्या नसा दबल्या आहेत. मी तर एका आठवड्यापासून त्रास सहन करत आहे. एमआरआय, सिटी स्कॅन सर्व झाले. औषधे, फिजिओथेरपी खूप थकवणारे काम आहे. सध्या पेनकिलर्स घेत आहे, ज्यामुळे आवाजही थोडा जड झाला आहे, असे म्हटले आहे. १३ जूनला मी एक महिना आणि १० ते १२ दिवसांनंतर परफॉर्म करत आहे. माझा आत्मविश्वास तसाही थोडा कमी आहे. नसांना आराम देण्यासाठी जी औषधे घेत आहे, त्यांचा माझ्या आवाजावर परिणाम झाला. काही हरकत नाही, देवाने मला स्टेजवर शक्ती द्यावी, असे सोनूने म्हटले आहे. ■

# रा. स्व. संघाच्या रांचीतील कार्यालयावर बॉम्बहल्ला

**रांची, १७ जून**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रांचीतील कार्यालयावर पहाटेच्या सुमारास पेट्रोल बॉम्ब भिरकावण्यात आले. या प्रकरणाच्या तपासासाठी पोलिसांनी विशेष तपास पथक स्थापन केले आहे.

ही घटना चुटिया पोलिस ठाणे हद्दीतील निवारणपूर येथील रा. स्व. संघाच्या कार्यालयात पहाटे १२:३० वाजताच्या सुमारास घडली, अशी माहिती स्वयंसेवकांनी दिली. कार्यालयाच्या परिसरात पेट्रोल बॉम्ब फेकण्यात आले, असे रा. स्व. संघाच्या माध्यम समन्वय विभागाचे प्रमुख स्निग्धा रंजन यांनी सांगितले. वापरण्यात आलेल्या वस्तूंचे नेमके सविस्तर स्वरूप संपूर्ण तपासानंतरच स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले. घटनास्थळावरून काचेच्या दोन बाटल्या जप्त करण्यात आल्या. या बाटल्यांमध्ये नेमका कोणता पदार्थ आहे, याची माहिती घेण्यासाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या पथकाला पाचारण करण्यात आले, असे रांचीचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक राकेश रंजन यांनी सांगितले. या घटनेत कोण सहभागी होते, याची माहिती काढली जात आहे, असे रंजन यांनी सांगितले. या प्रकारामागे मोठा कट असल्याचा तसेच राज्याच्या राजधानीत शांतता भंग करण्याचा उद्देश असल्याचा आरोप केंद्रीय मंत्री संजय सेठ यांनी केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे. (वृत्तसंस्था)



अनंतनाग जिल्ह्यातील आरू खोऱ्यात बुधवारी पहलगाम मार्गावरून जाणारे एक चारचाकी वाहन लिड्डेर नदीत कोसळले. यात दोघांचा मृत्यू झाला तर काही जखमी झाले. जखमींना बाहेर काढताना मदत आणि शोध पथकाचे जवान

## वैद्यकीयमध्ये वाढीव खाटांनुसार पदनिर्मिती

**मुंबई, १७ जून**

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि संलग्न रुग्णालयांमधील वाढत्या रुग्णभाराचा विचार करून आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वाची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. वाढीव खाटांच्या संख्येनुसार डॉक्टर, परिचारिका, प्राध्यापक, तंत्रज्ञ आणि इतर कर्मचाऱ्यांची नवीन पदे निर्माण करण्याचा सुधारित प्रस्ताव लवकरच वित्त विभागाकडे सादर करण्यात येणार असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. (तभा वृत्तसेवा)

# बस-ट्रकच्या धडकेत सहा ठार, २६ जखमी

**वडोदरा-हलोल महामार्गावर भीषण अपघात**



**वडोदरा, १७ जून**

भरधाव खाजगी बसने महामार्गावर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका ट्रकला जबर धडक दिली.या अपघातात बसमधील सहा प्रवाशांचा मृत्यू तर सुमारे २६ जण जखमी झाले. जखमींपैकी काही प्रवाशांची प्रकृती चिंताजनक आहे.ही दुर्दैवी घटना बुधवारी पहाटे गुजरातच्या वडोदरा जिल्ह्यात वडोदरा-हलाल महामार्गावर घडली. अपघातानंतर या मार्गावरील वाहतूक खोळंबली होती.

पोलिसांनुसार, राजस्थानहून सुरतकडे जाणारी एक खाजगी लक्झरी बस वडोदऱ्यातील कोटंबी स्टेडियमजवळ पोहोचत असताना एका ट्रकच्या मागच्या भागाला धडकली. ही धडक इतकी जोरदार होती की, बसचा समोरील भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. यात बसमधील अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले. प्रवाशांच्या किंचाळ्या आणि आरडाओरडीमुळे सर्वत्र गोंधळ उडाला. या अपघातात ६ जणांचा मृत्यू तर २६ प्रवासी जखमी झाले आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

ट्रक रस्त्याच्या कडेला उभा होता. ट्रकचालक टायरमधील हवेचा दाब तपासत असतानाच भरधाव बसने त्याला मागून धडक दिली. बसचा पुढचा भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्यामुळे अनेक प्रवासी जखमी अवस्थेत आतमध्येच अडकून पडले. त्यांना बाहेर काढण्यासाठी स्थानिक पोलिस, अग्निशमन दल, एसडीआरएफ आणि एनडीआरएफ यांच्या पथकांनी बसचा पत्रा कापण्यासाठी गॅस कटरसह विविध साधनांचा वापर केला. बसमध्ये असलेले बहुतेक प्रवासी राजस्थानचे होते. (वृत्तसंस्था)

## माजी मंत्री उदयन गुहा यांना अटक

**कोलकाता, १७ जून**

पश्चिम बंगालचे माजी मंत्री आणि तृणमूल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उदयन गुहा यांना बुधवारी कोलकाता येथे अटक करण्यात आली. मात्र, पोलिसांनी त्यांच्या अटकेचे कारण उघड केलेले नाही. या टप्प्यावर आम्ही अटकेसंदर्भात माहिती देण्याच्या स्थितीत नाही. या प्रकरणाचा तपास सुरू असून आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पार पाडली जात आहे, असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. गुहा यांच्यावरील आरोप २०२१ च्या निवडणुकीनंतर झालेल्या हिंसाचाराशी संबंधित आहेत. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत दिनहाटा मतदारसंघातून टीएमसीचे उमेदवार असलेल्या गुहा यांच्यावर खंडणी आणि फसवणुकीचेही आरोप आहेत. (वृत्तसंस्था)

# आयआयटी मद्रासने विकसित केला 'ब्रेनस्टेम ॲटलास'

**चेन्नई, १७ जून**





आयआयटी मद्रासने 'अँकर' नावाचा, मानवी ब्रेनस्टेमचा आजपर्यंतचा सर्वात तपशीलवार '३डी डिजिटल ॲटलास' विकसित केला आहे. त्याची रचना आणि कार्य पेशीय स्तरापर्यंत समजून घेण्यास मदत करेल. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मद्रास'ने मानवी मेंदूच्या अभ्यासात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे.

संस्थेच्या सुधा गोपालकृष्णन ब्रेन सेंटरने 'अँकर' नावाचा एक उच्च-रिझोल्यूशन '३डी ब्रेनस्टेम ॲटलास' विकसित केला आहे. ज्याला संस्थेने आजपर्यंतचा मानवी ब्रेनस्टेमचा सर्वात तपशीलवार डिजिटल नकाशा म्हटले आहे. आयआयटी मद्रासने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, हा ॲटलास मेंदूच्या रचना पेशीय स्तरापर्यंत दर्शवतो आणि मेंदूचा विकास व कार्य समजून घेण्यासाठी एक नवीन वैज्ञानिक स्रोत प्रदान करतो. 'अँकर' किंवा 'ॲटलास ऑफ न्यूरोकेमिकल कॅरॅक्टरायझेशन ऑफ द ह्यूमन ब्रेनस्टेम विथ ३डी रिकन्स्ट्रक्शन', यामध्ये गर्भावस्थेतील विकसित होणाऱ्या मेंदूपासून ते लहान मुले आणि प्रौढांपर्यंतच्या ब्रेनस्टेमच्या रचनेची माहिती समाविष्ट आहे.

हा ॲटलस, श्वासोच्छ्वास, हृदयाचे ठोके, रक्तदाब आणि झोप यांसारख्या जीवनरक्षक प्रक्रिया नियंत्रित करणाऱ्या मेंदूच्या भागांची त्रिमितीय माहिती देण्यास मदत करतो. या प्रकल्पात मेंदूच्या ५०० हून अधिक भागांचा अभ्यास करण्यात आला आणि 'ब्रेन स्टेम'मधील २०० हून अधिक रचना, केंद्रके आणि चेता तंतूंचे मॅपिंग करण्यात आले. संशोधकांनी अत्यंत सूक्ष्म संरचनात्मक माहिती तयार करण्यासाठी, विविध न्यूरोकेमिकल पेशींचे प्रकार ओळखण्याकरिता आणि त्यांना एकत्रित करण्याकरिता आठ पूरक इम्युनोस्टेन तंत्रांचा वापर केला. आयआयटी मद्रासने हा ॲटलस आणि संबंधित माहिती सार्वजनिकरित्या उपलब्ध केली आहे. अशा खुल्या प्रवेशामुळे जागतिक स्तरावर मेंदू संशोधनाला नवी चालना मिळू शकते, असा विश्वास वैज्ञानिक समुदायाचा आहे. (वृत्तसंस्था)

### न्यूरोलॉजिकल आजारांच्या अभ्यासात उपयुक्त

अल्झायमर, पार्किन्सन्स, स्ट्रोक आणि ब्रेन ट्यूमर यांसारख्या न्यूरोलॉजिकल आजारांच्या अभ्यासात हा अटलस महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो, असा तज्ज्ञांचा विश्वास आहे. यामुळे बाधित पेशी आणि मेंदूच्या रचना ओळखण्यात अधिक अचूकता येईल. तसेच रोगांची जैविक कारणे समजून घेण्यासाठी आणि भविष्यात अधिक चांगले निदान व उपचार विकसित करण्यासाठीच्या संशोधनाला गती मिळण्याची अपेक्षा आहे. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# प्रत्येकाने व्हावे जलदूत...

चातकाहून अधिक आर्त असलेल्या प्रतीक्षेची परीक्षा घेत असलेला आणि केरळ-कोकणापर्यंत पोहाचलेला मान्सून तेथेच रेंगाळला आहे. अल-निनोच्या सक्रियतेने मोसमी वाऱ्यांना अडथळा निर्माण होत असतानाच, देशात पाऊस देणाऱ्या भारतीय महासागरीय द्वि-ध्रुविता या दुसऱ्या प्रणालीची निष्क्रियतादेखील चिंता वाढवणारी आहे. मोसमी पावसाची वाटचाल आता २३ जूननंतरच सुरू होण्याचा अंदाज व्यक्त केला गेला आहे. त्याचे पडसाद राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत उमटले. ऑगस्ट २०२७ पर्यंत पुरेल असे पिण्याच्या पाण्याचे नियोजन करा, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ही सूचना येत्या काळाची चिंता स्पष्ट करणारी आहे. मंगळवार अखेरपर्यंत सरासरी एक टक्काच पेरणी झाली. मान्सूनच्या आगमनाला झालेल्या विलंबाने आणि तापमान कायम असल्याने राज्यातील धरणांतील जलसाठ्याची स्थितीही खालावली आहे. जलसंपदा विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार, राज्यातील प्रमुख मोठ्या जलाशयांमध्ये सध्या केवळ २३ ते २४.७५ टक्क्यांच्या आसपास उपयुक्त जलसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच काळात हा साठा २८ टक्के इतका होता. १५ जून रोजी पुणे विभागात केवळ १२ टक्के पाणी शिल्लक होते. राज्यात सर्वांत कमी जलसाठा याच विभागात असल्याचे हा आकडा सांगतो. गतवर्षी याचवेळी पुण्यात पाण्याची उपलब्धता २४ टक्के एवढी होती. परिणाम म्हणून आताच एक दिवसाआड तेथील नळाला पाणी येत आहे. नाशिक व कोकण विभागात २३ टक्के, मराठवाड्यात ३२, अमरावती व नागपूर विभागात ३८ टक्के जलसाठा शिल्लक आहे. राज्यातील १३८ मोठ्या धरणांचा विचार करता, एकूण ३५,५३२ दशलक्ष घनमीटर क्षमतेपैकी साधारणतः २९,१०४ दशलक्ष घनमीटर पाणी उपयुक्त साठ्यात मोडते, तर उर्वरित ६,४२७ दशलक्ष घनमीटर एवढा साठा मृत समजला जातो. पुढील काळात या मृत साठ्याची गरज भासू नये, अशी प्रार्थना करूया.

गतवर्षीच्या तुलनेत ही स्थिती बिकट आहे. एकीकडे पावसाने राज्यावर वक्रदृष्टी टाकली असताना, धरणांचा कोरडेपणा काळजाचा ठोका चुकवणारा आहे. याच पृष्ठभूमीवर, राज्य सरकारने 'महाराष्ट्र ग्रामीण पेयजल धोरण २०२६'ला मंजुरी दिली आहे. ग्रामीण भागातील जनतेला शाश्वत, कायमस्वरूपी आणि शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे हा या धोरणामागचा हेतू आहे. हे धोरण स्वागतार्ह आहे. परंतु, कागदावरची धोरणे कितीही आश्वासक असली, तरी पुढच्या संपूर्ण हंगामात धरणांमध्ये पुरेसा जलसाठा असणे आणि तो नियोजनबद्ध पद्धतीने वापरणे हे मोठे आव्हान आहे. शासन पातळीवरील या प्रयत्नांना निसर्गाची आणि मानवी जागरूकतेची जोड नसेल, तर भविष्यातील पाण्याचे संकट अधिक गडद होईल. अल-निनोच्या प्रभावामुळे यंदा पाऊस लांबण्याची आणि अनेक भागांत तो सरासरीच्या केवळ ५० टक्केच पडण्याची भीती वर्तवली जात आहे. हा अंदाज खरा ठरला, तर हे संकट साधेसुधे नसेल. आधीच २५ टक्क्यांवर आलेला जलसाठा आणि त्यात आगामी पावसाची प्रचंड तूट हे समीकरण महाराष्ट्राला मोठ्या दुष्काळाच्या तोंडावर नेऊन सोडेल असे वाटते.

'ये रे ये रे पावसा, तुला देतो पैसा, पैसा झाला खोटा, पाऊस आला मोठा...' ही लहानपणीची कविता आपण सर्वांनीच आनंदाने गायिली आहे. आज पैसा देऊनही पाणी मिळणे कठीण झाले आहे. कोट्यवधीचे नियोजन केल्यानंतरही उन्हाळ्याच्या शेवटी गावांत आणि शहरांतूनही पाण्याचे टँकर्स दिसतात. पाऊस झाला, सर्वत्र पाणी दिसायला लागले की, आपण सारे टंचाईचा भूतकाळ विसरतो. भविष्याची तजवीजही विसरतो. पाण्याचा जपून वापर करण्याची, पाण्याचा अपव्यय टाळण्याची आपली सवय पावसाच्या पहिल्या सरीसोबत वाहून जाते. ही तात्पुरती जागृती आणि पावसाळ्यानंतरची बेफिकिरी दरवर्षी उन्हाळ्यात महाग पडते. पडलेला पाऊस जमिनीत जिरवणे, ते पाणी मुरवणे आणि भूगर्भातील जल पातळी वाढवणे याकडे आपण दुर्लक्ष करतो. आता ही मानसिकता मुळापासून बदलावी लागणार आहे. पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि भूजल पातळी वाढविण्यासाठी काम करणे ही जीवनशैली बनली पाहिजे. धरणे बांधून पाणी अडवणे, ही शासनाची जबाबदारी आहेच. परंतु, घराच्या छपरावर पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवणे आपले कर्तव्य आहे. ही लोकचळवळ झाली पाहिजे. विहिरींचे पुनर्भरण, शेततळे आणि 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' या गोष्टी आता प्राधान्याच्या आणि सक्तीच्या झाल्या पाहिजेत. जमीन पाण्याने तृप्त असेल, तरच धरणांवरील ताण कमी होईल. पाणी जमिनीत मुरले की, ते दुष्काळातही पाझराच्या रूपाने साथ देईल. आपण निसर्गाकडून भरभरून घेतो, पण निसर्गाच्या पदरात परत काहीच टाकत नाही ही खरी समस्या आहे.

आज जगात तेलाच्या विहिरींवरून, ऊर्जेच्या स्रोतांवरून युद्धे होत आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारण तेलाच्या किमतींभोवती फिरत आहे. ऊर्जेचे अनेक स्रोत शोधले जातील, माणूस अन्नाशिवाय काही दिवस जगेलही; पण पाण्याशिवाय सजीव सृष्टी तग धरणार नाही. हवामान बदलाचे हे चक्र असेच सुरू राहिले, तर आज जे युद्ध तेलासाठी होत आहे, ते उद्या पाण्यासाठी होईल. आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि अगदी राज्या-राज्यांमध्येही पाण्याचे वाद पेटू लागले आहेत. येत्या काळात पाण्यासाठीचे महायुद्ध टाळायचे असेल, तर आजच प्रत्येक थेंबाचे रक्षण करावे लागेल.

सरकारने 'महाराष्ट्र ग्रामीण पेयजल धोरण २०२६' आणून योग्य पाऊल उचलले आहे. ग्रामीण भागाला टँकरमुक्त करणे, नळाद्वारे शुद्ध पाणी पोहोचवणे हे उद्दिष्ट नक्कीच कौतुकास्पद आहे. परंतु, मूळ प्रश्न उरतो की नळाला सोडण्यासाठी पाणी आणणार कुठून? धरणांमध्येच पाणी नसेल, भूगर्भातील जलस्रोतच आटले असतील, तर जलवाहिन्या, पाणीपुरवठा योजना आणि सरकारी धोरण कागदावरच राहील. या धोरणाच्या यशस्वितेसाठी लोकसहभाग आवश्यक आहे. पूर्व विदर्भात गोसेखुर्द धरणाचे पाणी गावागावांत नेणाऱ्या पाणी समित्या गोंडवाना विद्यापीठाने मिशन म्हणून सक्षम केल्या. असे प्रयोग ठिकठिकाणी झाले पाहिजेत. पाण्याचेही 'ऑडिट' करणे, कोणत्या पिकाला किती पाणी द्यावे याचे नियमन करणे आणि पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर कडक निर्बंध लादणे हे सुद्धा गरजेचे आहे. शेतीमध्ये ठिबक आणि तुषार सिंचनाचा वापर १०० टक्के कसा होईल, याकडे प्रशासनाने विशेष लक्ष दिले पाहिजे. या संकटाचा सामना करण्यासाठी त्रिसूत्रीचा अवलंब करावा लागेल. त्यात आधी, उपलब्ध २५ टक्के जलसाठ्याचा वापर केवळ पिण्यासाठी राखीव ठेवणे आणि औद्योगिक व इतर वापरासाठी पाणी कपात करणे. दुसरे, येत्या पावसाळ्यात पडणाऱ्या पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवण्यासाठी आत्तापासूनच लोकचळवळ उभी करणे आणि शेवटचे म्हणजे, पाण्याचा अपव्यय थांबवण्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक माध्यमांतून व्यापक मोहीम राबवणे.

धरणे कितीही मोठी बांधली तरी ती पावसावरच अवलंबून असतात. निसर्गाचा समतोल आपण आधीच बिघडवला आहे. त्याची फळे आता आपण भोगत आहोत. अल-निनोचे संकट हे केवळ हवामान खात्याचे बुजगावणे नाही, तर तो आपल्यासाठी इशारा आहे. आपल्याला सुधारण्याची शेवटची संधी आहे. 'ये रे ये रे पावसा, तुला देतो पैसा...' ही कविता म्हणून ठीक. पण निसर्गाला पैशाची हाव नाही. पाऊस येईल आणि आपले कर्तव्य करून निघून जाईल. पण त्या पाण्याला कशा प्रकारे साठवायचे, कसे जिरवायचे आणि वर्षभर कसे पुरवून वापरायचे, हे सर्वस्वी आपल्या हातात आहे. पाणी हे जीवन आहे, हे भाषणात वापरण्यासाठी किंवा मिरवणुकीत फलक घेऊन मिरवण्यासाठी नव्हे, तर ते कृतीत आणण्यासाठी आहे. प्रत्येक नागरिकाला 'जलदूत' बनावे लागणार आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरावा लागेल आणि तो जमिनीत मुरवावा लागेल. ही जेव्हा संस्कृती बनेल तेव्हाच पुढचा काळ सुकर होईल. ■

## विशेष

# खनिज संपत्तीचे नवे पर्व

**प्रा. सुखदेव बखळे**

भारताच्या आर्थिक विकासाचा विचार केला तर पायाभूत सुविधा, ऊर्जा, उत्पादन क्षेत्र आणि तंत्रज्ञान उद्योग यांचा उल्लेख अपरिहार्य ठरतो; मात्र या सर्व क्षेत्रांच्या पायाभूत गरजा पूर्ण करणारा एक मूलभूत घटक अनेकदा चर्चेच्या केंद्रस्थानी येत नाही, तो म्हणजे खाण उद्योग. लोखंड, कोळसा, बॉक्साइट, तांबे, दुर्मिळ पृथ्वी धातू, लिथियम, कोबाल्ट यांसारख्या खनिजांशिवाय आधुनिक अर्थव्यवस्थेची कल्पनाही करता येत नाही. रस्ते, रेल्वे, बंदरे, वीजनिर्मिती, वाहन उद्योग, स्मार्टफोन, सौरऊर्जा प्रकल्प आणि इलेक्ट्रिक वाहने या सर्वांचा पाया खनिज संपत्तीवर उभा आहे. त्यामुळे भारतीय खाण क्षेत्रातील अलिकडील घडामोडी केवळ औद्योगिक विकासापुरत्या मर्यादित नसून देशाच्या दीर्घकालीन आर्थिक आणि धोरणात्मक स्वावलंबनाशी निगडित आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये भारताच्या खाण क्षेत्रात सातत्याने विस्तार होत आहे. पायाभूत सुविधांवरील मोठ्या गुंतवणुकीमुळे स्टील, सिमेंट आणि ऊर्जा क्षेत्रातील मागणी वाढली आहे. वाहन उद्योगाच्या विस्तारामुळे धातूंची गरज वाढत आहे. याशिवाय इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन, बॅटरी स्टोरेज प्रणाली आणि स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे लिथियम, कोबाल्ट, निकेल आणि दुर्मिळ पृथ्वी धातूंसारख्या महत्त्वाच्या खनिजांची मागणी अभूतपूर्व वेगाने वाढू लागली आहे. परिणामी, खाण क्षेत्र आता केवळ पारंपरिक संसाधन उत्खननापुरते मर्यादित राहिले नसून भारताच्या हरित ऊर्जा संक्रमणाचा आधारस्तंभ बनत आहे.

भारत हा जगातील सर्वाधिक खनिजवैविध्य असलेल्या देशांपैकी एक आहे. देशात ९५ हून अधिक प्रकारची खनिजे आढळतात. यामध्ये इंधन खनिजे, धातूजन्य खनिजे, अधातूजन्य खनिजे, अणुऊर्जा क्षेत्राशी संबंधित खनिजे तसेच बांधकाम साहित्याचा समावेश होतो. देशभरात दोन हजारांहून अधिक कार्यरत खाणी आहेत. लोखंड धातू, कोळसा, बॉक्साईट आणि जस्त यांच्या बाबतीत भारताकडे मोठ्या प्रमाणात साठे उपलब्ध आहेत. याशिवाय ग्रॅफाईट, फॉस्फोराईट, दुर्मिळ पृथ्वी धातू, टायटॅनियम आणि झिरकोनियम यांसारख्या महत्त्वाच्या खनिजांचे उत्पादनही भारतात होते. या संसाधनसंपन्नतेमुळे भारताला जागतिक खनिज पुरवठा साखळीत महत्त्वाचे स्थान प्राप्त होऊ शकते. तथापि, एवढी मोठी खनिजसंपत्ती असूनही भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) खाणक्षेत्राचा थेट वाटा सुमारे दोन टक्क्यांपर्यंत मर्यादित आहे. पहिल्या दृष्टिक्षेपात हा आकडा कमी वाटू शकतो; परंतु या क्षेत्राचा अप्रत्यक्ष आर्थिक प्रभाव अत्यंत व्यापक आहे. उत्पादन उद्योग, बांधकाम, ऊर्जा, वाहतूक आणि निर्यातक्षेत्राशी असलेल्या घनिष्ठ संबंधांमुळे खाण उद्योगाचा प्रभाव अर्थव्यवस्थेच्या अनेक स्तरांवर जाणवतो. देशाच्या एकूण औद्योगिक उत्पादनात या क्षेत्राचा वाटा सुमारे आठ टक्के आहे. त्यामुळे खाण उद्योगातील वाढ म्हणजे अनेक पूरक उद्योगांमधील वाढीचा पाया ठरतो.



भारतातील खाण उद्योगाच्या विकासामागे धोरणात्मक सुधारणांची महत्त्वाची भूमिका आहे. विशेषतः २०१५ नंतर केंद्र सरकारने या क्षेत्रात पारदर्शकता, गुंतवणूक आणि स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी अनेक सुधारणा केल्या. खनिज पट्ट्यांचे वाटप लिलाव पद्धतीने करण्याचा निर्णय हा त्यातील महत्त्वाचा टप्पा होता. यामुळे खनिज संसाधनांचे वाटप अधिक पारदर्शक झाले आणि खाजगी गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले. याच काळात जिल्हा खनिज प्रतिष्ठान आणि राष्ट्रीय खनिज अन्वेषण न्यास यांसारख्या संस्थांची स्थापना करण्यात आली. खाणप्रभावित भागातील लोककल्याण, पर्यावरणीय संरक्षण आणि खनिज शोध मोहिमांना चालना देणे हे त्यामागील प्रमुख उद्दिष्ट होते. कोळसा क्षेत्रातील सुधारणा विशेष उल्लेखनीय आहेत. २०२० मध्ये व्यावसायिक कोळसा खाणकामाला परवानगी दिल्यानंतर उत्पादन क्षमतेत मोठी वाढ झाली आहे. आतापर्यंत शंभरहून अधिक कोळसा ब्लॉक्सचे लिलाव करण्यात आले आहेत. 'माईन डेव्हलपर अँण्ड ऑपरेटर' (एमडीओ) मॉडेलच्या माध्यमातून खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्यात आला आहे. यामुळे तांत्रिक कौशल्य, भांडवली गुंतवणूक आणि व्यवस्थापन कार्यक्षमता यांचा लाभ क्षेत्राला मिळत आहे. कोळसा उत्पादन वाढवण्याबरोबरच जबाबदार खाणकाम आणि संसाधनांचा अधिक कार्यक्षम वापर यांनाही महत्त्व दिले जात आहे. तंत्रज्ञानाचा वाढता वापर हे भारतीय खाण क्षेत्रातील आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. भारताच्या ऊर्जा संक्रमणामुळे खनिज धोरणातही मोठा बदल दिसून येतो. इलेक्ट्रिक वाहने, बॅटरी उत्पादन, हरित हायड्रोजन, सौरऊर्जा आणि संरक्षण क्षेत्रासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वपूर्ण खनिजांना आता राष्ट्रीय धोरणात्मक प्राधान्य मिळाले आहे. लिथियम, कोबाल्ट, टंगस्टन आणि दुर्मिळ पृथ्वी धातू यांसारख्या खनिजांची मागणी भविष्यात झपाट्याने वाढणार हे स्पष्ट आहे; परंतु या खनिजांपैकी अनेकांसाठी भारत अजूनही आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. ३० महत्त्वपूर्ण खनिजांपैकी दहांसाठी भारत शंभर टक्के आयातनिर्भर आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वपूर्ण राष्ट्रीय खनिज अभियान सुरू केले आहे. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेसारख्या देशांमध्ये खाण क्षेत्राचा अर्थव्यवस्थेतील वाटा सात ते बारा टक्क्यांदरम्यान आहे. भारताने त्या पातळीपर्यंत पोहोचण्यासाठी उत्पादनवाढ, तंत्रज्ञान, अन्वेषण आणि मूल्यवर्धन या सर्व आघाड्यांवर प्रयत्न करणे आवश्यक आहे; मात्र या विकास प्रक्रियेत काही आव्हानेही आहेत. पर्यावरणीय मंजुरी, जमिनीचे अधिग्रहण, स्थानिक समुदायांचे हितसंबंध आणि जैवविविधतेचे संरक्षण यांसारख्या मुद्यांकडे दुर्लक्ष करून खाण क्षेत्राचा विस्तार करणे शक्य नाही. विशेषतः आदिवासी आणि वनक्षेत्रांमध्ये खाण प्रकल्पांमुळे सामाजिक तणाव निर्माण होऊ शकतो. त्यामुळे विकास आणि पर्यावरणीय संतुलन यामध्ये समतोल राखणे आवश्यक ठरेल. खाण प्रभावित भागांमधील लोकांना रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही उद्योग आणि सरकारची संयुक्त जबाबदारी असेल. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# गडचिरोलीचा झेंडा सातासमुद्रापार

गडचिरोली म्हटले की अनेकांच्या डोळ्यासमोर आजही नक्षलग्रस्त, मागास आणि दुर्गम असा जिल्हा उभा राहतो. विकासाच्या मुख्य प्रवाहापासून काहीसा दूर असलेल्या या जिल्ह्याची ओळख अनेकदा समस्यांच्या चष्म्यातूनच पाहिली जाते. मात्र या भूमीत संघर्ष आहे, जिद्द आहे, कष्ट करण्याची तयारी आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वप्न पाहण्याचे धाडस आहे. या धाडसाला यशाची जोड मिळाली की गडचिरोलीची मुले जगाच्या नकाशावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करू शकतात, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

अहेरी तालुक्यातील आल्लापल्ली परिसरातील एका छोट्याशा गावातून आलेल्या रोहित राठोड या युवा गोलंदाजाने आपल्या प्रतिभेच्या जोरावर थेट इंग्लंडच्या प्रतिष्ठित डरहम क्रिकेट बोर्डाचे लक्ष वेधून घेतले आहे. नेट गोलंदाज म्हणून त्याची झालेली निवड ही केवळ एका खेळाडूची उपलब्धी नाही, तर संपूर्ण गडचिरोली जिल्ह्याच्या कर्तृत्वाचा गौरव आहे. सातासमुद्रापार पोहोचलेली ही कामगिरी अनेक तरुणांच्या मनात नवी उमेद निर्माण करणारी आहे. गडचिरोलीतील ग्रामीण आणि आदिवासी भागातील मुलांकडे प्रतिभेची कधीच कमतरता नव्हती. मात्र संधी, सुविधा आणि योग्य मार्गदर्शन यांचा अभाव ही त्यांची सर्वांत मोठी अडचण होती. अनेक मुलांचे स्वप्न गावच्या मैदानापुरतेच मर्यादित राहायचे. मोठ्या शहरांमधील अत्याधुनिक सुविधा, प्रशिक्षक आणि आर्थिक पाठबळ यांच्याशी स्पर्धा करताना ग्रामीण भागातील खेळाडूंना अनेक अडथळे पार करावे लागतात. अशा परिस्थितीत रोहित राठोड याने केलेली प्रगती विशेष महत्त्वाची ठरते. यश कधीही एका दिवसात मिळत नाही. त्यामागे असतो असंख्य तासांचा सराव, अपयशाचे घाव, संयमाची परीक्षा आणि स्वतःवर असलेला विश्वास. रोहितच्या यशामागेही हाच संघर्ष दडलेला आहे. मोठ्या शहरातील सुविधांशिवाय, मर्यादित साधनसामग्रीतून त्याने स्वतःला घडवले. आपल्या गोलंदाजीतील सातत्य आणि मेहनतीच्या जोरावर त्याने प्रथम राज्यस्तरावर आणि नंतर राष्ट्रीय स्तरावर छाप पाडली. आज त्याच मेहनतीचे फळ म्हणून इंग्लंडसारख्या क्रिकेट महासत्तेच्या दारापर्यंत त्याची मजल पोहोचली आहे.

हे यश गडचिरोलीच्या तरुणांसाठी एक संदेश घेऊन आले आहे. रोहितने मिळालेल्या प्रत्येक संधीचा योग्य उपयोग केला आणि त्यामुळेच आज तो प्रेरणेचा दीपस्तंभ बनला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील अनेक मुलांमध्ये खेळ, शिक्षण, कला आणि विविध क्षेत्रांमध्ये मोठी क्षमता आहे. गरज आहे ती त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची, त्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची. प्रशासन, क्रीडा संस्था, सामाजिक संघटना आणि उद्योगसमूह यांनी अशा प्रतिभावंतांना प्रोत्साहन दिल्यास गडचिरोलीतून आणखी अनेक रोहित घडू शकतात. आल्लापल्लीच्या मातीतून उगवलेले हे यश आज संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरले आहे. ही केवळ एका खेळाडूची कथा नाही; ही गडचिरोलीच्या जिद्दीची, आत्मविश्वासाची आणि अमर्याद शक्यतांची कथा आहे. आणि म्हणूनच रोहितची ही भरारी संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची तर आहेच, पण येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणेचा अखंड स्रोतही ठरणार आहे. आज गडचिरोली जिल्ह्यातील अनेक पालक आपल्या मुलांनी शिक्षणासोबत खेळ, कला आणि इतर क्षेत्रांतही मोठी झेप घ्यावी, अशी अपेक्षा बाळगून आहेत. मात्र त्यासाठी मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होणे गरजेचे असते. रोहित राठोडच्या यशाने हा आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम केले आहे. ''आपल्यासारख्या छोट्या गावातील मुलगाही इंग्लंडपर्यंत पोहोचू शकतो, तर आपण का नाही?'' हा प्रश्न आता अनेक तरुण स्वतःला विचारतील. याच विचारातून नवे खेळाडू, नवे अधिकारी, नवे उद्योजक आणि नवे नेतृत्व घडत असते. एका व्यक्तीचे यश अनेकांच्या स्वप्नांना पंख देण्याचे काम करते आणि समाजाच्या प्रगतीचा मार्ग अधिक व्यापक बनवते.

विशेष म्हणजे रोहितची ही कामगिरी गडचिरोली जिल्ह्याची सकारात्मक प्रतिमा देश-विदेशात पोहोचवणारी ठरली आहे. अनेकदा नकारात्मक कारणांनी चर्चेत येणाऱ्या या जिल्ह्याची ओळख आता कर्तृत्व, प्रतिभा आणि जिद्दीच्या बळावर निर्माण होत आहे. रोहितसारख्या युवकांच्या यशामुळे गडचिरोलीची नवी पिढी संघर्षाला घाबरणारी नाही, तर त्यातून मार्ग काढणारी आहे, हे अधोरेखित झाले आहे. त्यामुळे ही केवळ एका क्रिकेटपटूची उपलब्धी नसून संपूर्ण जिल्ह्याच्या उमेदीचा, आशावादाचा आणि उज्ज्वल भविष्याचा विजय आहे. ■

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# 'शिल्लकसेना'ही संपण्याच्या मार्गावर...

तृणमूल कॉंग्रेस संसदीय पक्षात फूट पडल्यानंतर आता शिवसेना उबाठातही उभी फूट पडल्याची चर्चा राजधानी दिल्लीत सुरू झाली आहे. काही माध्यमांनी तर फुटीची प्रक्रिया पूर्ण झाल्याच्या बातम्याही दिल्या. काही म्हणतात की, अद्याप अंतिम निर्णय व्हायचा आहे. सांगितले जातेय ते असे की, शिवसेनेच्या ६ खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र पाठवत आपला गट शिवसेना एकनाथ शिंदे गटात विलीन करण्याची मागणी केली आहे. या माहितीला अधिकृत दुजोरा मिळू शकला नाही. या पत्रावर संजय देशमुख, संजय जाधव, संजय दिना पाटील, नागेश आष्टीकर पाटील, भाऊसाहेब वाकचोरे आणि ओमराजे निंबाळकर अशा खासदारांच्या स्वाक्षऱ्या असल्याचेही सांगितले गेले. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे लोकसभेत ९ खासदार आहेत. त्यातील सहा म्हणजे दोनतृतीयांश खासदारांनी अशी मागणी केली असेल तर ती मान्य होण्यात कोणतीच कायदेशीर अडचण दिसत नाही.

थोडे मागे जाऊन पाहिले तर तृणमूल कॉंग्रेस विधिमंडळ पक्षात आधी फूट पडली होती. पक्षाच्या ८० पैकी ५८ आमदारांनी आपला वेगळा गट स्थापन केला. त्यानंतर तृणमूल कॉंग्रेस संसदीय पक्षातील फुटीवरही शिक्कामोर्तब झाले. पक्षाच्या २८ पैकी २० खासदारांनी आधी आपला वेगळा गट स्थापन केला. त्यानंतर पक्षांतरबंदी कायद्यातून वाचण्यासाठी त्यांनी आपला गट त्रिपुराच्या नॅशनल सिटिझन्स पार्टी ऑफ इंडियात (एनसीपी) विलीन केला. या प्रक्रियेचीच पुनरावृत्ती महाराष्ट्रातील शिवसेना उबाठात होत असल्याचे दिसते. उबाठातील घटनाक्रम पश्चिम बंगालमधील राजकीय घटनाक्रमापेक्षा थोडासा वेगळा दिसतो. तो असा की, उबाठाच्या संसदीय पक्षात फूट आधी पडताना दिसतेय. यानंतर विधिमंडळ पक्षात फूट पडण्याची शक्यता आहे. तृणमूल कॉंग्रेसमध्ये नेमके याच्या उलट झाले होते. तृणमूल कॉंग्रेसच्या विधिमंडळ पक्षात आधी फूट पडली, नंतर संसदीय पक्षात. विधिमंडळ पक्षातील फुटीनंतर तृणमूल कॉंग्रेसच्या ममता बॅनर्जी यांचा उद्धव ठाकरे झाला, असे म्हटले गेले. आताचा घटनाक्रम असाच पुढे गेला तर उद्धव ठाकरे यांचा ममता बॅनर्जी झाला असे म्हणता येईल.

महाराष्ट्रात ऑपरेशन टायगर होणार, याची चर्चा बऱ्याच महिन्यांपासून सुरू होती. ती आता प्रत्यक्षात आल्यासारखे दिसते आहे. ऑपरेशन टायगर यशस्वी झाल्यानंतर ऑपरेशन तुतारी झाले तरी आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. शिवसेनेचा हीरक महोत्सवी वर्धापनदिन १९ जूनला आहे. तो मुहूर्त साधत शिवसेना उबाठात फूट पडत असल्याची चर्चा आहे. शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मातोश्री या आपल्या निवासस्थानी रविवारी बोलवलेल्या बैठकीला पक्षाचे ९ पैकी फक्त चारच खासदार प्रत्यक्ष उपस्थित होते. उर्वरित पाच खासदारांनी आभासी पद्धतीने आपली उपस्थिती लावली होती. त्याचवेळी शिवसेनेत फूट पडण्याचे संकेत मिळाले होते. तशी ही चर्चा त्याही आधी सुरू झाली होती. आभासी पद्धतीने उपस्थित राहणाऱ्या खासदारांनी प्रत्यक्ष अनुपस्थितीची जी कारणे सांगितली होती, ती पटण्यासारखी नव्हती.

शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत उसने अवसान आणून पक्षात फूट पडणार नसल्याचा दावा करत असले तरी त्यांनाही फुटीचा अंदाज होता असेही म्हणता येईल. त्यामुळेच दुसऱ्या दिवशी, ज्यांना जायचे आहे, त्यांनी जावे, आमच्या शुभेच्छा त्यांच्यासोबत असल्याचे उपरोधिकपणे म्हणत उद्धव ठाकरेंनी नाईलाज दर्शविला होता. संसदीय पक्षातील या फुटीची प्रक्रिया पूर्ण झाली तर त्यापाठोपाठ शिवसेना विधिमंडळ पक्षातील फुटीचे नगारे वाजायला लागतील, असे दिसते. महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या आधी शिवसेना विधिमंडळ पक्षात फूट पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेत फूट पडण्याचा हा सहावा प्रसंग ठरू शकतो. आतापर्यंत पाचवेळा पक्षात फूट पडली. विशेष म्हणजे बाळासाहेब ठाकरे हयात असतानाच शिवसेनेत फूट पडायला सुरुवात झाली होती. शिवसेनेत सर्वांत पहिली फूट १९९१ मध्ये नागपुरातील हिवाळी अधिवेशनाच्या दरम्यान पडली होती. त्यावेळी छगन भुजबळ शिवसेनेतून बारा आमदारांसह बाहेर पडले होते. त्यावेळी प्रसिद्ध मराठी कवी सुरेश भट यांचे 'बेगुमान वरवंट्याचा आज जाहला पाटा, हे हिंदुहृदय सम्राटा, तो छगन करी तुज टाटा' हे गीत प्रचंड गाजले होते. त्यानंतर १९९८ मध्ये गणेश नाईक यांनी शिवसेनेला रामराम ठोकला. २००५ या एकाच वर्षात शिवसेना दोनदा फुटली. पहिल्यांदा नारायण राणे बाहेर पडले, तर दुसऱ्यांदा राज ठाकरे. भुजबळ, गणेश नाईक आणि नारायण राणे यांच्या तुलनेत राज ठाकरे यांनी शिवसेना सोडल्याचा धक्का शिवसेनेसाठी मोठा होता. कारण राज हे ठाकरे घराण्यातील आणि बाळासाहेबांचे सख्खे पुतणे होते. भुजबळ, राणे आणि नाईक यांनी शिवसेनेतून बाहेर पडल्यावर कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला आणि शिवसेना फोडल्याचा पुरेपूर राजकीय फायदा उचलला. पण, राज ठाकरे यांनी शिवसेनेतून बाहेर पडल्यावर कोणत्याही पक्षात प्रवेश न करता स्वतःची महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) स्थापन केली. मनसेला निवडणुकीत फारसा राजकीय फायदा झाला नाही, मात्र आपले स्वतंत्र अस्तित्व राज ठाकरे यांनी कायम ठेवले. प्रत्येक फुटीचा शिवसेनेवर परिणाम झाला. शिवसेनेतील सर्वांत मोठी फूट एकनाथ शिंदे यांची होती. २०२२ मध्ये शिवसेनेतील ४० आमदारांना घेऊन एकनाथ शिंदे बाहेर पडले. आतापर्यंत शिवसेनेतून अनेक नेते बाहेर पडले. पण त्यामुळे पक्षाची थेट दोन शकले झाली, असे घडले नव्हते. शिंदेंच्या बंडाने शिवसेना पहिल्यांदाच खऱ्या अर्थाने फुटली होती. शिवसेनेची थेट दोन शकले झाली. आमदारांच्या संख्याबळाच्या भरवशावर शिंदे यांनी आपला गटच मूळ शिवसेना असल्याचा दावा केला आणि तो मान्यही झाला. त्यामुळे शिवसेनेचे धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह त्यांच्या गटाला मिळाले. या धक्क्यातून सावरण्याआधीच शिवसेनेत आणखी एक मोठी फूट पडताना दिसत आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी ज्या विचाराने शिवसेनेची स्थापना केली होती, त्या शिवसेनेची उद्धव ठाकरे यांनी पुत्रमोहापोटी आणि अन्य कारणास्तव पार वाट लावली. उद्धव ठाकरे यांनी सत्तेसाठी हिंदुत्वाशी आणि महाराष्ट्राच्या जनतेशी जो विश्वासघात केला, त्याची किंमत त्यांना कधी तरी चुकवावी लागणार होती. ती त्यांना अशा घटनांनी चुकवावी लागत आहे. कर्तृत्ववान मुलगा वडिलांनी आपल्यासाठी ठेवलेल्या संपत्तीत भर घालून ती वाढवत असतो. पण उद्धव ठाकरेंनी, वडिलांनी म्हणजे बाळासाहेब ठाकरेंनी, मोठ्या विश्वासाने हाती सोपवलेल्या शिवसेनेची पार वाताहत केली. 'जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो रे ईश्वर' असे जे म्हटले जाते, ते उगाच नाही. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची शिल्लकसेना म्हणून खिल्ली उडवली जात होती. असेच सुरू राहिले तर त्यांच्याजवळची शिल्लकसेनाही संपल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी आतातरी आत्मपरीक्षण केले पाहिजे. आपल्या हातून झालेल्या चुकांसाठी महाराष्ट्रातील जनतेची माफी मागितली पाहिजे आणि जी काही थोडीफार शिवसेना शिल्लक आहे, ती सांभाळून ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ■

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### तेव्हा कुठे गेला होता धर्म... ?

कर्णाच्या रथाचे चाक रुतले तेव्हा त्याला धर्म आठवला. तेव्हा त्याला जुन्या आठवणी देऊन विचारावे लागले, 'राधासुता, तेव्हा तुझा धर्म कुठे गेला होता?' उबाठा सेनेच्या सहा खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन केला आणि तो गट शिवसेना (शिंदे) य पक्षात विलीन करण्यास लोकसभा सभापतींनी अनुमती दिली, त्यामुळे संजय राऊत, उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांचा नुसता थयथयाट चालू आहे. मात्र त्यांनी जरा इतिहासात डोकावून पाहावे. २०१९ मधील विधानसभा निवडणुकीसाठी तत्कालीन शिवसेना व भाजप यांची निवडणूकपूर्व युती झालेली होती. त्या वेळी कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्याबद्दल तिरस्कार असलेल्या हिंदुत्वप्रेमी मतदारांनी सेना-भाजप युतीला भरघोस मतांनी निवडून दिले आणि सत्तास्थापनेसाठी आवश्यक असलेल्या संख्येपेक्षा भरपूर जास्त आमदार दिले. मात्र तेव्हा उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाच्या लालसेपायी युतीचा धर्म मोडून, मतदारांनी पराभूत केलेल्या हिंदुत्वविरोधी कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेससोबत आघाडी केली आणि हिंदुत्वप्रेमी मतदारांचा विश्वासघात केला. ज्या मतदारांनी १९५२ पासून कधीही कॉंग्रेसला मतदान केले नव्हते, त्यांच्या मतांवर निवडून येऊन उबाठाने हिंदुत्वाशी गद्दारी केली आणि १०, जनपथ व सिल्व्हर ओक पुढे लोटांगण घातले. आता संजय राऊत म्हणताहेत की सहा बंडखोर खासदारांनी खासदारकीचा राजीनामा देऊन पुन्हा निवडणूक लढवावी. हे ब्रह्मज्ञान २०१९ मध्ये कुठे गेले होते? आता उद्धव ठाकरे यांना काव्यगत न्याय मिळालेला आहे आणि उबाठाचे आमदार व नगरसेवक यांना उपरती झाल्यावर काव्यगत न्यायाची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. संजय राऊत यांनी अजिबात काळजी करू नये!

**अविनाश वाघ**/पुणे

* * *

### केशरयुक्त विमल विलायची जाहिरातीचं काय?

टीव्ही चॅनलवर प्रत्येक दोन-चार मिनिटांनी केशरयुक्त विमल विलायची जी जाहिरात दाखवली जाते, या जाहिरातीमध्ये मोठे मोठे हिरो काम करतात. हे करोडो रुपये घेणारे स्टार, शाहरुख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ हे विमलची जाहिरात करतात. या जाहिरातीत विमलच्या छोट्या पुडीतून केशरसारखा पदार्थ दाखवला जातो जेणेकरून ग्राहक आकर्षित व्हावे. खरे केशर काश्मीरला पिकवले जाते आणि ते लाखो रुपयाला विकले जाते. मात्र इथे केशरसदृश विमल पुडी एक ते पाच रुपयाला विकली जाते आणि त्यासाठी करोडो रुपये घेणारे स्टार पाच रुपयांच्या विमल पुडीसाठी जाहिरात करतात याचं आश्चर्य वाटतं. या विमलची एवढी मोठी जाहिरात होत आहे की तिचं सर्वांना आकर्षण होऊन एक प्रकारचं व्यसनच होऊन बसणार आहे, शासनाने सुद्धा काही जाहिरातींवर बंधन आणणे महत्त्वाचे आहे.

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

### पार्किंगचे व्यवस्थापन

भारतात खाजगी वाहनांची संख्या झपाट्याने वाढते आहे. याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे लोकांच्या राहणीमानात झालेली सुधारणा. विविध उत्पन्न गटातील लोकांनाही कार खरेदी करणे शक्य झाले आहे. दुचाकी आणि चारचाकी वाहनांची वर्दळ वाढल्याने रस्त्यावर वाहतुकीचा ताण वाढत चालला आहे. आज आपण कुठेही खरेदीला किंवा एखाद्या समारंभाला अथवा मनोरंजनाच्या कार्यक्रमाला जात असू तर आधी त्या ठिकाणची पार्किंग व्यवस्था काय आहे हा विचार मनात येतो. कारण गाडी सुरक्षित कुठे राहील ही सतत काळजी असते. तसेच एखाद्या रेस्टॉरेंटजवळ पार्किंग व्यवस्था नसेल तर बाहेर कुठेतरी, कोणाच्या घरासमोर गल्लीत गाडी ठेवली जाते. तेव्हा घरमालकाला स्वतःचीच गाडी बाहेर काढायला त्रास होतो. कुणीही कशीही गाडी लावतो.

दिनांक १७ जून २०२६ च्या तरुण भारतात दिलेल्या माहितीनुसार वाहन नोंदणी पूर्वी पार्किंग प्रमाणपत्र अनिवार्य केल्यास रस्त्यावरील पार्किंग कमी होण्यास मदत होईल असाही एक पर्याय जाणकारांनी मांडला आहे. सध्या पार्किंग समस्या बिकट होत चालली आहे. त्यामुळे बरेचदा वादावादी तसेच मारामारीपर्यंत गोष्टी गेल्याची उदाहरणे आहेत.

इतक्यात नागपुरात मेन रोडवर बरीच नवीन रेस्टॉरेंट्स चालू झाले आहेत. परंतु पार्किंग व्यवस्था शून्य. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की प्रत्येक वाहनाला एक नियुक्त पार्किंग जागा आवश्यक आहे. हा नियम घर असो, कार्यालय असो, बाजार असो किंवा इतर ठिकाणी असो सगळीकडे लागू होतो. ही समस्या सोडविण्यासाठी त्या शहरांच्या गरजेनुसार पार्किंग धोरणात स्पष्टता आणली आणि त्याचे उद्दिष्ट आणि सामंजस्य त्यांच्यात निर्माण झाले तर समस्या कमी होण्यास मदत होईल. तसेच बेकायदा पार्किंगची समस्या सोडविण्यासाठी आणि पार्किंग शुल्क वसूल करण्यासाठी खाजगी कंपन्यांची मदत घेतली जाऊ शकते. ■

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास क्रीडा स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद



▶ क्रीडा स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपदाचा पुणे विद्यापीठाचा संघ

## सांस्कृतिक स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठास

## पुणे विद्यापीठाची पूजा गवई गोल्डन वूमन

## आंतरविद्यापीठ महिला कर्मचारी महोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ जून -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या यजमानपदाखाली आयोजित करण्यात आलेल्या आंतरविद्यापीठ महिला कर्मचारी महोत्सवात क्रीडा स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तर सांस्कृतिक स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने पटकाविले.

विद्यापीठाच्या प्रांगणात तीन दिवस रंगलेल्या या क्रीडा आणि सांस्कृतिक म होत्सवात राज्यातील ५ विद्यापीठांच्या महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या क्रीडा गुणांचे आणि कला कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. या सर्व चुरशीच्या लढतींमध्ये तब्बल २२ गुणांची कमाई करत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक ने यंदाच्या सर्वसाधारण चषकावर आपले नाव कोरले. तर यजमान पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने १७ गुणांसह द्वितीय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ८ गुणांसह तृतीय स्थान पटकावले.

या संपूर्ण स्पर्धेत आपल्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पूजा अरुण गवई यांनी क्रीडा रसिकांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनी बॅडमिंटनमध्ये प्रथम, वैयक्तिक नृत्यात प्रथम आणि खो-खो स्पर्धेतही सुवर्ण कामगिरी बजावली.

त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना स्पर्धेतील मानाचा गोल्डन वुमन हा विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभास प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून कवयित्री डॉ. स्वाती शिंदे-पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य राजाभाऊ सरवदे, डॉ. प्रभाकर कोळेकर, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, डॉ. केदारनाथ काळवणे, डॉ. अनिल घनवट आदी उपस्थित होते.

सहभागी स्पर्धक पूजा गवई, माधुरी आहेर आणि सुवर्णा खैरनार यांनी मनोगत व्यक्त करताना सोलापूर विद्यापीठाने प्रथमच आयोजित केलेल्या या महोत्सवाचे भरभरून कौतुक केले. राज्यातील महिला कर्मचाऱ्यांना एकत्र आणणारा आणि त्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा महोत्सव दरवर्षी आयोजित व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. प्रमुख अतिथी डॉ. स्वाती शिंदे-पवार यांनी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्षीय समारोपात प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी विद्यापीठ भविष्यातही महिला कर्मचाऱ्यांसाठी अशा दर्जेदार स्पर्धा व महोत्सवांचे आयोजन करण्यासाठी कटिबद्ध राहील, असे सांगितले

प्रारंभी क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. यशपाल खेडकर यांनी केले. डॉ. केदारनाथ काळवणे यांनी आभार मानले.



▶ सांस्कृतिक स्पर्धेतील विजेता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकचा संघ.

### रस्सीखेच स्पर्धेत सोलापूर विद्यापीठास विजेतेपद

अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या रस्सीखेच स्पर्धेत यजमान पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीच्या संघाने द्वितीय, तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या महिला संघाने तृतीय क्रमांक मिळवला.

**सोलापूरचा विजेता संघ :** धनश्री जाधव, सुप्रिया अनभुले, फैजुन्निसा नाईकवाडी, जनाबाई राख, लक्ष्मी आढाव, कल्पना केत, रोहिणी पेन्सिलवार, आश्विनी चवरे, डॉ. पी. एल. सावंत, ज्योती कोकणे, लक्ष्मीबाई माडे, निलोफर बागवान, संध्याराणी लोखंडे.

**अंतिम निकाल याप्रमाणे :**

**क्रीडा स्पर्धा-**

**रोड रेसः (प्रथम पाच):** वैशाली हुबे (पुणे), राणी भाईदास भिल (राहुरी), गंगा राठोड (गडचिरोली), चंद्रकला बाचकर (नाशिक), सुप्रिया अनभुले (सोलापूर). **बॅडमिंटन (प्रथम तीन) :** पूजा अरुण गवई, शैलजा विजय बोंद्रे (पुणे), कविता भगवान काकडे (राहुरी). **खोखो :** पुणे, सोलापूर विद्यापीठ, गोंडवाना गडचिरोली.

**सांस्कृतिक स्पर्धा -**

**रांगोळी :** डॉ. शुभांगी कदम (राहुरी), सुप्रिया अनभुले (सोलापूर), ज्योती इटनकर (नाशिक). **गायन :** चेतना पवार , अमृता खर्डे कर (नाशिक), अनिता भोसले (सोलापूर).

**नृत्य :** पूजा गवई (पुणे), सुवर्णा खैरनार (नाशिक) निलोफर बागवान (सोलापूर).

**समूहगीत :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान नाशिक, सोलापूर विद्यापीठ, पुणे विद्यापीठ.

**समूहनृत्य :** सोलापूर, गडचिरोली, नाशिक.



▶ रस्सीखेच स्पर्धेतील विजेता सोलापूर विद्यापीठाचा संघ.

---

## महत्वाचे...







### सीईटी-पीसीएम फर्स्ट अटेम्प्ट परीक्षेत वालचंदचा अनिकेत खडके प्रथम

**सोलापूर, दि.१७ जून-**

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात आलेल्या सीईटी-पीसीएम गटाच्या फर्स्ट अटेम्प्ट परीक्षेत वालचंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या ३४ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक पर्सेंटाईल मिळवत महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपरेला साजेशी कामगिरी केली. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सर्व विश्वस्त, प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे तसेच सीईटी समन्वयिका सारिका महिंद्रकर यांनी अभिनंदन केले.

अनिकेत खडके ९९.८९ टक्केसह प्रथम. त्याच्यासह रेवनेश सुतार ९९.८३, स्वयम वनकुद्रे ९८.५८, सोनाली नंदी ९८.१९, अनुष्का बब्बूर ९७.८०, प्रणव साखरे ९६.५९, श्रद्धा कापसे ९६.४०, नितीन कोंकटी ९५.९४, आकांक्षा सुतार ९५.९३, कोमल हुक्केरी ९५.६८, गुलनाज पठाण ९५.३१, वैष्णवी अल्लोली ९५.१३, ओंकार श्रीपुरम ९५.१२, मोहम्मद झियान चौधरी ९५.०७, समर्थ चिप्पा ९४.४८, सुकन्या साखरे ९३.८८, सबरीन मुजावर ९३.८४, ओंकार साबळे ९३.७२, अमूल्या होतगोंड - ९३.७२, समर्थ उन्नद ९३.७०, मधुमाला चव्हाण ९३.००, रमजान शेख ९२.५६, नोमान पीरजादे ९२.५२, श्रवण पटेल ९२.४९, अनिकेत इराबत्ती ९२.१५, वैष्णवी चोपडे ९१.९५, घनशाम नक्का ९१.२५, हर्षवर्धन शितोळे ९०.८२, तनुश्री चिन्नी ९०.६२, आर्यन वेर्णेकर ९०.५१, मनीषा कनकुंटला ९०.२३, विशांत गंदगे ९०.१२, रसिका साळुंखे ९०.१२, पूनम साखरे ९०.०४ यांनी विशेष यश मिळिवले.

## जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात

### सेवानिवृत्त सभासदांचा गौरव, गुणवंत पाल्यांचा सत्कार; सर्व विषयांना सर्वानुमते मंजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

सोलापूर जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था (क्र.२) मर्यादित, सोलापूरची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. १३ जून २०२६ रोजी समाजकल्याण केंद्र, सोलापूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. संस्थेचे चेअरमन रणजित शिवाजी घोडके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला सभासदांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

सभेची सुरुवात प्रमुख मान्यवर सेवानिवृत्त सभासद क्षीरसागर, वासुदेव घाडगे, पांडुरंग शिंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. पतसंस्थेचे चेअरमन रणजित घोडके यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेत सभासदांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संस्थेचे सचिव बापूराव जगताप यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले. सभेतील सर्व विषयांना उपस्थित सभासदांनी सर्वानुमते मंजुरी दिली.

यावेळी संस्थेच्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच संस्थेच्या विकासात योगदान देणाऱ्या



सेवानिवृत्त सभासदांचा शाल, श्रीफळ आणि मानाचा फेटा देऊन गौरव करण्यात आला. या उपक्रमामुळे सभागृहात भावनिक आणि आनंददायी वातावरण निर्माण झाले.

सभेचे प्रास्ताविक संचालक गिरीष यल्लप्पा जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन व्हाईस चेअरमन शशिकांत दत्तात्रय साळुंखे यांनी केले. याप्रसंगी मानद सचिव श्रीकृष्ण शंकर घंटे, खजिनदार प्रदीप विश्वनाथ सगट, संचालक सुधाकर माने-देशमुख, श्रीकांत धोत्रे, शिवाजी कांबळे, अंकुश कोळेकर, मोहन यादव, दिनेश बनसोडे, समीर शेख, भीमाशंकर वाले, महेश जाधव तसेच संचालिका संगीता हांडे आणि राणी सुतार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सभेच्या यशस्वी आयोजनासाठी सचिव बापूराव जगताप, संतोष जाधव, शामराव बोरगे आणि उमाकांत शहापूरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या सभेने संस्थेच्या एकोप्याची आणि प्रगतीशील वाटचालीची साक्ष दिली.




## महात्मा फुले मंडळातर्फे बालकामगार विरोधी दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

बाल कामगार विरोधी दिन महात्मा फुले समाज सेवा मंडळ, करमाळा यांच्या वतीने सोलापूर येथील रेल्वे स्टेशन मध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी सोलापूर रेल्वे स्टेशनचे स्टेशन मास्तर श्रीवास्तव हे उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून रेल्वे पोलीस एपीआय यादव, ॲड. किनीकर उपस्थित होत्या. महात्मा फुले समाजसेवा मंडळाच्या वतीने जिल्हा समन्वयक रजनीगंधा गायकवाड यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना वामन बावळे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार सुजाता कांबळे यांनी मानले. कार्यक्रमानंतर बालकाम गार विरोधी दिन यांची प्रार्थना सुजाता कांबळे यांनी म्हटली.

### वाळूची चोरून वाहतूक; वाळूसह टिप्पर पकडला

**सोलापूर, दि. १७ जून-**

वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या एका नंबर प्लेट नसलेल्या टिप्पर वाहनाला सलगरवाडी येथे १६ जून रोजी पहाटे सव्वा एक वाजता पकडण्यात आले. तीन ब्रास वाळु, टिप्पर वाहन मिळून ३ लाख १५ हजार रु किमतीचा मुद्देमाल मिळून आला आहे. याप्रकरणी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात टिप्पर चालक व मालका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

टिपरचा मालक योगेश कार्वे कर, रा.सोलापूर) असे गुन्हा दाखल आरोपीचे नावे असून याबाबत विजयकुमार जंगप्पा माने (वय-५५ वर्षे, रा घरनं ६९ साई होम्स आदित्य नगर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. सलगरवाडी परिसरात १६ जून रोजी पहाटे नंबर प्लेट नसलेल्या टिपर मध्ये वाळु मिळुन आली. यावेळी वाहन चालक नाव पत्ता न सांगता निघुन गेला तर टिप्पर मालक कडे वाळू वाहतुकीचा महसुल विभागाचा कोणताच परवाना मिळून आला नाही. वरील आरोपी हे वाळु चोरुन वाहतुक करताना मिळुन आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार कुतवळ हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

### ‘ई’ निविदा सूचना

मान्यताप्राप्त अनुभवी कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता निविदा मागवण्यात येत आहेत. इतर सर्व निविदा माहिती https://tender.mahadiscom.in/eatApp या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निम्नस्वाक्षरीधारकांकडे कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणेबाबत अधिकार राखून ठेवले आहेत.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम | अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | EE/PPR/T-10/2026-27 | विविध क्षमतेच्या थ्री–फेज ट्रान्सफॉर्मर डिस्ट्रिब्युशन बॉक्सेसची दुरुस्ती आणि देखभाल (रिकंडिशनिंग ) तसेच संबंधित कामे. | १० लाख | 24.06.2026 |
| २ | EE/PPR/T-11/2026-27 | फिल्टर युनिट येथे RSJ/PSC पोल, वितरण रोहित्र, मिटर्स, ऑईल बॅरल वाहतूक व इतर साहित्याची चढ–उतार करणे | ०५ लाख | 24.06.2026 |

ई निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशीलासह व विहित नमुन्यात सादर करावी.
**ऑफिसचा पता :–** कार्यकारी अभियंता, पोल फॅक्टरी जवळ, लिंक रोड, पंढरपूर, ता. पंढरपूर जि. सोलापूर
**PRO / BMTZ / 50 / 2026-27** **कार्यकारी अभियंता, महावितरण (संवसु) विभाग पंढरपूर**

### मध्य रेल्वे
**सोलापुर मंडळ**
**लिनेन सामग्री वितरण कार्य**

डीआरएम (एम) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामासाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा आमंत्रित करत आहे. निविदा सूचना क्रमांकः GEM/2026/B/7651235 दिनांकः 16/06/2026 तपशीलः कामाचे नाव आणि त्याचे ठिकाण. तपशील : सोलापूर विभागाच्या सोलापूर आणि कलबुर्गी कोचिंग डेपोच्या प्राथमिक देखभाल केलेल्या ट्रेन्सच्या एसी डब्यांमध्ये लिनेन वितरण मदतनीस (अटेंडंट)चे कंत्राट. निविदा पद्धतीः दोन पाकीट पद्धती. कामाची अंदाजे किंमतः रु. 3,95,18,815.84/-, निविदा फॉर्मची किंमत : निरंक, ज्या कार्यालयातून निविदा फॉर्म खरेदी केला जाऊ शकतो तो पत्ता : डीआरएम(एम) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, बयाणा रक्कम जमा करायची रु. 3,47,600/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी : काम सुरू झाल्याच्या तारखेपासून 1 वर्ष आणि 8 महिने. निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ : 07/07/2026 रोजी 12.00 वाजता. निविदा उघडण्याची तारीख आणि वेळः 07/07/2026 रोजी 12.30 वाजता. वेबसाइटचे तपशील आणि नोटीस बोर्डचे ठिकाण जिथे निविदेचा संपूर्ण तपशील पाहिला जाऊ शकतोः www.gem.gov.in
**व.मं.या.अ.**
रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे. 25

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः भांडगांव तालुका परंडा व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :-** डि धाराशिव सब डि व ता. परंडा पैकी मौजे भांडगांव येथील घरजागा ग्रामपंचायत मिळकत नं. १४७/३ याचे क्षेत्र ८७४.०० चौ. फुट यांसी चतुःसिमा :- पुर्वेस : सुभाष अंधारे, दक्षिणेस : भावकी रस्ता, पश्चिमेस : सदर नंबर पैकी जागा व उत्तरेस : माळी मंडळी येणेप्रमाणे वर्णनाची खुली घरजागा ही श्री. लहू चांगदेव अंधारे यांचे मालकीची असून सदरची जागा हक्कपत्रकी त्यांचे नांवे नोंद आहे. श्री. लहू चांगदेव अंधारे हे सदरची मिळकत त्यांची मुले श्री. संदीप लहू अंधारे व श्री. प्रदीप लहू अंधारे यांच्या नांवे हस्तांतरीत करुन सदर मिळकत बँकेस तारण देऊन त्यावर कर्ज घेऊ इच्छितात. तरी सदर मिळकतीवर कोणचेही कसलेही हक्क हितसंबंध. उदा. गहाण, दान, लीज, लीन, पोटगी, चोळी-बांगडी, टाच, बोजा, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आमचे वकिलांना वर दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील हे, सदर मिळकतीशी कोणाचाही, कसलाही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास त्याने तो स्वखुशीने सोडून दिलेला आहे, असे समजून सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदरची मिळकत आपल्या मुलाच्या नांवे खरेदीखताने अथवा बक्षीसपत्राद्वारे अथवा अन्य मार्गाने हस्तांतरीत करतील. सदरचा हस्तांतरणचा दस्त नोंदणीकृत झाल्यानंतर कोणची कसलीही हरकत आल्यास ती आमचे अशिलांच्या हक्काधिकारांवर बंधनकारक राहणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये, म्हणून ही खरेदीपूर्व/हस्तांतरणपूर्व जाहीर नोटीस दिली असे. कळावे.

दिनांक १६/०६/२०२६

**सही/-**
**ॲड. प्रवीण परशुराम करंजकर**
**पाटील प्लॉट, कर्मवीर नगर,**
**बार्शी मो.नं. ९८२२०६५६६१**

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, डि ।। व सब डि ।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे नंदूर येथील शेतजमीन यासी गट नं. १४४/२ याचे क्षेत्र ३ हेक्टर २३ आर यासी आकार रु. ८.४५ इतके आहे. यासी चतुः सिमा :- पुर्वेस : गट नं. १४४ पैकी उर्वरीत जमीन, पश्चिमेस : गट नं. १४१, दक्षिणेस : गट नं. १४३ व उत्तरेस : गट नं. १४५ व १४६.

सदरची मिळकत ही श्री प्रवीण हिरालाल पवार यांचे वैयक्तीक मालकी व कब्जे वहिवाटी असून आमचे अशिल सदरहू मालकांकडून खूषखरेदी करणार आहेत. सबब सदर मिळकतीत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हिस्सा व हितसंबंध असेल तर ही नोटीस प्रसिध्द झालेपासून पंधरा दिवसांचे आत खालील नमुद पत्यावर त्यांनी आपली लेखी हरकत कागदपत्रांसह नोंदवावी. त्यानंतर मात्र कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही नोटीस दिली. ता, १७ जून २०२६

**सही/-**
**ॲड. नीदा अनिस सैफन**
**बी.ए., एलएल.एम. डिप्लोमा इन सायबर क्राईम**
**रा. ब्लॉक नं. १४, जीवनज्योती हौसिंग सोसायटी,**
**आयकर कॉलनी, रंगभवन मागे, सोलापूर**
**मोबाईल - ९१७५५७०१८४ अशिलातर्फे ॲडव्होकेट**

### जाहीर प्रसिध्दीकरण

तमाम लोकास विशेषतः तालुका करमाळा, जि. सोलापूर येथील सर्व नागरीक, शाळेचे विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच संबंधित शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, विद्या विकास मंडळ, करमाळा नोंदणी क्रमांक एफ१०३ सोलापूर या संस्थेमार्फत करमाळा येथे सुरू असलेली राणा नोबल इंग्लिश स्कूल (१ ली ते १२ वी इंग्रजी माध्यम) माध्यमिक हे शैक्षणिक युनिट सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीसह क्रांतीज्योती बहुउद्देशीय संस्था, जेऊर तालुका करमाळा जिल्हा सोलापूर नोंदणी क्रमांक ००००१५८/२०२६/सोलापूर या संस्थेचा हस्तांतरीत व स्थलांतरित प्रस्ताव मान्यतेसाठी मा. शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

तमाम लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, उपरोक्त शैक्षणिक युनिट हस्तांतरणासंबंधी व स्थलांतरसंबंधी काही हरकत, अडचणी, शंका, तक्रार इत्यादी असल्यास माननीय शिक्षण उपसंचालक विभाग पुणे यांचेकडे लेखी पत्राद्वारे १५ दिवसांच्या आत कळविण्यात यावे. त्यानंतर आलेल्या तक्रारींचा अजिबात विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली तारीख :- १७/०६/२०२६

**सही/-**
**मा. शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग पुणे**

### जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. ४२/२०२६
नि. ५

**बार्शी येथील मे. अति. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात जिल्हा व सत्र न्यायालय. क. २, बार्शी**

**१) सारांश अजय रगडे,**
वय - ०४ वर्षे, (अज्ञान) धंदा - शिक्षण,
रा. सि.नं.३१, फ्लॅट नं. १०३, ४था मजला,
शर्वय बिल्डींग, अमृत, खान जांभुळवाडी रोड,
लिपने वस्ती, कात्रज, पुणे
**२) श्री. अजय हरी रगडे,**
वय - ३५ वर्षे, धंदा - शेती
रा. सदर, स्वतःकरिता व
अर्जदार नं. १ चे अ.पा.क. वडिल म्हणून — **प्रतिवादी**

विरुध्द

**महाराष्ट्र शासन (यांचे समन्स / नोटीस सहाय्यक सरकारी अभियोक्ता बार्शी यांना बजावण्यात यावे)** — **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांनी मौजे डि सोलापुर सब डि व ता. माढा पैकी मौजे तांदुळवाडी येथील शेतजमिन गट नं. २१२/२ याचे एकूण क्षेत्र ११ हे ९७ आर आकार ११ रू. १० पैसे या पैकी ०२ हे ०० आर आकार ०१ रू. ९० पैसे ही अज्ञानाची शेतजमिन विकणेकामी परवानगी मिळणेसाठीचा अर्ज मे. कोर्टात आणलेला असून सदर शेतजमिन विक्री करणेकामी कोणाची कोणत्याही प्रकारचा हरकत असेल तर किंवा सदर मिळकतीसंबंधी कोणताही खरेदी, विक्री, गहाण, दान, बोजा, लिज, चोळी-बांगडी, पोटगी, अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध व हरकत असेल तर सदर प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख दि. २३/०७/२०२६ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी.

त्याअर्थी, कोणाचेही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदर शेतजमिन विक्री करणेबाबत परवानगी देण्यात येईल. कळावे. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता. १७/०६/२०२६

**सही/-** **क. लिपिक** (कोर्टाचा शिक्का) **सही/-** **सहा. अधिक्षक** **जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि ।। व सब डि ।। सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी जिल्हा परिषद हद्दीतील मौजे धोत्री येथील शेतजमीन यांसी गट नं. १३३/२ याचे एकूण क्षेत्र ५ हे. ३० आर, यापैकी राकेश रामकृष्ण पुदाले यांचे मालकीचे क्षेत्र ० हे. ८० आर, आकार रु. ०.७१ पैसे इतके आहे. यांसी चतुःसिमा :- पुर्वेस : राहुल गिरीष चिंता, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : शांतकुमार सिध्दप्पा चौगुले यांची जमीन, उत्तरेस : रस्ता असे आहे. सदर शेतजमीन ही राकेश रामकृष्ण पुदाले यांचे मालकीची असून त्याप्रमाणे ७/१२ उताऱ्यावर त्यांचे नावाची नोंद फेरफार क्र. ३३३३ ने झालेली आहे. सदर शेतजमीन त्यांनी आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून इसारापोटी रक्कम स्विकारुन इसारा पावती लिहून दिलेली आहे. सदरची शेतजमीन निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री त्यांनी आमचे अशिल यांस दिलेली आहे.

तरी परंतु सदर मिळकतीत कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, करार, दान, लिज, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, वाटणी, पोटगी, टाच, जप्ती, कुळ, वहिवाट, कब्जाकरार, मदार, या संबंधीचा हक्क असलेस आणि इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचा बोजा, हक्क व हितसंबंध असलेस अथवा सदर मिळकती सबंधी कोणाचीही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास अथवा कोणत्याही प्रकारे सावकारी बोजा असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ४ (चार) दिवसांचे आत सदर मिळकतीत असलेले हक्क, दर्शविणारे कागदपत्रे पुराव्यासह खालील नमुद पत्यावर प्रत्यक्ष येऊन असलेल्या हक्काची खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार व हरकत न आल्यास ठरल्याप्रमाणे आमचे अशिल यांनी वरील मिळकतीचे मालकांबरोबर ठरवलेला वर नमुद मिळकती संबंधीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर सदर व्यवहारास कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार उपस्थित झाल्यास ते आमचे अशिल यांचेवर अगर त्यांनी खरेदी करुन घेतलेल्या मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाची फसवणूक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ही जाहीर नोटीस दिली ता. १७/०६/२०२६.

**सही/-**
**के.एम. शेख ॲन्ड एम.ए. नालवार**
**ॲडव्होकेट्स**
**कार्यालय पत्ता : गाळा नं. ९, लोखंडवाला टॉवर,**
**पानगल शाळेसमोर, जिल्हा परिषद रोड, सोलापूर**
**मो.नं. ९८२२५२६५६५, ९१७५४००४४४**



## महत्त्वाचे

### झिनेदिन झिदानचा मुलगा, लुका विश्वचषकात



कॅन्सस सिटी : फ्रेंच फुटबॉलमधील दिग्गज खेळाडू झिनेदिन झिदान याचा मुलगा, २८ वर्षीय लुका झिदान, फिफा विश्वचषकात खेळत आहे. या स्पर्धेसाठी अल्जेरियाच्या २६ सदस्यीय संघात त्याची निवड करण्यात आली आहे. विश्वचषकाच्या मंचावर अल्जेरियाचे प्रतिनिधित्व केल्यामुळे फुटबॉलमधील अत्यंत प्रसिद्ध आडनाव सोबत असतानाही, लुका आपल्या समृद्ध फुटबॉल वारशाचा मार्ग अनुसरत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यास सुरुवात करत आहे. झिनेदिन झिदानने १९९८ मध्ये आपल्या देशात (फ्रान्समध्ये) झालेल्या विश्वचषकात फ्रान्स संघाला पहिले विजेतेपद मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

# मेस्सीची विश्वविक्रमी हॅटट्रिक

## गतविजेत्या अर्जेंटिनाचा अल्जेरियावर ३-० ने विजय



**कान्सास सिटी, १७ जून**

विश्वविजेत्या अर्जेंटिनाच्या स्टार फुटबॉलपटू ३८ वर्षीय लिओनेल मेस्सीने २३ व्या फिफा फुटबॉल विश्वचषकात जादुई कामगिरी केली. मेस्सीने आपल्या कारकीर्दीत सहाव्या फिफा विश्वचषकांत खेळताना ॲरोहेड स्टेडियम येथे अल्जेरियाविरुद्धच्या सलामीच्या सामन्यात पहिल्यांदाच हॅट् ट्रिक साजरी केली, यंदाच्या विश्वचषकातील ही पहिलीच हॅट् ट्रिक ठरली. या स्पर्धेतील सर्वाधिक १६ गोलच्या मिरोस्लाव क्लोस यांच्या सर्वकालीन विक्रमाशी बरोबरी केली आहे. मेस्सीने विश्वचषकासाठी एक नवा मापदंड प्रस्थापित केला आहे. त्याच्या विश्वविक्रमी कामगिरीच्या बळावर अर्जेंटिनाने अल्जेरियावर सरळ ३-० गोलने विजय नोंदवून आपल्या विश्वविजेतेपद कायम राखण्याच्या अभियानाची दणकेबाज सुरूवात केली. फिफा विश्वचषकाच्या इतिहासात मेस्सी सर्वाधिक गोल नोंदविणारा दुसरा खेळाडू ठरला. गतविजेते म्हणून विश्वचषकातील आपला सलामीचा सामना जिंकण्याची अर्जेंटिनाची ही पहिलीच वेळ होती; यापूर्वी १९८२ आणि १९९० मध्ये त्यांना पराभवाचा सामना करावा लागला होता.

सामन्याच्या प्रारंभीच मेस्सीने आपल्या लौकीकास साजेसा खेळ करत पहिला गोल नोंदविला, परंतु तो नियमबाह्य असल्याचे घोषित करून पंचांनी त्याचा तो गोल नाकारला. त्यानंतर काही क्षणांनी अल्जेरियाच्या आक्रमक खेळाडूनेही गोल केला, परंतु तोही पंचांनी नियमबाह्य असल्याचे जाहीर केले. १७ व्या मिनिटाला मेस्सीला ही कोंडी फोडण्यात यश आले. सवंगड्याच्या सहकार्यातून डीमध्ये मिळालेल्या पासवर मेस्सीने अल्जेरियाच्या गोलरक्षकाला हुलकावणी देत गोल केला. मध्यंतरपर्यंत अर्जेंटिनाने १-० अशी आघाडी मिळविली. मेस्सीच्या प्रभावाने अल्जेरियाचा संपूर्ण संघ काहीसा दडपणाखाली खेळत होता. त्याचाच लाभ घेत अर्जेंटिनाने जोरदार आक्रमण केले. व मेस्सीने ६० व्या मिनिटाला झकासरीत्या गोल केला. त्यानंतर ७६ व्या मिनिटाला मेस्सीने सहजपणे आणखी एका गोलची भर घालून अर्जेंटिनाचा सरळ तीन गोलने विजय सुनिश्चित केला. (वृत्तसंस्था)

### निखिल, दीपक, स्नेहची विजयी कामगिरी

**गुईयांग, १७ जून**

चीनमधील गुईयांग येथील 'गुईयांग ऑलिम्पिक स्पोर्ट् सेंटर जिम्नॅशियम'मध्ये सुरू असलेल्या मुष्टियुद्ध विश्वचषक (टप्पा २) स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी भारतीय खेळाडू निखिल, दीपक आणि स्नेहने विजय मिळवत आपापल्या वजनी गटात पुढील फेरी गाठली.

पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात खेळताना, निखिलने ब्राझीलच्या केल्वी ट्रिंडाडेचा ५-० अशा एकमताने पराभव करत स्पर्धेत आगेकूच केली.

पुरुषांच्या ७० किलो गटात दीपकनेही तितकेच वर्चस्व गाजवत पुढील फेरी गाठली; त्याने जपानच्या सेवोन ओकाझावाचा ५-० असा पराभव केला. महिलांच्या गटात, स्नेहने (६५ किलो) दक्षिण कोरियाच्या सियोन सुजिनवर ४-१ असा संघर्षपूर्ण विजय मिळवत पुढील फेरी गाठली. स्पर्धेच्या चौथ्या दिवशी दोन भारतीय खेळाडू रिंगमध्ये उतरणार आहेत. (वृत्तसंस्था)

## आजचे सामने

### फिफा फुटबॉल विश्वचषक

**झेक प्रजासत्ताक वि. दक्षिण आफ्रिका**
**वेळ :** गुरुवार, ९.३० वाजतापासून
**स्थळ :** मर्सिडीज-बेंझ स्टेडियम, अटलांटा


**स्वित्झर्लंड वि. बोस्निया ॲण्ड हर्झेगोविना**
**वेळ :** गुरुवारी रात्री १२.३० वाजतापासून
**स्थळ :** सोफी स्टेडियम, लॉस एंजेलिस

**कॅनडा वि. कतार**
**वेळ :** गुरुवारी पहाडे ३.३० वाजतापासून
**स्थळ :** बीसी प्लेस, व्हँकुव्हर

**मेक्सिको वि. दक्षिण कोरिया**
**वेळ :** शुक्रवारी सकाळी ६.३० वाजतापासून
**स्थळ :** एस्टाडिओ अक्रोन, ग्वाडालजारा

# फ्रान्सचा सेनेगलवर ३-१ ने विजय

### एमबाप्पेचे दोन गोल



**न्यू जर्सी, १७ जून**

फिफा २०२६ विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत आपल्या सलामीच्या सामन्यात फ्रान्सने संथ सुरुवात आणि एका वादग्रस्त पेनॉल्टीच्या निर्णयावर मात करत सेनेगलला ३-१ ने हरवले.

व्हीएआरने पंचांना मॉनिटरवर पाठवूनही पेनॉल्टी नाकारण्यात आल्यानंतर किलियन एमबाप्पेने पहिला गोल केला, त्यानंतर ब्रॅडली बारकोलाने एका अप्रतिम फटक्याने फ्रान्सची आघाडी दुप्पट केली.

पॅरिस सेंट-जर्मेनचा किशोरवयीन खेळाडू इब्राहिम म्बायेने स्टॉपेज टाइममध्ये सेनेगलसाठी एक गोल करून पिछाडी कमी केली, पण लगेचच एमबाप्पेने एका जोरदार फटक्याने दोन गोलची आघाडी पुन्हा मिळवून दिली. पूर्वार्धात अनेक संधी गमावल्याबद्दल सेनेगलला पश्चात्ताप करावा लागला, यात निकोलस जॅक्सनने मारलेला फटका पोस्टला लागला आणि इस्माईला सारने अगदी जवळून मारलेला फटका अनाकलनीयपणे क्रॉसबारच्या वरून गेला. (वृत्तसंस्था)

# नॉर्वेचा इराकवर शानदार विजय

### अर्लिंग हालंडचे दोन गोल



**बॉस्टन, १७ जून**

बॉस्टन येथे झालेल्या 'गट आय' मधील सलामीच्या सामन्यात अर्लिंग हालंडने आपल्या विश्वचषक पदार्पणाच्या सामन्यात दोन गोल करत नॉर्वेला इराकविरुद्ध ४-१ असा विजय मिळवून दिला.

नॉर्वेचे २८ वर्षांनंतर विश्वचषकातील हे पुनरागमन होते. मॅन्चेस्टर सिटीचा आक्रमक खेळाडू हालंड याने एखाद्या मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आपला पहिला गोल नोंदविला आणि नॉर्वेला इराकविरुद्ध दमदार विजय मिळवून दिला. सामन्याच्या २९ व्या मिनिटाला जवळून गोल करत हालंडने नॉर्वेला आघाडी मिळवून दिली, परंतु आयमेन हुसेनच्या हेडरमुळे इराकने बरोबरी साधली. त्यानंतर, मध्यंतरापूर्वी प्रतिस्पर्धी संघाच्या बचाव फळीतील चुकीचा फायदा घेत हालंडने नॉर्वेला पुन्हा आघाडी मिळवून दिली आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील आपली एकूण गोलसंख्या ५१ सामन्यांत ५७ वर नेली. पर्यायी खेळाडू म्हणून मैदानात उतरल्यानंतर काहीच वेळात लिओ ओस्टिगार्डने हेडरद्वारे नॉर्वेसाठी तिसरा गोल केला आणि विजयावर शिक्कामोर्तब केले. त्यानंतर, 'स्टॉपेज टाइम'च्या उत्तरार्धात हुसेनने स्वतःच्याच गोलपोस्टमध्ये चेंडू मारल्याने (आत्मघाती गोल) नॉर्वेला चौथा गोल मिळाला. (वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रियाचे यशस्वी पुनरागमन



**सॅन फ्रान्सिस्को, १७ जून**

फिफा फुटबॉल विश्वचषकात ऑस्ट्रियाने यशस्वी पुनरागमन करताना चुरशीच्या सलामीच्या सामन्यात जॉर्डनवर ३-१ अशा गोलफरकाने विजय नोंदविला.

दोन्ही संघांसाठी हा एक अत्यंत महत्त्वाचा सामना होता, कारण १९९८ नंतर ऑस्ट्रियाचे विश्वचषकात पुनरागमन झाले होते, तर जॉर्डनने या स्पर्धेत पदार्पण केले होते. ऑस्ट्रियाचे हे पुनरागमन यशस्वी ठरले आणि त्यांनी एका चुरशीच्या लढतीत जॉर्डनचा ३-१ असा पराभव केला.

रोमानो श्मिडने (२१ व्या मिनिटाला) एका सुंदर 'कर्लिंग' फटक्याद्वारे ऑस्ट्रियाच्या संघाला आघाडी मिळवून दिली.

मात्र, जॉर्डनचा संघ सुद्धा मागे राहिला नाही; अली ओल्वानने गोल करत संघाला बरोबरी साधून दिली आणि सामन्यात परत आणले. तरीही, याझन अल-अरबचा 'आत्मघाती गोल' (स्वतःच्याच गोलपोस्टमध्ये केलेला गोल) आणि मार्को अर्नाउटोविचची पेनॉल्टी यामुळे राल्फ रँगनिक यांच्या ऑस्ट्रिया संघाचा विजय निश्चित झाला आणि त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. (वृत्तसंस्था)

# शुभमन गिल, ईशान किशनची शतके

### अफगाणिस्तानविरुद्ध भारताचा ४०२ धावांचा डोंगर



ईशान- शुभमन

**लखनौ, १७ जून**

अफगाणिस्तानविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात शुभमन गिलने आपले नववे आणि ईशान किशनने दुसरे शतक झळकावले. या दोघांच्या दमदार शतकी खेळीच्या बळावर भारताने अफगाणिस्तानविरुद्ध ४०२ धावांचा डोंगर उभारला आणि अफगाणिस्तानसमोर विजयासाठी ४०३ धावांचे लक्ष्य ठेवले.

अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. लखनौच्या कडक उन्हात शुभमन गिल व ईशान किशनने अफगाणिस्तानच्या गोलंदाजीची चांगलीच धुलाई केली; त्यांनी तिसऱ्या गड्यासाठी १४१ चेंडूंत २२४ धावांची भागीदारी केली. यात गिलने ११० चेंडूंत २२ चौकार व २ षटकारसह १५४ धावा, तर किशनने ७९ चेंडूंत १४ चौकार व ७ षटकारांसह १२५ धावा केल्या. या आक्रमक फलंदाजीनंतरही अफगाणिस्तानने सामन्यात पुनरागमन केले; त्यांनी शेवटच्या दहा षटकांत ६२ धावांत ७ बळी घेत भारताला रोखले, अन्यथा एका टप्प्यावर भारताची धावसंख्या ४५० किंवा त्याहून अधिक जाण्याची शक्यता होती.

भारताने प्रिन्स यादव व दरविश रसूलीला वन-डे पदार्पणाची संधी दिली. दुसऱ्याच षटकात यशस्वी जयस्वाल (४) बाद झाला. भरवशाचा खेळाडू रोहित शर्मा (४८) याचे दोन धावांनी अर्धशतक हुकले. श्रेयस अय्यरने २६ धावांची भर घातली. केएल राहुल (०) व वॉशिंग्टन सुंदर (१९) लवकरच बाद झाले. (वृत्तसंस्था)

# 'भारत अ' अंतिम फेरीत दाखल

### तिलक वर्मा, प्रियांश आर्या, कुशाग्राची चमकदार कामगिरी



प्रियांश आर्या

**डाम्बुला, १७ जून**

सोमवारी 'श्रीलंका अ' विरुद्धच्या अटीतटीच्या सामन्यात 'सुपर ओव्हर'मध्ये पराभव पत्करावा लागल्यानंतर, 'भारत अ' संघाने बुधवारी 'अफगाणिस्तान अ' विरुद्धच्या 'करा किंवा मरा' सामन्यात शानदार पुनरागमन केले. 'भारत अ' संघाने १०१ धावांनी विजय नोंदविला आणि तिरंगी मालिकेच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. अंतिम फेरी गाठण्यासाठी विजयाची गरज असताना, 'भारत अ' संघाने अफगाणिस्तानचा डाव ३६.५ षटकांत २१८ धावांवर गुंडाळला.

'भारत अ'च्या फलंदाजांनी लखनौमधील वरिष्ठ संघाप्रमाणे प्रचंड धावा केल्या नाहीत, तरीही तिलक वर्मा, प्रियांश आर्या व कुमार कुशाग्रा यांच्या अर्धशतकांच्या जोरावर त्यांनी ९ बाद ३१९ अशी आव्हानात्मक धावसंख्या उभारली. डाम्बुलाची खेळपट्टी फिरकी व उसळीसाठी अनुकूल होती.

निशांत सिंधूच्या (३१ धावांत ४ बळी) नेतृत्वाखालील 'भारत अ'च्या फिरकीपटूंनी या परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेतला आणि 'अफगाणिस्तान अ'ला विजयाच्या लक्ष्यापासून १०२ धावा दूरच रोखले.

२५ व्या षटकापर्यंत ३ बाद १५७ अशी स्थिती असलेल्या अफगाणिस्तानचा डाव नंतर कोसळला आणि ते २१८ धावांत सर्वबाद झाले; त्यांच्या डावात १३ हून अधिक षटके शिल्लक होती. त्यांचा संपूर्ण संघ ३६.५ षटकांत २१८ धावांतच गारद झाला.

'भारत अ' संघाला मोठी धावसंख्या उभारून देताना प्रियांश आर्याने ४२ चेंडूंत ९ चौकार व एका षटकारसह ५८ धावांचे, तिलक वर्माने ७५ चेंडूंत ५ चौकारांसह ५९ धावांचे, तर कुमार कुशाग्राने ६७ चेंडूंत ५ चकारांसह ५८ धावांचे योगदान दिले. (वृत्तसंस्था)





# ऑस्ट्रेलियाचा बांगलादेशवर मोठा विजय



**हेडिंग्ले, १७ जून**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत बुधवारी गोलंदाज आणि जॉर्जिया व्होल यांच्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने बांगलादेशवर ६३ चेंडू शिल्लक ठेवित ९ गड्यांनी मोठा विजय मिळविला. १४ धावांत २ बळी टिपणारी व नाबाद १९ धावांची खेळी करणारी एलिस पेरी सामनावीर ठरली.

या विजयाबरोबरच ऑस्ट्रेलियाने आपल्या 'नेट रन-रेट'मध्ये आणखी एक महत्त्वपूर्ण सुधारणा केली. त्यांनी बांगलादेशला ८ बाद ७७ धावांवर रोखले आणि त्यानंतर १० हून अधिक षटके शिल्लक असतानाच विजयासाठी आवश्यक धावा पूर्ण केल्या.

सामना अपेक्षेप्रमाणेच झाला; विशेषतः वेगवान गोलंदाजांना मदत करणाऱ्या खेळपट्टीवर ऑस्ट्रेलियाला प्रथम गोलंदाजी करण्याची संधी मिळाली होती. तरीही, हा ऑस्ट्रेलियाचा एक अत्यंत प्रभावी आणि वर्चस्व गाजवणारा खेळ ठरला. किम गार्थने सुरुवातीलाच दोन बळी घेत सामन्याची दिशा ठरवली आणि एलिस पेरीने तिला चांगली साथ दिली, मात्र संघातील इतर गोलंदाजांनीही यशात वाटा उचलला.

बांगलादेशला त्यांच्या २० षटकांत केवळ सहा चौकार मारता आले. एका मोठ्या आव्हानाचा सामना करत असताना, आठव्या षटकापर्यंत ५ बाद २७ अशी अवस्था झाल्यानंतरही थोडी अधिक आक्रमकता न दाखवल्याबद्दल त्यांना कदाचित खंत वाटू शकते. आम्ही यापेक्षा चांगली कामगिरी करू शकतो, असे सामना संपल्यानंतर कर्णधार निगार सुलतानाने म्हटले; तिने ४७ चेंडूत २७ धावा करत संघासाठी सर्वाधिक धावा केल्या होत्या.

विजयासाठीचे लक्ष्य गाठणे ही केवळ वेळेची बाब होती. सुरुवातीला काही चेंडू स्थिरावण्यासाठी घेतल्यानंतर जॉर्जिया व्होलने चौकारांची बरसात केली; तिने ३२ चेंडूत सहा चौकार मारले, जेवढे चौकार बांगलादेशने त्यांच्या संपूर्ण डावात मारले होते. सामन्याच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलियाकडे केवळ १३ तंदुरुस्त खेळाडू उपलब्ध होत्या, कारण फोबी लिचफील्ड व ॲशली गार्डनर दुखापतीमुळे या सामन्यातून बाहेर होत्या. (वृत्तसंस्था)

# स्मृती, शेफालीची अर्धशतके

### भारत ५ बाद २०९



स्मृती मंधाना



शेफाली वर्मा

**लीड्स, १७ जून**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत बुधवारी नेदरलॅण्ड्सविरुद्धच्या साखळी सामन्यात स्मृती मंधाना (७४) आणि शेफाली वर्मा (५५) या सलीमी जोडीने बहारदार फलंदाजी केली. या दोघींनी केलेल्या दमदार ११५ धावांच्या सलामी भागीदारीच्या बळावर भारताने २० षटकांत ५ बाद २०९ धावांची नोंद केली आणि नेदरलॅण्ड्स संघासमोर विजयासाठी २१० धावांचे आव्हान ठेवले.

नेदरलॅण्ड्स संघाची कर्णधार बाबेट द लीडने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. स्मृती मंधाना व शेफाली वर्माने लौकीकास साजेशी खेळी करीत भारताला दमदार सुरुवात करून दिली. या दोघांनी नेदरलॅण्ड्सच्या गोलंदाजांचा खंबीरपणे सामना करीत चौफेर फटकेबाजी केली. हिदर सिगर्सच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी शेफाली वर्माने ३८ चेंडूत ५५ धावांची अर्धशतकी खेळी केली, यात तिने १० चौकार खेचलेत. स्मृती मंधानाने जेमिमाह रॉड्रिग्जच्या साथीने संघाला दीडशे धावांचा टप्पा ओलांडून दिला, याचवेळी मंधाना डी लांगाच्या गोलंदाजीवर बाद झाली. स्मृती मंधानाने ४७ चेंडूंत ११ चौकार व एका षटकारसह ७४ धावा ठोकल्या. पुढे जेमिमाह रॉड्रिग्ज (१९), ऋचा घोष (२०), कर्णधार हरमनप्रीत कौर (१२) व दीप्ती शर्माने (नाबाद १०) थोडे फार योगदान दिले. भारताने मर्यादित २० षटकांत ५ बाद २०९ धावा काढल्या. नेदरलॅण्डकडून कॅरोलीन डी लांगेने २ बळी, तर इरिस झीविलिंग, हिदर सिगर्स, मैरीथ व्हॅन डेन राडने प्रत्येकी १ बळी टिपला. (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### आर्ट ऑफ लिव्हिंगचा सहज समाधी ध्यान योग कार्यक्रम

**सोलापूर, दि. १७ जून-**

आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे आयोजित सहज समाधी ध्यान योग हा विशेष ध्यान कार्यक्रम १२ ते १४ जून दरम्यान समाचार चौक येथे यशस्वीरीत्या पार पडला. या तीन दिवसीय कार्यक्रमात ५२ साधकांनी सहभाग घेतला आणि गहन ध्यानाचा अद्भुत अनुभव घेतला. कार्यक्रमानंतर सहभागी झालेल्या अनेकांनी आपले अनुभव व्यक्त करताना सांगितले की, या ध्यानपद्धतीमुळे त्यांना झोपेच्या समस्या, तणाव, नैराश्य (डिप्रेशन), चिंता (ॲन्झायटी) आणि राग नियंत्रण यामध्ये सकारात्मक बदल जाणवला. अनेकांना अधिक शांत, प्रसन्न, ताजेतवाने आणि ऊर्जावान वाटल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे मार्गदर्शन डॉ. योगेश्वर चिप्पा यांनी केले. ते श्री श्री इन्स्टिट्यूट फॉर ॲडव्हान्स्ड रिसर्च येथे वरिष्ठ शास्त्रज्ञ असून श्री श्री आयुर्वेद हॉस्पिटल, बेंगळुरू येथे कर्करोग उपचार विभागात वरिष्ठ सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. अधिक माहितीसाठी प्रतीक ९५९५६१३५३१, विरेश ७३८७७३०००७ या क्रमांकांवर संपर्क साधावा.



### महापौर कोंड्याल यांनी केले आप्पासाहेब वारद यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १७ जून-**

पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांच्या जयंती दिनानिमित्त महानगरपालिका येथील इंद्रभवन परिसरातील पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांच्या पुतळ्यास महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शहराध्यक्ष तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, भास्कर सामलेटी, सिद्धू तिमिगार आदी मान्यवर उपस्थित होते.



### उत्कर्ष विद्यालयाचा बैलगाडी सफरीने प्रवेशोत्सव

**सांगोला, दि. १७ जून-**

उत्कर्ष प्राथमिक विद्यालय, सांगोला येथे नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७चा शुभारंभ करण्यात आला. बालक मंदिरातील चिमुकल्यांचे बालगीतांच्या सुरेल तालावर, कुंकुमतिलक व औक्षण करून आनंदमय वातावरणात स्वागत करण्यात आले. रंगबिरंगी रांगोळ्या, पताका ,फुले व फुग्यांनी सजवलेल्या परिसरामुळे आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. आकर्षक सजवलेल्या बैलगाडीची रम्य सफर हा प्रवेशोत्सवाचा विशेष आकर्षणबिंदू ठरला. सरस्वती पूजन व प्रार्थनेने कार्यक्रमास मंगलमय सुरुवात झाली. संस्थाध्यक्षा दमयंती कुलकर्णी, कोषाध्यक्षा शालिनी कुलकर्णी, मुख्याध्यापक सुनील कुलकर्णी तसेच शालेय शिक्षण समितीच्या सदस्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी विस्तार अधिकारी टकले यांनी विद्यालयास सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या प्रवेशद्वारावर उभारलेल्या आकर्षक सेल्फी पॉईंटवर विद्यार्थी व पालकांनी आनंदाने छायाचित्रे टिपली. अनेक विद्यार्थ्यांनी सुंदर रोपे विद्यालयाला भेट देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. विद्यालयाचे प्राचार्य सुनिल कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रशांत भोसले, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका विश्रांती म ागाडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी, पूर्व प्राथमिकच्या माजी मुख्याध्यापिका सुनिता कुलकर्णी, पर्यवेक्षिका शालन गयाळी यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रवेशोत्सव यशस्वीरीत्या पार पडला.

### भाजपा प्रदेश कार्यालयाचे माजी मंत्री, ज्येष्ठ स्वयंसेवक मुकुंद कुलकर्णी यांचे निधन

**सोलापूर, दि. १७ जून-**



भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यालयाचे म ाजी मंत्री आणि ज्येष्ठ स्वयंसेवक मुकुंद कुलकर्णी (वय ८८) यांचे निधन झाले आहे. त्यांनी अनेक दशके राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपच्या यशस्वितेसाठी काम केले होते. भाजपाचे संघटनात्मक कार्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वाहून घेतले होते. भाजपा प्रदेश कार्यालय सचिव म्हणून त्यांनी २०१५ पासून यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली होती. शिस्तबध्द आणि अभ्यासू चेहरा म्हणून त्यांची ओळख होती. स्व. प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे यांच्या सानिध्यात त्यांनी दिर्घकाळ कार्य केले होते. महाराष्ट्र भाजपाकडून त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

## निधन वृत्त...

### संभाजी साबळे

**सोलापूर, दि. १७ जून-**



विंचूर गावातील ज्येष्ठ नागरिक संभाजी (अप्पा) पुनाप्पा साबळे (वय १०३) यांचे वृद्धापकाळाने बुधवारी (दि.१७) रात्री सात वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगी, दोन नातू, नात, सूना व परतवंडे असा परिवार आहे. गुरुवारी सकाळी दहा वाजता त्यांच्या पार्थिवावर विंचूर येथे अंत्यसंस्कार होणार आहे. पत्रकार अमोगसिध्द लांडगे यांचे आजोबा होत.

# आषाढीत महिला वारकऱ्यांसाठी उभारणार जर्मन हँगर्स

### सदस्या ॲड. निगडे यांच्या सूचनेला तात्काळ मंजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ जून-**

आषाढी यात्रेमध्ये सहभागी होणाऱ्या महिला वारकऱ्यांसाठी प्रत्येक पालखी तळावर यंदा प्रथमच भव्य जर्मन हँगर्स ( निवारा शेड ) उभारणी करण्यात येणार असून त्यामध्ये हजारो महिलांसाठी स्नान आणि प्रातर्विधीसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या सदस्य ॲड. माधवी निगडे यांच्या या सूचनेला तात्काळ मंजुरी मिळाली असून यंदाच्या आषाढीपासून ही व्यवस्था कार्यान्वित होईल.

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि.१७) मुख्यमंत्री वारकरी महामंडळाची बैठक पार पडली. यावेळी सामाजिक न्याय नगर विकास मंत्री माधुरी मिसाळ तसेच पुणे विभागीय आयुक्त शितल तेली उगले, सामाजिक न्याय विभागाचे वरिष्ठ अधिकारी, महामंडळाचे प्रतिनिधी तसेच संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समिती आळंदी, संत तुकाराम महाराज संस्थान देहू आणि विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने सदस्य ॲड. माधवी निगडे यांनी जर्मन हँगरचा प्रस्ताव मांडला आणि त्याला तात्काळ मंजुरी देण्यात आली. बैठकीत आगामी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा व पालखी महामार्गावरील वारकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या सदस्य ॲड. माधवी निगडे यांनी महिला वारकऱ्यांच्या सोयी-सुविधांचा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला.



पालखी महामार्गावर महिला भाविकांसाठी स्वतंत्र निवारा केंद्र उभारण्यात यावेत. या निवारा केंद्रामध्ये कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र कक्ष, स्नान व स्वच्छतेसाठी आवश्यक व्यवस्था तसेच महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी सूचना त्यांनी बैठकीत मांडली. महिला वारकऱ्यांच्या वाढत्या सहभागाचा विचार करता ही सुविधा अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या सदस्य ॲड. माधवी निगडे यांनी मांडलेल्या या विधायक सूचनेमुळे यंदाच्या आषाढी यात्रेत महिला वारकऱ्यांसाठी एक नवी आणि उपयुक्त सुविधा उपलब्ध होणार आहे.

## विठ्ठल मूर्तीवरील रासायनिक वज्रलेपास वारकरी व मंदिर महासंघाचा तीव्र विरोध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ जून-**




पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील मूर्तींवर २३ व २४ जून रोजी प्रस्तावित रासायनिक वज्रलेप प्रक्रियेला वारकरी संप्रदाय आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाने तीव्र विरोध दर्शविला आहे.

मूर्तींना कोणतीही हानी झाल्यास श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती आणि पुरातत्त्व विभागाविरुद्ध फौजदारी खटला दाखल करण्याचा इशारा महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी दिला पत्रकार परिषदेत दिला आहे. या संदर्भातील निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी व मंदिरे समिती यांना सादर करण्यात आले आहे.

महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी सांगितले की, कोरोना काळात केलेले रासायनिक लेपन दहा वर्षे टिकेल, असा दावा केला होता. मात्र चार-पाच वर्षांतच पुन्हा लेपनाची आवश्यकता निर्माण झाल्याने या प्रक्रियेच्या परिणामकारकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच, लेपनानंतर विठ्ठल मूर्तीच्या पायाला खड्डा पडणे आणि रुक्मिणीमातेच्या पायांचे नुकसान होणे याबाबत अद्याप समाधानकारक स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही, असा आरोप त्यांनी केला. संघटनांच्या मते, कृत्रिम रसायनांमुळे पाषाणाचे नैसर्गिक गुणधर्म बाधित होऊन मूर्ती आतून ठिसूळ होण्याचा धोका संभवतो. त्यामुळे वारकरी संत, महंत आणि मूर्तीशास्त्रज्ञांना विश्वासात न घेता कोणताही निर्णय घेऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी कोल्हापूर येथील म हालक्ष्मी देवीच्या मूर्तीवर २०१५ मध्ये सेंद्रीय पद्धतीने वज्रलेप करण्यात आल्याचा दाखला देत, पंढरपूरातील मूर्तीसाठी रासायनिक लेपनाचा आग्रह का धरला जात आहे, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. करवीर पीठाचे श्री स्वामी जगद्गुरु शंकराचार्य यांनीही रासायनिक वज्रलेपास विरोध दर्शविताना, रासायनिक प्रक्रिया मूर्तीस अपायकारक ठरू शकते, असे मत व्यक्त केल्याचे सांगण्यात आले. पत्रकार परिषदेला हभप रामकृष्ण हनुमंत महाराज वीर, प्रसाद पंडित, चंद्रकांत रमणशेट्टी, विनोद रसाळ आणि राजन बुणगे उपस्थित होते.




## मोडनिंब येथील शिबिरात १९१ जणांचे रक्तदान; विश्वशांती फाउंडेशनचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १७ जून-**

मोडनिंब (ता.माढा) येथे विश्वशांती वेल्फेअर फाउंडेशन यांच्या वतीने निलेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरास आ. अभिजीत पाटील यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमामध्ये शेकडो नागरिकांनी सहभाग नोंदविला. सोलापूर ब्लड सेंटरच्या सहकार्याने आयोजित शिबिरात १९१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच ट्युलिप हॉस्पिटल, पंढरपूर यांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या हाडांच्या विकारांच्या मोफत तपासणी शिबिराचा ७८ नागरिकांनी लाभ घेतला. याशिवाय बुधराणी हॉस्पिटल, कोरेगाव पार्क (पुणे) यांच्या सहकार्याने आयोजित नेत्र तपासणी शिबिरात १७४ नागरिकांनी डोळ्यांची तपासणी करून चष्म्यांचा लाभ घेतला, तर चार रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली असल्याची माहिती निलेश पाटील यांनी दिली. लकी ड्रॉ बक्षिस वितरण कार्यक्रमादरम्यान पहिले बक्षीस चार्जिंग स्कूटी हे नितीन मच्छिंद्र जाधव (उपळाई खुर्द दुसरे बक्षीस पाणी फिल्टर हे महाडिक बावी यांना तिसरे बक्षीस शिलाई मशीन हे सागर मोरे (अरण) यांना तर चौथे बक्षीस रेंजर सायकल हे तुपे (वांगरवाडी) यांना प्रदान करण्यात आले.

## सोलापुरात आज निमंत्रित कवी संमेलन आणि पुस्तक प्रकाशन सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

तेलुगु मराठी साहित्यिक संस्था, सोलापूर आणि पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या एका भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम कवी विजयकुमार सोनवणे लिखित जनमनाचा हुंकार या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनार्थ आयोजित केला असून, त्यासोबतच निमंत्रित कवी संमेलन देखील रंगणार आहे.

हा सोहळा गुरुवार, दिनांक १८ जून रोजी दुपारी ३ ते संध्याकाळी ६ या वेळेत पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय, कन्ना चौक येथे पार पडेल. कार्यक्रमाचे अध्यक्षपद सार्थ अहिल्या गाथाकार गोविंद काळे भूषवणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार प्रशांत जोशी उपस्थित राहणार आहेत. तसेच पत्रकार अरविंद मोटे, डॉ. राजश्री जाधव यांच्यासह अनेक मान्यवर प्रमुख उपस्थिती व विशेष उपस्थिती म्हणून लाभणार आहेत. या संमेलनात सोलापूर व परिसरातील अनेक निमंत्रित कवी आपल्या कविता सादर करणार आहेत. तरी सोलापुरातील सर्व रसिक आणि साहित्यप्रेमी नागरिकांनी या काव्यमय सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, सचिव अरविंद चिन्नी यांनी करण्यात आले आहे.

## खासगी शाळांच्या मनमानीमुळे पालक त्रस्त

### शिक्षण विभागाकडे कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १७ जून -**

बार्शी शहर व तालुक्यातील अनेक खाजगी मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडून शिक्षण विभागाच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. याविरोधात पालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पालकांच्या वतीने गटशिक्षणाधिकारी गजानन बाजड यांना निवेदन देऊन संबंधित शाळांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

अनेक खाजगी शाळांकडून दरवर्षी अवाजवी फी वाढ केली जात आहे. वाढत्या शैक्षणिक खर्चामुळे पालकांवर आर्थिक ताण निर्माण होत आहे. अशातच काही शाळांकडून फीमध्ये मोठी वाढ करून आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप केला आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांना विशिष्ट दुकानांतूनच गणवेश, बूट, वह्या व इतर शैक्षणिक साहित्य खरेदीस भाग पाडत असल्याची तक्रारही केली आहे.

याशिवाय शासनमान्य पुस्तकांऐवजी खाजगी प्रकाशकांची महागडी पुस्तके खरेदी करण्याची सक्ती होत असल्याने सर्वसामान्य कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.



#### शिक्षण विभागाने झटकली जबाबदारी?

खासगी शाळांविरोधातील विविध तक्रारींबाबत बार्शी नगरपरिषदेच्या शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी खाजगी शाळांच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचे अधिकार नसल्याचे सांगत, 'या प्रकरणात आम्हीं काहीही करु शकत नाही,' अशी भूमिका मांडली. संबंधित तक्रारींबाबत कोणतीही ठोस कार्यवाही किंवा उपाययोजना सुचविण्याऐवजी प्रशासनाने असमाधानकारक उत्तर दिल्याने पालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

## कन्हेरगावच्या वाड्या-वस्तीवरील सिंगल फेज वीजपुरवठ्यासाठीचे आमरण उपोषण यशस्वी

### लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १७ जून -**

माढा तालुक्यातील कन्हेरगाव येथील वाड्या-वस्तीवरील सिंगल फेज वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या मागणीसाठी दोन दिवसांपासून सुरू असलेल्या आमरण उपोषणाला अखेर यश आले. महावितरण प्रशासनाने रात्री ६ ते पहाटे ४ या वेळेत कायमस्वरूपी सिंगल फेज वीजपुरवठा देण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले.

कन्हेरगावचे माजी उपसरपंच धनंजय मोरे यांच्या नेतृत्वाखाली पृथ्वीराज माने, संजय डोके, बाळासाहेब डोके, राजेंद्र केदार, अशोक लांडगे यांच्यासह ग्रामस्थ दोन दिवसांपासून आमरण उपोषणाला बसले होते. ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर प्रशासनाने मागण्यांची दखल घेत लेखी आश्वासन दिले.



टेंभुर्णी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता राजेंद्र पाटील आणि पंचायत समिती सदस्य संभाजी पाटील यांच्या हस्ते उपोषणकर्त्यांना सरबत पाजून आंदोलनाची सांगता करण्यात आली. यावेळी टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

यावेळी नवनाथ शिंदे, सोसायटीचे संचालक मारुती काशीद, माजी ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ कदम, सुरेश पाटील, नानासाहेब माने, महेश माने, रमेश डोके, माजी सरपंच दशरथ चव्हाण, उत्तम पाटील, जालिंदर डोके, संपत चव्हाण, बिभीषण शिंदे, कांतीलाल शिंदे, भारत चोपडे, अनिल डोके, सौरभ डोके, देविदास मोरे, जालिंदर केदार, सुधीर मोरे, कृष्णदेव केदार, रामलिंग केदार, ईश्वर शिंदे, बाळासाहेब माने, सुनिल मोरे, विलास डोके, मंगेश ताटे, बंडू माने, नवनाथ ताटे, मारुती डोके, महादेव पाटील, नामदेव डोके, सोमनाथ डोके, दिनकर डोके, ऋषिकेश हांडे, अरुण भरगंडे, ज्योतीराम शिंदे, विठ्ठल केदार, बापू डोके, वैभव डोके, विजय भरगंडे, विष्णू मोरे, जोतीराम कांबळे, संजय शिंदे, नाना नलवडे, विजय मोरे, अशोक लांडगे, हनुमंत डोके, अण्णासाहेब मोरे, दत्ता मोरे, प्रवीण डोके, पप्पू मोरे, बापुराव डोके, शंभू शिंदे, लखन शिंदे, तुषार काशीद, आणि शिवतेज डोके उपस्थित होते.

तसेच संभाजी ब्रिगेडचे सचिन खुळे, नामदेव चिंतामण, शिवाजी नवले आणि महेंद्र सोनवणे यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला.

दोन दिवसांच्या शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने झालेल्या संघर्षाला अखेर यश मिळाल्याने कन्हेरगावच्या वाड्या-वस्तीवरील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाचे आभार मानत दिलेले आश्वासन तातडीने आणि कायमस्वरूपी अंमलात आणण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या दोघांचा कारच्या धडकेत मृत्यू

### दोन वृद्ध मित्रांचा जागीच मृत्यू

### कारचालकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १७ जून -**

मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडलेल्या दोन ज्येष्ठ नागरिकांचा भरधाव कारच्या धडकेत मृत्यू झाला. ही घटना मंगळवार दि. १७ जून रोजी पहाटे बार्शी-लातूर म ार्गावरील कुसळंब परिसरात घडली. संबंधित कार चालकाविरुद्ध बार्शी तालुका ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत विजय शिंदे (वय ३१, रा. कुसळंब, ता. बार्शी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीचे वडील राजेंद्र शिंदे (वय ५९) आणि त्यांचे मित्र सोपान गादेकर (वय ७०) हे दोघे मंगळवारी पहाटे मॉर्निंग वॉकसाठी कुसळंब ते पांगरी रस्त्याने पायी गेले होते. पहाटे ६ वाजण्याच्या दरम्यान या दोघांचा अपघात झाल्याचे समजताच विजय शिंदे यांच्यासह गावातील काही नागरिक घटनास्थळी पोहोचले. बार्शी-लातूर महामार्गावर प्रदीप काशीद यांच्या शेतालगत रस्त्याकडेला राजेंद्र शिंदे आणि सोपान गादेकर हे गंभीर जखमी अवस्थेत पडलेले दिसून आले. काही अंतरावर अपघातग्रस्त एमएच-१४ एचडी-२२३९ क्रमांकाची कार उभी असल्याचेही निदर्शनास आले.

जखमींना तातडीने उपचारासाठी बार्शी येथील श्रद्धा हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी दोघांचाही मृत्यू झाल्याचे घोषित केले. फिर्यादीनुसार, कार चालक इरफान चंदुलाल तांबोळी (रा. पिंपरी आंबा, जि. लातूर) याने आपल्या ताब्यातील कार भरधाव व निष्काळजीपणे चालवत राजेंद्र शिंदे व सोपान गादेकर यांना पाठीम ागून जोरदार धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाला. अपघातात कारचेही सुमारे २५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी बार्शी तालुका ग्रामीण पोलीस तपास करत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# वाढती गर्दी गृहीत धरुन आषाढी वारीचे हायटेक नियोजन : सीईओ कुशल जैन

## स्वच्छतागृहांमध्ये ३० टक्के वाढ; आरोग्य, निवारा व मूलभूत सुविधांवर विशेष भर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून-**

आषाढी वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रशासनासमोर असणारी मोठी जबाबदारी आहे. पांडुरंगाने दिलेल्या या सेवेच्या संधीचे रूपांतर प्रभावी व्यवस्थापनात करण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आला असून, यंदाच्या आषाढी वारीसाठी वाढती गर्दी लक्षात घेऊन सर्वंकष आणि हायटेक नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली.





जिल्हा परिषदेत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक अमोल जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

कुशल जैन म्हणाले की, यावर्षी अधिक मासामुळे अनेक भाविकांनी पंढरपूरात दर्शन घेतले असले तरी मानाच्या संतांच्या पालख्यांबरोबर पायी चालत येणाऱ्या वारकऱ्यांची संख्या दरवर्षी वाढत आहे. त्यामुळे यंदाही गतवर्षीपेक्षा अधिक सक्षम नियोजन करण्यात आले आहे. पावसाळा उशिरा सुरू होण्याची शक्यता, वाढणारी गर्दी आणि वारकऱ्यांच्या सोयी-सुविधा या सर्व बाबींचा विचार करून सूक्ष्म पातळीवर म्हणजेच मायक्रो प्लॅनिंग करण्यात आले आहे.

### स्वच्छता व्यवस्थेला प्राधान्य

वारी मार्गावरील स्वच्छता व्यवस्थेला यंदा विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. मानाच्या पालख्यांसोबत येणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन स्वच्छतागृहांची संख्या ३० टक्क्यांनी वाढविण्यात आली आहे. याशिवाय स्वच्छतागृहांची नियमित साफसफाई, कचरा संकलन, निर्जंतुकीकरण आणि पिण्याच्या पाण्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यरत राहणार आहे.

### आरोग्य विभाग सज्ज

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी सांगितले की, वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी विविध ठिकाणी वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका, औषधसाठा आणि आपत्कालीन उपचार सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. उष्माघात, पावसाळी आजार, संसर्गजन्य रोग आणि अन्य आरोग्यविषयक समस्यांवर तातडीने उपचार मिळावेत यासाठी आरोग्य विभाग पूर्णपणे सज्ज आहे.

### विभागनिहाय समन्वयावर भर

वारीचे यशस्वी व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामपंचायत, आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा, विद्युत, महसूल आणि पोलीस प्रशासन यांच्यात प्रभावी समन्वय ठेवण्यात आला आहे. प्रत्येक विभागाला स्वतंत्र जबाबदाऱ्या देण्यात आल्या असून, संभाव्य अडचणींवर त्वरित उपाययोजनांसाठी नियंत्रण कक्षही कार्यरत राहणार आहे.

### वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रशासन कटिबध्द

आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. लाखो वारकऱ्यांचा प्रवास सुरक्षित, स्वच्छ आणि सुखकर व्हावा यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असून, सर्व विभागांनी समन्वयाने काम करून यंदाची वारी अधिक यशस्वी करण्याचा संकल्प केला असल्याचे सीईओ कुशल जैन यांनी सांगितले.

---

# 'चेन व्होटिंग'च्या शक्यतेवर उमेदवाराचा आक्षेप; निवडणूक प्रशासनाकडे कडक उपाययोजनांची मागणी

**मतदान प्रक्रियेची गुप्तता व निष्पक्षता अबाधित राखण्यासाठी वसंत देशमुख यांचे निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून**

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रियेची पारदर्शकता आणि विश्वासार्हतेचा मुद्दा चर्चेत आला आहे. उमेदवार वसंतराव देशमुख यांनी कथित ''चेन व्होटिंगाची शक्यता व्यक्त करत राज्य आणि जिल्हा निवडणूक प्रशासनाकडे तातडीच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांची मागणी केली आहे.



मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात देशमुख यांनी मतदान प्रक्रियेदरम्यान काही ठिकाणी चेन व्होटिंगसारख्या गैरप्रकाराचा प्रयत्न होण्याची शक्यता आहे. या प्रकारामध्ये मतदाराने मतदान न करता कोरी मतपत्रिका मतदान केंद्राबाहेर आणणे आणि त्यावर बाहेरील व्यक्तींमार्फत विशिष्ट उमेदवाराच्या बाजूने पसंतीक्रम नोंदवून पुढील मतदाराकडे देणे, अशी प्रक्रिया राबवितात. त्याचा गुप्त मतदानाच्या तत्त्वाला धक्का बसून मतदारांच्या स्वतंत्र निर्णय प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो, असे म्हटले आहे.

निवडणुकीची शुचिता अबाधित राखण्यासाठी मतदान केंद्रात वितरित आणि जमा झालेल्या मतपत्रिकांचा नियमित ताळमेळ ठेवणे, मतपत्रिका बाहेर नेण्यास प्रतिबंध, मतदान केंद्र परिसरात विशेष देखरेख व्यवस्था, भरारी पथके व सूक्ष्म निरीक्षकांना सतर्कतेच्या सूचना तसेच संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ कायदेशीर कारवाई आवश्यक असल्याचे देशमुख यांनी निवेदनात नमूद केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील मतदान प्रक्रिया पूर्णपणे मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक वातावरणात पार पडावी, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

---

# देवदर्शनासाठी आलेल्या महिलेचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी केले लंपास

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि. १७ जून**




हुन्नूर येथील बिरोबाच्या दर्शनासाठी अमावास्येनिमित्त आलेल्या ६५ वर्षीय महिलेचे ९१ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरटयांनी चोरले. या प्रकरणी अज्ञात चोरटयाविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी जिजाबाई कुंभार (वय ६५) या भाविक कर्नाटकामधून हुन्नूर येथील बिरोबा देवाला अमावास्येनिमित्त दि.१४ जून रोजी आल्या होत्या. सदर फिर्यादीने देवकार्य करून बिरोबा मंदिरमध्ये मुक्काम केला. पहाटे ४.०० वा. फिर्यादी व फिर्यादीची जाऊ पार्वती दोघेजणी मंदिराच्या पाठीमागे अंघोळ करण्यासाठी गेल्या होत्या. फिर्यादीने अंघोळीपुर्वी गळ्यातील १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे नेकलेस व १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, आधारकार्ड, मोबाईल असे सर्व एकत्र करून फिर्यादीने ब्लाऊज व साडीमध्ये बांधून टाकीच्या शेजारी ठेवून अंघोळ करण्याकरीता गेले. अंघोळ करून परत कपडे काढून ठेवलेल्या ठिकाणी फिर्यादी आल्या असता त्यावेळी सदर ठिकाणी ठेवलेले सोने दिसून आले नाही. अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीवाचून चोरून नेल्याचा प्रकार घडला आहे. सदर चोरी प्रकरणाचा अधिक तपास मंगळवेढा पोलिस करीत आहेत.

---

# मोटरसायकलला कारची धडक; एक ठार, एक जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १७ जून -**

पंढरपूरकडून मोहोळकडे येणाऱ्या मोटरसायकलला पाठीमागून वेगाने येणाऱ्या मारुती कारने जोराची धडक दिली. अपघातात एकाचा मृत्यू झाला, तर १ जण जखमी झाला. हा अपघात बुधवार दि. १७ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास मोहोळ- पंढरपूर मार्गावरील पेनुर शिवारातील माने वस्तीजवळ झाला.

इरफान सलीम कामले (वय ४३,रा. पंढरपूर) असे मृताचे नाव आहे. आलिम जाकीर शेख (वय २८, रा. पंढरपूर)असे जखमीचे नाव आहे. जखमीला उपचारासाठी पंढरपूर येथील रुग्णालयात दाखल केले आहे. मोहोळ पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, इरफान कामले हे शेळ्या खरेदी-विक्रीचा व्यापार करीत होते. बुधवार दि. १७ रोजी ते स्वतः व त्यांच्या सोबत अलीम शेख हे मोटरसायकल क्र. एम एच१३ सीडी २७५८ वरून सकाळी तुंगत येथे आले. त्या ठिकाणी दोन शेळ्या खरेदी करून त्या मोटरसायकलीवर बसून पाटकुल ता मोहोळ येथील बाजारात विक्रीसाठी निघाले होते. त्यांची मोटरसायकल पाटकुल फाट्याजवळील माने वस्ती जवळ आली असता पाठीमागून भरधाव येणाऱ्या मारुती कार क्र. एम एच १३ बी एन६९६६ हिने मोटरसायकलला जोराची धडक दिली. त्यात इरफान कामले हे गंभीर जखमी झाले. तर अलीम शेख हे जखमी झाले. गंभीर जखमी झालेल्या इरफान कामले यांना उपचारासाठी तातडीने मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या संदर्भात बाबामिया भडाळे वय ६७ रा. जुनी पेठ पंढरपूर यांनी मोहोळ पोलिसात फिर्याद दिली. कार चालक अरुण खडतरे रा. इसबावी याचे विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस अंमलदार चव्हाण करीत आहेत.

---

# अकलूजमध्ये भररस्त्यात युवकाला मारहाण; टोळक्यावर गुन्हा

**अकलूज, दि. १७ जून-**

जुन्या वादातून एका युवकाला गाडीतून आलेल्या टोळक्याने भररस्त्यात बेदम मारहाण केली. पीडित युवकाच्या तक्रारीवरून अकलूज पोलिसात टोळक्यावर गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना १४ जून रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास अकलूजमधील महाराणा प्रताप चौक परिसरातील 'जयशंकर पान शॉप'जवळ घडली. फिर्यादी कृष्ण गिरी (वय २०, रा. नवीन बाजारतळ, अकलूज) हे या पान शॉपवर थांबलेले असताना, करण अभिमन्यू पवार, बंटी कृष्णा साळुंखे (दोघे रा. रत्नपुरी संग्राम नगर), बबन कांबळे (रा. नवीन बाजारतळ, अकलूज), सोहेल शेख (रा. यशवंतनगर) आणि अन्य चौघे तेथे आले. हे सर्वजण एका विना क्रमांकाच्या एसयूव्हीतून आले होते. आरोपींनी फिर्यादीला गाठून दोन वर्षांपूर्वीच्या एका विषयावरून जाब विचारत लाठी-काठ्या आणि हाताने मारहाणीस सुरुवात केली. मारहाणीत फिर्यादीच्या डोके आणि पाठीला गंभीर दुखापत झाली. आरोपींनी फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देत परिसरात दहशत पसरवली. तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल राऊत हे करत आहेत.

---

# ३०० वर्षांची परंपरा, सर्वधर्मसमभावाचा वारसा

## मानाच्या झेंडेवाली सवारीच्या स्थापनेने बार्शीत मोहरम उत्सवाला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ जून-**

इस्लाम धर्मातील नवीन वर्षाची सुरुवात मानल्या जाणाऱ्या मोहरम महिन्याच्या पहिल्या दिवशी बार्शी शहरातील ऐतिहासिक आणि मानाच्या झेंडेवाली सवारीची स्थापना मोठ्या धार्मिक वातावरणात करण्यात आली. तब्बल ३०० वर्षांहून अधिक परंपरा लाभलेल्या या सवारीला बार्शीकरांमध्ये विशेष श्रद्धेचे स्थान असून, नवसाला पावणारी आणि मनोकामना पूर्ण करणारी सवारी म्हणून तिची ख्याती आहे.

हिंदू-मुस्लिम ऐक्याचे जिवंत प्रतीक मानल्या जाणाऱ्या या झेंडेवाली सवारीला बार्शीच्या धार्मिक व सांस्कृतिक इतिहासात विशेष महत्त्व आहे. मोहरमच्या दहा दिवसांच्या कालावधीत या सवारीची मिरवणूक आठव्या दिवशी तसेच मोहरमच्या दहाव्या दिवशी शहरातील प्रमुख मार्गांवरून पारंपरिक पद्धतीने काढण्यात येते. या मिरवणुकीत सर्व धर्मीय नागरिक मोठ्या श्रद्धेने सहभागी होत असतात.



विशेष बाब म्हणजे, ब्रिटिश काळात झेंडेवाली सवारीच्या सामाजिक आणि धार्मिक कार्याची दखल घेत तत्कालीन ब्रिटिश सरकारने ताम्रपट देऊन गौरव केला होता. आजही या परंपरेचे जतन सातारकर कुटुंबाकडून अत्यंत निष्ठेने केले जात आहे. झेंडेवाली सवारीची स्थापना बार्शीतील राऊळ गल्ली येथे स्वर्गीय निराह हाजी अहमद सातारकर यांनी केली होती. त्यानंतर अहमद हाजी सातारकर, महंमद हनीफ सातारकर, गुलाम दस्तगीर सातारकर यांनी ही परंपरा पुढे नेली. सध्या पाचव्या पिढीतील रफिक सातारकर हे या धार्मिक वारशाचे जतन करत आहेत. मोहरम उत्सवासाठी कोणत्याही प्रकारची वर्गणी किंवा देणगी न घेता संपूर्ण खर्च सातारकर कुटुंब स्वतःच्या माध्यमातून करत असल्याची परंपरा ब्रिटिश काळापासून आजतागायत अखंड सुरु आहे. ही बाब या उत्सवाचे वैशिष्ट्य मानली जाते. झेंडेवाली सवारीशी हिंदू समाजाचाही अतूट सहभाग राहिला आहे. बार्शीतील भगवान काटकर यांनी सलग ५५ वर्षे सवारी घेण्याचा मान मिळवला होता. तर मागील ३१ वर्षांपासून मियाँभाई सय्यद हे सवारी वाहण्याचा मान सांभाळत आहेत. तसेच आडवा रस्ता परिसरातील ढोले कुटुंब गेल्या शंभर वर्षांहून अधिक काळ या सवारीची सेवा करणारे सेवेकरी म्हणून कार्यरत आहे.

---

## महत्वाचे...

### इंदिरा सोसायटीत साडे दहा लाखांची घरफोडी; रोख रकमेसह सोन्याचे दागिने लंपास

**सोलापूर, दि. १७ जून-**

बंद घराचा कडी-कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी १० लाख ५० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना विजापूर रोड परिसरातील इंदिरा सोसायटीत उघडकीस आली आहे. दरम्यान याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राजेंद्र दत्तात्रय गायकवाड (रा. १०१, इंदिरा सोसायटी, विजापूर रोड) यांनी फिर्याद दिली आहे .यातील फिर्यादी राजेंद्र गायकवाड हे दि. १० ते दि. ११ जून २०२६ रोजीचे दरम्यान घर बंद करून बाहेर गेले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या हॉलचा दरवाजाचे कुलूप कशानेतरी उचकटून आत प्रवेश केला. चोरट्याने घरातील बेडरुममध्ये जाऊन लोखंडी कपाट उघडले. त्यात ठेवलेले १ ग्रॅमची सोन्याची वेढणी, २ ग्रॅमची सोन्याची डोरली, २ ग्रॅमची सोन्याची छोटी आणि १० ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र यासह रोख रक्कम असा एकूण १० लाख ५० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. दुसऱ्या दिवशी फिर्यादी हे घरी परतल्यानंतर घरात चोरी झाल्याचे उघडकीस आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे . पोलीस हवालदार फुटाणे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहे.

### सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दोन महिला गार्डना शिवीगाळ, मारहाण; एकाविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. १७ जून-**

सिविल हॉस्पिटल मधील बी ब्लॉगमध्ये ड्युटी बजावणाऱ्या दोन महिला सुरक्षा रक्षकांना शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी एकाविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. जीवन विलास शिंदे (रा. सोलापूर ) असे गुन्हा दाखल केलेल्या आरोपीचे नाव आहे. महिला सुरक्षा रक्षक दमयंती सुतकर ( रा.बार्शी ) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या दि.१६ जुन रोजी दुपारी तीन वाचे सुमारास सिव्हील हॉस्पीटल येथील बी ब्लॉक मधील सिजर वार्ड येथे ड्युटीवर होत्या. सदरवेळी वरील आरोपी हा सिझर वार्डामध्ये जाऊ लागला असता फिर्यादीने त्याला परवानगी दिली नाही. तेव्हा आरोपीने तु मला अडवणारी कोण, असे म्हणून फिर्यादीस अश्लिल शिवीगाळ करुन नाकावर ठोसा मारला. तेव्हा फिर्यादीच्या नाकातून रक्त येवू लागले. त्यावेळी सहकारी सविता अहिवळे या आरोपीला समजावून सांगत असताना तिलाही शिवीगाळ, मारहाण करुन तुम्ही माझे काहीही वाकडे करु शकत नाही असे म्हटल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. हवालदार वाघमारे हे गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

### प्राथमिक आरोग्यकेंद्रात दिव्यांग व्यक्तीला मारहाण; पाच जणांवर गुन्हा

**बार्शी, दि. १७ जून-**

बार्शी तालुक्यातील काटेगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी गेलेल्या एका दिव्यांग व्यक्तीला मारहाण करुन त्याचा अपमान केल्याप्रकरणी पाचजणांविरोधात बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. दिनेश गवळी (वय ४२, रा. काटेगाव, ता. बार्शी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, मंगळवार दि. १६ जून दुपारी २ वाजण्याच्या सुमारास ते त्यांच्या अपंग पायावरील उपचारासाठी काटेगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गेले होते. केंद्रात उपस्थित असलेल्या सोनवणे यांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्याने त्यांनी विचारणा केली. यावेळी सोनवणे यांनी शिवीगाळ करुन त्यांच्या कानशिलात मारल्याचा आरोप केल आहे. त्यानंतर तेथे उपस्थित असलेले चंद्रसेन गोपाळ गवळी यांनी फिर्यादीला आरोग्य केंद्राबाहेर नेऊन पाईपने पाठीवर व उजव्या दंडावर मारहाण केली. तसेच फिर्यादी मोबाईलद्वारे घटनेचे चित्रीकरण करत असताना त्यांच्या हातातील मोबाईल हिसकावून जमिनीवर आपटून फोडल्याचा आरोपही फिर्यादीने केला आहे. यानंतर चंद्रसेन गवळीने इतरांना बोलावून घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे. काही वेळात दयानंद गोपाळ गवळी, कौशल्या गोपाळ गवळी व सागर बबन गवळी हे तेथे आले. त्यांनी एकत्र येऊन फिर्यादीस मारहाण, शिवीगाळ व दमदाटी केली तसेच फिर्यादी दिव्यांग असल्याची माहिती असतानाही सार्वजनिक ठिकाणी त्यांचा अपमान केल्याचा आरोप केला आहे. या गोंधळादरम्यान फिर्यादीच्या खिशातील सुमारे ८ हजारांची रोख रक्कम हरवल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी तपास पोलीस हवालदार डुकळे करीत आहेत.

### मंगळवेढा तालुक्यात तीन वर्षीय मुलीचा विनयभंग; अल्पवयीन मुलगा ताब्यात

**मंगळवेढा, दि. १७ जून -**

मंगळवेढा तालुक्यातील एका खेडेगावात तीन वर्षीय मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी पोलिसांनी एका सतरा वर्षीय अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे. या घटनेची पोलिसात नोंद झाली असून सदर अल्पवयीन मुलास सोलापूर येथील बालसुधारगृहात पाठवल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. ग्रामीण भागातील एका खेड्यामध्ये ही तीन वर्षाची मुलगी राहत आहे. १६ जून रोजी दुपारी १२:३० वाजता तिला अल्पवयीन सतरा वर्षांच्या मुलाने तिच्या घरात नेऊन तिच्या अंगाशी स्पर्श करून तिचा विनयभंग केल्याचे पोलिस निरीक्षक दतात्रय बोरीगीड्डे यांनी सांगितले. पीडितेच्या आईने पोलिसात फिर्याद दाखल केली आहे. मुलगी मागासवर्गीय असल्याचे माहित असतानाही हे कृत्य केल्याने जातीवाचक कलम लावले आहे. याचा अधिक तपास डीवायएसपी डॉ. शिवपुजे हे करीत आहेत.

---

# पिस्टलच्या धाकाने ज्वेलर्स दुकानातून जबरी चोरी करणारे दोघे चोरटे जेरबंद; मुद्देमाल जप्त

## शहर गुन्हे शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

शहर गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने दोन दिवसांपूर्वी ७० फूट रोड येथील शिवकुमार ज्वेलर्स दुकानात पिस्टलचा धाक दाखवून दोन नेकलेसची जबरी चोरी करणाऱ्या दोघा चोरट्यांना अटक केली. तसेच चोरलेल्या दागिन्यांसह गुन्ह्यात वापरलेले पिस्टल, जिवंत काडतुस, मोबाईल फोन, मोटरसायकल हस्तगत केल्याची माहिती पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी आज सायंकाळी पत्रकार परिषदेत दिली.

जिलानी रफीक दामटे (वय ३३ रा. ७० फूट रोड नुरूल इस्लाम मस्जिदच्या बोळात सोलापूर), साहिल उर्फ भाई नबी नंदियाल (वय २४ रा. जामा मस्जिदसमोर सलगरवाडी, डोणगाव रोड सोलापूर मुळ रा. लक्ष्मी नगर येरवडा पुणे) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. गुन्ह्यात आणखी एकाचा सहभाग असून रेहान उर्फ जड्ड्या रमजान लडाफ उर्फ शेख (रा. मिल्लत नगर, शाहबाद जि. कलबुर्गी रा. कर्नाटक सध्या रा. नुरानी मस्जिद शेजारी लक्ष्मी नगर येरवडा, पुणे) असे त्याचे नाव आहे. तिघे आरोपी सोलापुरात एकत्र जमले. त्यांनी शिवकुमार ज्वेलर्स शॉपची रेकी करून लुटण्याची योजना आखली. त्याप्रमाणे १३ जून रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास शिवकुमार ज्वेलर्स येथे आले. दोघे अचानक आत आले, पिस्टलचा धाक दाखवत एकाने सोन्याचे दोन नेकलेस जबरदस्तीने चोरून पोबारा केला. हा सर्व प्रकार सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरून दोघांचा शोध घेऊन अटक केली आहे. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी याचा तपास करीत दोघांना अक्कलकोट रोडवर अटक करून चोरलेले दागिने व गुन्ह्यात वापरलेले पिस्टल, जिवंत काडतुस व दुचाकी जप्त केली आहे.

सदरची कामगिरी कामगिरी पोलिस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त डॉ. अश्वीनी पाटील, सहायक पोलिस आयुक्त दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरविंद माने, सहायक पोलिस निरीक्षक शंकर धायगुडे, शैलेश खेडकर, तुकाराम घाडगे, निलेश पाटील सोनवणे व त्यांच्या पथकांनी पार पाडली आहे.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT


# सोलापूर विधान परिषदेसाठी आज मतदान

## महायुतीचे राजेंद्र राऊत आणि महाविकास आघाडीचे वसंतराव देशमुख यांच्यात लढत





### सहा मतदान केंद्र व ६१६ मतदार, मतदानाचे साहित्य मतदान केंद्राकडे रवाना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ जून-**

सोलापूर जिल्ह्यातील विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. जिल्ह्यातील सहा मतदान केंद्रावर एकूण ६१५ मतदार(एक मतदार मयत) मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जिल्ह्यातील स्थानिक संस्थांमध्ये एक जिल्हा परिषद, एक महानगरपालिका व १७ नगरपरिषद/नगरपंचायत अशा एकूण १९ संस्था असून त्यातील मतदारसंख्या ५४४ आहे. याशिवाय ४९ नामनिर्देशित व २३ सभापती मिळून एकूण मतदारसंख्या ६१६ इतकी आहे. या निवडणुकीसाठी एकूण १५ नामनिर्देशन अर्ज दाखल झाले होते. अंतिमतः महायुतीचे राजेंद्र राऊत आणि महाविकास आघाडीचे वसंतराव देशमुख हे २ उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत.

या निवडणुकीसाठी १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार असून मतमोजणी २२ जून रोजी सकाळी ८ वाजता नियोजन भवन, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे होणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २५ जूनपर्यंत पूर्ण होणार आहे.

नियोजन भवन येथून सहा मतदान केंद्राचे केंद्राध्यक्ष व अन्य अधिकारी कर्मचारी यांनी निवडणूक साहित्य घेऊन निवडणूक केंद्रावर रवाना झालेले आहेत. ही निवडणूक प्रक्रिया निर्भय व शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिली. जिल्हाधिकारी सोलापूर हे निवडणूक निर्णय अधिकारी असून निवासी उपजिल्हाधिकारी सोलापूर हे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आहेत.

**निरीक्षक श्रवण हार्डीकर यांच्याकडून स्ट्राँग रूमची पाहणी**



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे या निवडणुकीसाठी नियोजन भवन येथे मतमोजणी केंद्र निर्माण करण्यात आलेले आहे. १८ जून रोजी मतदानाची प्रक्रिया पार पडल्यानंतर मतपेट्या ठेवण्यासाठी याच ठिकाणी स्वतंत्र स्ट्राँग रूमची निर्मिती करण्यात आलेली आहे. या स्ट्राँग रूमची पाहणी बुधवरी निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर यांनी केली. तसेच पोलीस प्रशासनाला या ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्याबाबत निर्देशित केले. या ठिकाणी निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सर्व व्यवस्था करण्यात याव्यात असेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तीकेयन, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुशांत बनसोडे, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख आदी उपस्थित होते.

# सोलापुरात शनिवारपासून एआय फॉर डॉक्टर्स राष्ट्रीय परिषद

## देशभरातील तज्ज्ञ डॉक्टरांचा राहणार सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**




वैद्यकीय क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेऊन डॉक्टरांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी सोलापुरात

बालाजी सरोवर हॉटेल येथे दिनांक २० व २१ जून रोजी दोन दिवसीय एआय फॉर डॉक्टर्स राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती परिषदेचे अध्यक्ष डॉ. गुरुनाथ परुळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या परिषदेत देशभरातील डॉक्टर, वैद्यकीय शिक्षक आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. कार्डिओलॉजी सोसायटी सोलापूर, एपीआय सोलापूर, डॉक्टर एआय फाउंडेशन आणि आयसीएआयएम यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वैद्यकीय क्षेत्रातील प्रभावी वापर, निदान प्रक्रियेतील बदल, डिजिटल हेल्थकेअर आणि भविष्यातील संधी याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. परिषदेत एआयची मूलभूत माहिती, विविध वैद्यकीय शाखांमधील उपयोजन, हँड्स-ऑन कार्यशाळा, व्यावहारिक प्रशिक्षण तसेच डॉक्टरांसाठी विशेष सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. हृदयरोग, कर्करोग, मधुमेह, नेत्ररोग आणि ग्रामीण आरोग्य सेवांमध्ये एआयच्या वापरावर सविस्तर चर्चा होणार आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता हे आगामी काळात प्रत्येक डॉक्टरच्या दैनंदिन कार्यातील महत्त्वाचे साधन ठरणार आहे. एआयमुळे आरोग्यसेवा अधिक जलद, अचूक आणि परिणामकारक होईल, असा विश्वास डॉ. गुरुनाथ परुळे यांनी व्यक्त केला. या पत्रकार परिषदेला डॉ. गुरुनाथ परुळे, डॉ. प्रदीप सिंघल, डॉ. स्वाती, डॉ. शिवानंद भंडे, डॉ. रामचंद्र डिंगरे, डॉ. केदार करपे आणि डॉ. विनायक परुळे उपस्थित आदी होते.

## महत्वाचे...



### रस्ते अपघातात नळदुर्गच्या दुचाकी स्वाराचा मृत्यू

**सोलापूर, दि. १७ जून-**

रस्ते अपघातात जखमी झालेल्या नळदुर्गच्या दुचाकी स्वाराचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात मंगळवारी रात्री आठ वाजता मृत्यू झाला. बालाजी उत्तम शिंदे (वय ४६ वर्ष, रा. नळदुर्ग) असे त्या मयत दुचाकी स्वाराचे नाव असून तो मंगळवारी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास जेवळी कडून नळदुर्ग कडे दुचाकीवरून येत असताना एका रस्ते अपघातात तो गंभीर जखमी अवस्थेत मिळून आला. त्याला नळदुर्ग येथील आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात आई फुलाबाई यांनी सायंकाळी साडेचार वाजता दाखल केले असता त्याचा उपचारादरम्यान रात्री आठ वाजता मृत्यू झाला.

### कडबा काढताना सर्पदंश; वृद्ध शेतकऱ्याचा जागेवर मृत्यू

**सोलापूर, दि. १७ जून-**

शेतामध्ये कडबा काढत असताना उजव्या हाताला सर्पदंश झाल्याने एका ७५ वर्षीय शेतकऱ्याचा जागेवर मृत्यू झाल्याची घटना तुळजापूर तालुक्यातील गुळहळ्ळी येथे मंगळवारी सायंकाळी घडली. विठ्ठल सखाराम निकम (वय ७५ वर्ष, रा. गुळहळ्ळी)असे त्या मयत शेतकऱ्याचे नाव असून ते मंगळवारी सायंकाळी पाच वाजता शेतामध्ये कडबा काढत होते. त्यावेळी त्यांच्या हाताला एका सापाने चावा घेतला. त्यामुळे त्यांना नळदुर्ग येथील आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात रात्री नऊ वाजता नातु दत्ता निकम याने दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले.

### दारुड्या मुलाकडून आईला लाथा बुक्क्यांनी मारहाण

**सोलापूर, दि. १७ जून-**

दारुड्या मुलाने आपल्या आईला डोक्याचे केस ओढून लाथा बुक्यांनी मारहाण केल्याची घटना दक्षिण सदर बाजार येथे मंगळवारी घडली. कमला रमेश आंबेवाले (वय ४४ वर्षे, रा. १०४ सदर बाजार, सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या आईचे नाव आहे. त्या मंगळवारी दुपारी घरात असताना त्यांना अज्ञात कारणावरून मुलाने केस ओढून लाथा बुक्यांनी मारहाण केली. यात सर्व अंगाला मार लागल्याने त्यांना उपचारा करता येतील शासकीय रुग्णालयात मुलगी चंदा हिने सायंकाळी दाखवले केले.

### जांभळे काढताना पहिल्या मजल्यावरून पडल्याने जखमी

**सोलापूर, दि. १७ जून-**



घराच्या पहिल्या मजल्यावरून जांभळे काढताना तोल जाऊन खाली पडल्याने एक व्यक्ती जखमी झाल्याची घटना एमआयडीसी भागातील नेताजी शाळेजवळ आज बुधवारी दुपारी बारा वाजता घडली. मल्लिकार्जुन नागनाथ गडेप्पा (वय ५५ वर्ष, रा नेताजी शाळा जवळ, नीलम नगर, सोलापूर) असे त्या जखमी व्यक्तीचे नाव असून ते आज दुपारी घराच्या पहिल्या मजल्यावर जाऊन जांभळे काढत होते. त्यावेळी ते कॉल जाऊन खाली पडले. यात मार लागून जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरिता पत्नी लक्ष्मीबाई यांनी दुपारी दाखल केले.

### खेळताना घराच्या गच्चीवरून पडल्याने मुलगी जखमी

**सोलापूर, दि. १७ जून-**

घरामध्ये खेळताना गच्चीवरून तोल जाऊन खाली पडल्याने एक अकरा वर्षाची बालिका जखमी झाल्याची घटना बापूजी नगर येथे मंगळवारी सायंकाळी घडली. सोनी भीमप्पा भंडारे (वय ११ वर्ष, रा. बापूजी नगर सोलापूर असे त्या जखमी मुलीचे नाव असून ती मंगळवारी सायंकाळी साडेसहा वाजता घरावरील गच्चीवर खेळत होती आणि खेळता खेळता ती खाली पडली. यात डोक्याला व हाताला मार लागल्याने तिला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात चुलते कृष्णा शिंदे यांनी संध्याकाळी सात वाजता दाखल केले.

# महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांची जिल्हाधिकारी कार्यालयात बदली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**



सोलापूर महानगरपालिकेतील उपायुक्त (कर निर्धारक व संकलन अधिकारी) यांची आशिष लोकरे यांची प्रशासकीय कारणास्तव सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात सहआयुक्त गट-अ पदावर बदली करण्यात आली आहे.

शासनाने सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने ही बदली करत लोकरे यांची जिल्हाधिकारी कार्यालयातील रिक्त पदावर प्रशासकीय कारणास्तव नियुक्ती केली आहे. सध्या ते सोलापूर महानगरपालिकेत उपायुक्त (कर) म्हणून कार्यरत आहेत. शासनाच्या आदेशानुसार उपायुक्त लोकरे यांना १७ जून २०२६ रोजी त्यांच्या सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करण्यात येणार असून, १८ जून रोजी नव्या पदावर रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच रुजू झाल्यानंतर त्याचा अनुपालन अहवाल तात्काळ शासनाकडे सादर करण्यास सांगण्यात आले आहे.महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार हा आदेश जारी करण्यात आला असून, शासनाच्या उपसचिव प्रियांका कुलकर्णी-छापवाले यांनी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

आशिष लोकरे हे दिनांक २५ जुलै २०२३ रोजी सोलापूर महापालिकेत उपायुक्त म्हणून रुजू झाले. त्यांच्याकडे महापालिकेतील कर विभागाचा पदभार देण्यात आला. त्यानंतर त्यांनी कर विभाग अत्यंत सुसूत्र पद्धतीने सांभाळाला. त्यांच्या या कार्यकाळामध्ये महापालिकेत दोन वेळा १०० टक्के शास्ती माफीचा निर्णय घेण्यात आला. विशेष म्हणजे कर विभागांतर्गत त्यांच्या मार्गदर्शनाखाली इष्टांक पूर्ण करून त्याहीपेक्षा जास्तची कर वसुली करण्यात या विभागाला यश मिळाले. ३१ मार्च २०२५ रोजी एकाच दिवशी १२ कोटी रुपये रेकॉर्ड ब्रेक कर वसुली झाली होती. या विभागात नियोजनबद्ध काम केल्याने कोट्यावधी रुपयाची कर वसुली झाली आहे. ३१ डिसेंबर पर्यंत तब्बल ११२ कोटी रुपये कर वसुली करून नवा विक्रम केला आहे.

# सोलापुरात विद्यापीठ विकास कृती समितीची स्थापना



### संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांचे प्रश्न सोडविणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ जून -**


पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्न विविध संस्था व महाविद्यालयांची बैठक सोलापूर येथील छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज येथे संपन्न झाली. या बैठकीत संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांचे शासन पातळीवरील व विद्यापीठस्तरीय प्रश्न सोडवण्यासाठी विद्यापीठ विकास कृती समिती, सोलापूरची स्थापना करण्यात आली आहे.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संस्था चालक संघटनेच्या अध्यक्षा पद्मजादेवी मोहिते पाटील या होत्या. शासन, विद्यापीठ आणि विद्यापीठाशी संलग्नित सर्व संस्था व महाविद्यालये यांच्यातील संवाददरी विकसित व्हावी, या हेतूने ही कृती समिती स्थापन करण्यात आली आहे. बैठकीत शासन, विद्यापीठ, संस्था, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या विविध शैक्षणिक समस्या व अडचणींवर सविस्तर चर्चा झाली. या समस्या सोडवण्यासाठी सर्व संघटनांनी एकत्र राहून विद्यापीठाच्या आणि महाविद्यालयांच्या विकासासाठी प्रयत्न करण्याच्या हेतूने सर्वांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे.

या बैठकीस संस्थाचालक संघटना, प्राचार्य संघटना, सुटा संघटना, प्रशासकीय कर्मचारी संघटना तसेच अन्य संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# जागतिक विधवा महिला दिनी विधवा महिलांचे प्रश्न सुटणार

## योजनांपासून वंचित घटकांसाठी प्रशासनाची मोठी मोहीम



### सर्वेक्षणात ८६ हजार एकल महिलांची नोंद

**तभा वृत्तसेवा। यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.१७ जून**

महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'एकल महिला सर्वेक्षण-२०२६'मधून जिल्ह्यातील एकल, घटस्फोटित, परित्यक्ता आणि विधवा महिलांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचे महत्त्वपूर्ण चित्र समोर आले आहे. अंगणवाडी सेविकांमार्फत गावपातळीवर करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात तब्बल ८६ हजार २२९ एकल महिलांची नोंद झाली असून, शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळिवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर महिलांना प्रशासनाच्या मदतीची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महिला व बाल विकास विभागाने या सर्वेक्षणाद्वारे केवळ महिलांची संख्या नोंदविण्यावर भर न देता त्यांना कोणत्या शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही, कोणत्या सेवांसाठी मदतीची आवश्यकता आहे आणि त्यांच्या मूलभूत अडचणी कोणत्या आहेत, याचाही सखोल अभ्यास केला आहे.

सर्वेक्षणानुसार, 'लाडकी बहीण' योजनेपासून वंचित असलेल्या महिलांची संख्या ५८ हजार ३५७ इतकी आहे. तसेच ५३ हजार २२० महिलांना श्रावणबाळ योजनेचा लाभ मिळिवण्यासाठी मदतीची आवश्यकता आहे. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजनेसाठी ५२ हजार २४२, तर राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेसाठी ४८ हजार ७३ महिलांना सहाय्याची गरज असल्याचे निदर्शनास आले आहे.

मालमत्ता आणि हक्कांशी संबंधित प्रश्नही मोठ्या प्रमाणात समोर आले आहेत. तब्बल ३१ हजार ४३९ महिलांना जातीचे प्रमाणपत्र, २६ हजार ४६४ महिलांना जन्म-मृत्यू दाखले, तर २४ हजार १८४ महिलांना मालमत्ता हक्क नोंदणीसाठी मदतीची आवश्यकता असल्याचे सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय आधार कार्ड, आयुष्मान कार्ड, बँक खाते, वारस प्रमाणपत्र आणि रेशनकार्डाशी संबंधित अडचणीही मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून आले.

जिल्ह्यातील सर्वाधिक एकल महिलांची नोंद दक्षिण सोलापूर प्रकल्प क्षेत्रात ९ हजार ६२५ इतकी झाली आहे. त्यापाठोपाठ अक्कलकोटमध्ये ९ हजार ५०९, करमाळा येथे ७ हजार २९२, माळिशरस येथे ६ हजार ५६२ आणि बार्शी येथे ६ हजार १३५ महिलांची नोंद झाली आहे. हे सर्वेक्षण भविष्यातील 'एकल महिला धोरणा'साठी महत्त्वाचा आधार ठरणार असून, विविध योजनांपासून वंचित राहिलेल्या महिलांपर्यंत शासनाच्या सेवा पोहोचविण्यासाठी प्रशासनाला दिशा देणारे ठरणार आहे. जिल्ह्यातील हजारो महिलांच्या हक्क, सन्मान आणि स्वावलंबनाच्या दृष्टीने हे सर्वेक्षण एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

#### जागतिक विधवा महिला दिन

दि. २३ जून रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आला आहे. त्याच दिवशी जागतिक विधवा महिला दीन आहे. महिला दिनानिमित्त विधवा महिलांचे विविध प्रश्न मार्गी लागणार असल्याने महिलांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

#### सर्वेक्षणातील ठळक निष्कर्ष

| | |
|---|---|
| एकूण नोंद झालेल्या एकल महिला : | ८६,२२९ |
| लाडकी बहीण योजनेपासून वंचित : | ५८,३५७ |
| श्रावणबाळ योजनेसाठी मदतीची गरज : | ५३,२२० |
| वृद्धापकाळ निवृत्ती वेतनासाठी मदतीची गरज : | ५२,२४२ |
| राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेसाठी मदतीची गरज : | ४८,०७३ |
| जातीचे प्रमाणपत्र आवश्यक : | ३१,४३९ |
| जन्म-मृत्यू दाखल्यासाठी मदतीची गरज : | २६,४६४ |
| मालमत्ता हक्क नोंदणीसाठी मदतीची गरज : | २४,१८४ |
| सर्वाधिक नोंद : दक्षिण सोलापूर | (९,६२५) |
| दुसऱ्या क्रमांकावर : अक्कलकोट | (९,५०९) |

#### २३ जून रोजी एकल महिला धोरण कार्यशाळा

राज्य सरकार स्वतंत्र 'एकल महिला धोरण' तयार करत आहे. या धोरणाला अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि वास्तवाधिष्ठित स्वरूप देण्यासाठी सोलापूर जिल्ह्यात २३ जून रोजी जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद सोलापूर येथे सकाळी ११ वाजता होणाऱ्या याकार्यशाळेत एकल महिला, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, संशोधक, अभ्यासक, विषयतज्ज्ञ तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी सहभागी होणार आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४७५

**करी इंद्रियांची सेवा। पाहे आवडीचा हेवा।।**

भगवंताचे म्हणजे जीवमात्राचे प्रेम मिळवायचे असेल तर माणसाने नि:स्वार्थता जोपासला पाहिजे. नि:स्वार्थाशिवाय भगवंत समजणे कठीण आहे. आशा ठेवूनच कार्य करायचे किंवा आशेविना कार्य करायचेच नाही, अशी मनोवृत्ती असणाऱ्यांना भगवंताची प्रचिती येण्याचा प्रश्न उद्धवत नाही. आशा ही माया, मोह, अहंकार, ईर्षा, द्वेषाच्या निर्मितीला सहाय्यकारी ठरते. या सर्वांच्या निर्मितीमुळे माणूस कळत न कळत पराधीन होत जातो. त्याची ही पराधिनता इंद्रियाधिनतेला बळकटी देते. इंद्रियाच्या अधिन झालेल्या मानवाकडून चांगले घडण्याची किंवा फलेच्छारहित कार्य होण्याची अपेक्षा दुरापास्त असते. इंद्रियाधिन झालेल्या व्यक्तीला इंद्रियांचे लळे पुरविण्यातच आनंद वाटत असतो. इंद्रियांची सेवा त्याचेकडून घडली नाही किंवा इंद्रियांना हवे ते विषय तो पुरवू शकला नाही, तर असा व्यक्ती अस्वस्थ होतो. त्याची ही अस्वस्थता चिंतेला जन्म देते. चिंतेचा जन्म म्हणजे विविध रोगांना आमंत्रणच होय. रोगी माणसाची मानसिकताही रोगीच होते. रोगी मन मानसिक दारिद्र्याला जन्म देते.



आर्थिक दारिद्र्य घालवणे सोपे असते, पण मानसिक दारिद्र्य घालवणे अवघड असते. हे सर्व इंद्रियाधिन होण्यामुळे किंवा इंद्रियांना विषय पुरविण्यात आनंद मानल्यामुळे होते. आशा व मी ला जोपासणारा माणूस इंद्रियांची सेवा करण्यात तसेच आवडीच्या विषयाची हांव धरण्यातच आनंदी असतो. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,
**करी इंद्रियांची सेवा। पाहे आवडीचा हेवा।।**

इंद्रियांची सेवा करणे आणि विषयांचा हव्यास धरणे, हे वाईट असते. इंद्रियांचे पुरवावे तेवढे लळे कमीच असतात. इंद्रियांची सेवा हा न संपणारा विषय असल्याने त्यावर नियंत्रण करणेच योग्य असते. विषयाचा हव्यास हा सातत्याने वाढत जाणारा विषय आहे. इंद्रियांने आता बस पुरे झाले, असे म्हणणे शक्य नाही. म्हणून त्यांच्यावर नियंत्रण करणे, त्यांना आपल्या अधिन ठेवण्याचा प्रयत्न करणे एवढाच त्यावर उपाय आहे. आपली इंद्रिये किती सैरावैरा धांवू द्यायची? विषयाच्या मागे किती धांवायचे? हे ज्याचे त्याचेवर अवलंबून असते. इंद्रियांना अधिन कसे करायचे? विषयांचा हव्यास कसा सोडायचा? याबाबत संत महात्म्ये फक्त मार्गदर्शन करु शकतात. प्रत्यक्ष कृती मात्र आपणालाच करावी लागणार आहे. फक्त एवढीवेळच इंद्रियांचा लळा पुरवू किंवा आजचा दिवसच त्यांची सेवा करु आणि उद्यापासून बंद करु असे म्हणून चालत नाही. कारण उद्या काही उजाडत नसते. उद्याचा दिवस उद्या आज होत असतो. अर्थात, एवढी वेळ किंवा आजचा दिवस असे न म्हणता लागलीच इंद्रियांना अधिन करण्याचा, विषय मुक्त होण्याचा प्रयत करायला हवा. इंद्रियाधिनता आणि विषयाच्या मागील धांव हा आत्मज्ञानाच्या मार्गातील सर्वात मोठा अडसर होय. हा अडसर ज्याला दूर करता आला, तो आत्मज्ञानाने शिखर गाठण्यात यशस्वी होऊ शकतो. आपले मन फार बळकट असते. या बळकट मनाला आपण योग्य ती दिशा दयायला हवी. योग्य दिशा दिली तर काहीही अवघड नाही. आपले जीवन सहजपणे सुखमय होऊ शकते. असो, इंद्रियाधिन होण्याला आपण स्वत:च कारणीभूत असल्याने इंद्रियांना अधिन करण्याचे कार्यही आपणा स्वत:लाच करावे लागणार आहे. आपल्या ह्या सत्कार्याला ज्ञानोबा-तुकारामांची कृपा लाभो, अशी सद्गुरुचरणी प्रार्थना. आमची ही प्रार्थना फलित होण्यासाठी आपण श्रध्दापुर्वक ज्ञानोबा तुकोबा माऊलींचे ज्ञान जाणून घ्यायला हवे. आपला हा प्रयत्न यशस्वी होवो अशीही प्रार्थना. जय जय राम कृष्ण हरी।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरूवार,
दि. १८ जून २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - ज्येष्ठ शु. चतुर्थी
ऋतु - ग्रीष्म ।
नक्षत्र- पुष्य (११.३२)
योग - व्याघ्रात (१७.३५)
करण - वणिज (०८.१४)
राहू काल : गुरूवार
दु. ०१.३० ते ०३.००

दिनविशेष : १५७६: मुघल सम्राट अकबर आणि महाराणा प्रताप यांच्यात प्रसिद्ध हळदीघाटाची लढाई सुरू झाली.
१९२५: प्रख्यात भारतीय चित्रपट दिग्दर्शक वि. शांताराम (शांताराम राजाराम बापट) यांचा जन्म.
१९८७: 'गोवा क्रांती दिना'च्या निमित्ताने गोवा मुक्ती लढ्याचा इतिहास अधिकृतपणे अधोरेखित करण्यात आला.



## जिजाऊ स्मारकासाठी भरघोस निधीची तरतूद करण्याची पालकमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून-**

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या ३५२व्या स्मृतिदिनानिमित्त संभाजी ब्रिगेडच्या वतीने चार हुतात्मा पुतळ्याजवळील नियोजित राष्ट्रमाता जिजाऊ स्मारकाजवळ जिजाऊंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संभाजी ब्रिगेडच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ यांचे शहरात कुठेच स्मारक किंवा पुतळा नाही त्यामुळे अभिवादन करताना शिवभक्तांना अडचण येत आहे राष्ट्रमाता जिजाऊ स्मारकका साठी सोलापूर चे पालकमंत्री व मध्ये चे आमदार देवेंद्र कोठे यांनी भरघोस निधी ची तरतूद करावी आणि लवकरात लवकर सोलापूर शहरांमध्ये राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त व स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यासाठी स्मारक उभारण्यात यावे अशी मागणी करण्यात आली.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, विक्रम वानकर, शेखर भोसले, विशाल साळुंखे, विकास तीरेकर, संतोष सुरवसे, दत्तात्रय डिंगणे, मनीषा कोळी, सोनाली सगर, अनिल जोशी, मनोज पवार उपस्थित होते.



# ६४ कोटींच्या प्रतीक्षेत जलजीवन मिशनची कामे ठप्प

## 'हर घर जल'चे स्वप्न अधांतरी; जिल्ह्यातील शेकडो गावांतील योजना रखडल्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'हर घर जल' संकल्पनेला सोलापूर जिल्ह्यात निधीअभावी खीळ बसली आहे. जिल्ह्यात जलजीवन मिशनअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या अनेक पाणीपुरवठा योजनांची कामे रखडली असून, थकीत देयके न मिळाल्याने ठेकेदारांनी कामे बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी शेकडो गावांतील नागरिकांना अद्यापही पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत जिल्ह्यात जलजीवन मिशनच्या एक हजार नऊ योजना मंजूर करण्यात आल्या होत्या. त्यापैकी चारशेहून अधिक गावांतील कामे पूर्ण होऊन घराघरांत नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू झाला आहे. मात्र उर्वरित योजनांना निधीअभावी ब्रेक लागला आहे. शासनाकडे तब्बल ६४ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली असली तरी अद्याप निधी उपलब्ध झालेला नाही. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे सध्या २६५ बिलांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याची माहिती समोर आली आहे. थकीत रक्कम न मिळाल्यामुळे अनेक ठेकेदारांनी कामे मंदावली किंवा पूर्णपणे बंद केली आहेत.

कामे रखडल्याने अनेक गावांतील जलजीवन मिशनची उद्दिष्टे अपूर्ण राहिली असून ग्रामस्थांना विहिरी, हातपंप आणि टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी विभागाकडून संबंधित ठेकेदारांना वारंवार नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. मात्र निधीअभावी कामांचा वेग वाढत नसल्याने प्रशासनापुढेही मोठे आव्हान उभे राहिले आहे.

**जलजीवन मिशनची सद्यस्थिती**
मंजूर योजना : १,००९
पूर्ण झालेली गावे : ४०० पेक्षा अधिक
प्रलंबित बिले : २६५
शासनाकडे निधी मागणी : ६४ कोटी रुपये
अनेक ठिकाणी कामे ठप्प

**'नळजोडणी घरापर्यंत पोहोचली, पण पाणी अजूनही दूरच'**
जलजीवन मिशनच्या यशस्वी दाव्यांमागील वास्तव अधोरेखित करणारी ही परिस्थिती ग्रामीण भागातील पाणीटंचाईचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणत आहे. निधी वेळेत उपलब्ध न झाल्यास आगामी उन्हाळ्यात अनेक गावांमध्ये पाणीपुरवठ्याचे संकट अधिक तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



## श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयाच्या व्हाईस चेअरमनपदी राजेशम येमूल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून-**

येथील श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयच्या व्हाईस चेअरमनपदी राजेशम भुमय्या येमूल यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सहाय्यक उपनिबंधक उमेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत ही निवड करण्यात आली.

संचालिका डॉ.लता मिड्डाकोल यांच्या हस्ते मावळते व्हाईस चेअरमन रमेश श्रीहरी विडप यांचा सत्कार करण्यात आला. डॉ.माणिक गुर्रम, डॉ. विजयकुमार अरकाल यांनी आतापर्यंत केलेल्या कार्याविषयी यावेळी गौरवोद्गार काढण्यात आले.

रुग्णालयच्या व्हाईस चेअरमनपदी काम करण्याची संधी दिल्याबद्दल रमेश विडप यांनी प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली यांच्यासह सर्व संचालक मंडळ, डॉक्टर्स, अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले. नूतन व्हाईस चेअरमन यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी डॉ.सचिन बलदवा, लक्ष्मीनारायण कुचन, श्रीनिवास कमटम, अशोक आडम, मनोहर अन्नलदास, पार्वतय्या श्रीराम, इरेशम कोपेंल्ली, माधवी चिटयाल, डॉ.भारत मुळे, स्वामी आकेन, दुर्गादास येमूल आदी उपस्थित होते.

## अपरिचित संस्थेतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून-**

मनपा मुलांची मराठी शाळा क्रमांक २९, भवानीपेठ येथील विद्यार्थ्यांना अपरिचित सामाजिक संस्था वएचडीएफसी बँक व कोटक बँक अधिकारी मित्र परिवारातर्फे सालाबादप्रमाणे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. अपरिचित बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मयूर गवते यांच्या माध्यमातून दरवर्षी हा उपक्रम राबविण्यात येत असून यंदाही गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य प्रदान करण्यात आले.

मुख्याध्यापक नवनाथ माळी यांनी शाळेची ओळख करून देताना विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा तसेच इतर शैक्षणिक उपक्रमांमध्ये मिळिवलेल्या यशाची माहिती दिली. याप्रसंगी अनिरुद्ध पालखे, प्रकाश पाटील, लक्ष्मण शिंदे, अनमोल धवलशंक, विकास इंगळे, अंकिता कामुनी, रुपेश दुधनी, अक्षय कांबळे, संकेत बावळे, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन पुणे प्रादेशिक संघटक सुनील काळे व मयूर गवते उपस्थित होते. सूत्रसंचालन अरुण डोके यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक नवनाथ माळी यांनी केले तर आभार अविनाश हिंगणे यांनी मानले.

## कॉरिडोर अरिष्ट निवारणार्थ पुरुषोत्तम यागची सांगता



**संभाव्य चाळीस कॉरिडोर बाधितांचा सहभाग**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ जून -**

कोरिडोर अरिष्ट निवारणार्थ, अधिक मासानिमित्त, हिंदुमहासभा भवनात सप्तदिनात्मक पुरुषोत्तम याग तथा विष्णुयाग संपन्न झाला. ९ जून रोजी सुरू झालेल्या या यज्ञाची सांगता १५ जून रोजी पुर्णाहुतीने झाली.

यज्ञाचे वेळी येथील शुक्ल यजुर्वेदी काण्वशाखीय वेदपाठशालेने यज्ञीय पौरोहित्य व कर्मकांड पार पडले. विविध जातीय सुमारे चाळीस संभाव्य कारिडोर बाधित दांपत्यांनी यज्ञात प्रत्यक्ष सहभाग घेतला. सकाळी रोज सात ते साडेअकरा या वेळात हवन तर सायंकाळी वेगवेगळ्या महिला भजनी मंडळांचे भजन सादर होत होते.

सोमवारी यज्ञ सांगतेची अवभृत स्नानाची जंगी दिंडी मिरवणूक काढण्यात आली. चंद्रभागा मातेला साडी-चोळी अर्पण करुन आहुती देवून वंदन करण्यात आले. बराच बाधित समाज उपस्थित होता. शासनाकडे मागणी, आंदोलन याबरोबरच ईश्वराकडेच मागणी करण्यासाठी या विष्णुयागाचे आयोजन केले होते.

शेवटच्या दिवशी काल्याचे अभंग म्हणून मोठ्या प्रमाणात काला व शिरा महाप्रसाद भाविकांना वाटप करण्यात आला. सबंध अधिक महिन्यात हा सर्वात मोठा यज्ञ पंढरीत झाला.



## न्या. तेजवंतसिंघ संधू यांची आपुलकी संस्थेला ५ हजार १०० ची देणगी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१७ जून-**

सांगोला येथे तीन वर्षे न्यायदानाचे कार्य केलेले न्या. तेजवंतसिंघ संधू यांनी समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला यांच्या शैक्षणिक साहित्य भेट उपक्रमासाठी ५ हजार १०० ची देणगी देत सामाजिक उत्तरदायित्वाचे दर्शन घडविले.

त्यांच्या या उदार योगदानामुळे गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी मोठी मदत होणार असल्याची भावना आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांनी व्यक्त केली. न्यायासनावरील कर्तव्य आणि समाजाप्रती असलेली संवेदना यांचा सुंदर संगम घडविणारे न्या.तेजवंतसिंघ संधू यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणेचा दीप ठरत आहे.



## अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापू, दि. १७ जून-**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सोलापूर महानगर आयोजित छात्र गौरव गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा सायंकाळी ४ वाजता शिंदे चौक येथील शिवस्मारक संकुल सभागृहात संपन्न झाला.

या कार्यक्रमामध्ये इयत्ता दहावी (एस.एस.सी.) परीक्षेत ७५ टक्के व त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या तसेच बारावी (एच.एस.सी.) परीक्षेत ६५ टक्के व त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांचा व मार्गदर्शक शिक्षकांचाही सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून ए.सी.एस. हॉस्पिटलचे सुप्रसिद्ध डॉक्टर व डायरेक्टर डॉ. सिद्धांत गांधी, शिवस्मारक संकुल सभागृहाचे अध्यक्ष रंगनाथ बंकापुरे, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रदेश सहमंत्री श्रावणी बाचल, अभाविप सोलापूर महानगर अध्यक्ष प्रा. प्रशांत चाबुकस्वार तसेच कार्यक्रम प्रमुख मुकेश राठोड उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत परिश्रम, शिस्त, आत्मविश्वास आणि राष्ट्रनिष्ठा या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या मागे न लागता सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासावर भर द्यावा, असे मार्गदर्शन मान्यवरांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक व अभाविप कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी व नेतृत्वगुण विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा सोहळा अत्यंत यशस्वी व प्रेरणादायी ठरला.

## पी.एम. विकसित भारत रोजगार योजना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून-**




केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना या महत्त्वाकांक्षी योजनेचा प्रारंभ पंतप्रधानांच्या हस्ते शुक्रवार दि. १९ जून रोजी नवी दिल्ली येथून आभासी पद्धतीने होत आहे. त्यानिमित्त सोलापूर जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन दुपारी ४ वाजता डब्ल्यू.आय.टी. अभियांत्रिकी महाविद्यालयात केल्याचे कर्मचारी भविष्य निधी संघटनेचे क्षेत्रीय भविष्य निधी आयुक्त पुरुषोत्तम मीना यांनी सांगितले.

योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील मोठ्या संख्येने कामगार आणि नियोक्त्यांना लाभ मिळाला आहे. आतापर्यंत एकूण १ हजार ८४ कर्मचाऱ्यांना ५० लाख ८१ हजार ७५९ रुपयांचा लाभ दिला आहे. १८४ नियोक्त्यांना ४ कोटी ९६ लाख ४ हजार ८७१ रुपयांचे प्रोत्साहन दिले आहे. कार्यक्रमादरम्यान पात्र लाभार्थ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करणार आहे. औपचारिक रोजगार आणि उपजीविकेच्या संधी बळकट करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मीना यांनी सांगितले. कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी, लाभधारक संस्थांचे प्रतिनिधी, कर्मचारी, नियोक्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

योजनेसाठी केंद्र सरकारने ९९ हजार ४४६ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. देशभरात ३.५ कोटींहून अधिक रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट आहे. विशेषतः उत्पादन क्षेत्रात अतिरिक्त औपचारिक रोजगार निर्माण करणाऱ्या नियोक्त्यांना आणि प्रथमच नोकरी करणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. देशातील सुमारे १.९२ कोटी नव्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा फायदा होण्याची अपेक्षा आहे. पात्र नियोक्ते आणि नोकरी शोधणाऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, तसेच विकसित भारत या संकल्पनेला हातभार लावावा, असे आवाहन आयुक्त मीना यांनी केले आहे. पत्रकार परिषदेत हर्षवर्धन कांबळे, अमृत मोडके उपस्थित होते.



## नाझरे जि.प. शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १७ जून-**

जि.प.प्रा.शाळा, नाझरे (ता.सांगोला) येथे शाळेच्या पहिल्या दिवशी शिक्षक व शाळा समितीने विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी गावातून ट्रॅक्टर मधून मिरवणूक काढली. जि.प.शिक्षण सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी सर्व विद्यार्थ्यांचे पुस्तके, फुले देऊन स्वागत केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उमेश पाटील, उपाध्यक्ष अश्विनी रायचुरे, सदस्य सोनाली भोसरी, प्रियांका मंडले, सुरेश चौगुले, रविराज शेटे, प्रवीण पाटील, रमेश पाटील, केंद्रप्रमुख मल्लय्या मठपती उपस्थित होते.

## महत्वाचे...



### राऊंड टेबल जीवनज्योत प्रशालेत लेखणी, पुस्तके देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत

**दक्षिण सोलापूर, दि. १७ जून-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगावच्या राऊंड टेबल जीवनज्योत प्रशालेत शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती मान्यवरांच्या हस्ते लेखणी व नवीकोरी पुस्तके देऊन स्वागत केले. पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसत होता. संस्थापक शिक्षणमहर्षी दि.शि.कमळे यांच्या प्रतिमेचे पूजन शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष संजय कोले, जिल्हा समाजसेवा मंडळाचे सहसचिव प्रा. सुबोध कोळी, उद्योजक धनेश कडते आदी मान्यवरांच्या हस्ते केले. या वेळी पोलिस पाटील कैलास कडते, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ जोकारे, शशिकांत बनसोडे, शिक्षणप्रेमी राहुल उडाणशिव, केदार नानाजे, उमेश कोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी प्राचार्यपदी आर. बी. यलगोंडे व पर्यवेक्षकपदी एस.बी.जमादार यांची पदोन्नतीवर निवड झाल्याबद्दल संजय कोले, प्रा. सुबोध कोळी, धनेश कडते व सोमनाथ जोकारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



### आ. बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते एखतपूर केंद्र शाळेत वृक्षारोपण

**सांगोला, दि. १७ जून-**
जि. प. प्रा. केंद्र शाळा, एखतपूर (ता.सांगोला) येथे नव्या शैक्षणिक वर्षाचा प्रवेशोत्सव व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात झाला. कार्यक्रमाची सुरुवात इ.पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सवाद्य मिरवणुकीने झाली. यावेळी गावातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शाळेत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, जि.प.सदस्या सिंधु आलदर, गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले, सरपंच वर्षा जाधव, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रतिक्षा नीलकंठ यांच्या हस्ते करण्यात आले. खासगी शाळांमधून जि.प.शाळेत प्रवेश घेतलेल्या २० विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. केंद्रप्रमुख सुखदेव लवटे, ग्रामविकास अधिकारी शंकर मेटकरी, कृ.उ.बा.समितीचे सदस्य हरिबा इंगोले उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक हणमंत जाधव यांनी केले. कार्यक्रमासाठी शिक्षक दिलीप नवले, भारत मेटकरी, नीलकंठ, ज्ञानेश्वर इंगोले, निसार इनामदार, काळेबाग, संजय बुरांडे यांनी परिश्रम घेतले.



### बोकडदरा जि. प. शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात

**माढा, दि. १७ जून -**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोकडदरावाडी (उपळाई बुद्रुक) (ता. माढा) येथे प्रवेशोत्सव २०२६ अंतर्गत इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची गावातून ट्रॅक्टरमधून मिरवणूक काढण्यात आली. नंतर सोलापूर जिल्हा परिषद मुख्य वित्त व लेखाधिकारी मीनाक्षी वाकडे यांच्या हस्ते नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबाचे फुल, फुगे व खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक व गणवेशाचे वाटपही करण्यात आले. मीनाक्षी वाकडे यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना वही, पेन व खाऊचे वाटप करण्यात आले. केंद्रप्रमुख दिगंबर काळे यांनी उपळाई बुद्रुक केंद्रात राबवत असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची मान्यवरांना माहिती दिली. मुख्याध्यापक पांडुरंग शिंदे यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. मीनाक्षी वाकडे यांनी शाळेला सहा कपाटे, अमृत रसोई अंतर्गत किचन शेड दुरुस्तीसाठी अनुदान मंजूर केल्याबद्दल तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया आणि जिल्हा परिषद कर्मचारी यांच्यामध्ये सामंजस्य एमओयु करार करून कर्मचाऱ्यांचे भविष्य सुरक्षित केल्याबद्दल त्यांचे आभार मानून सत्कार केला. 'एक पेड मां के नाम' या उपक्रमांतर्गत मीनाक्षी वाकडे यांच्याहस्ते वृक्षारोपण केले. कार्यक्रमासाठी विनोद वाकडे, गोरख वाकडे, अमित वाकडे, दिलीप वाकडे, परमेश्वर वाकडे, सचिन वाकडे, दिनेश वाकडे, महादेव वाकडे, रवींद्र जाधव उपस्थित होते. मुख्याध्यापक पांडुरंग शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. धनाजी घाडगे यांनी आभार मानले.

### थोरली इरण्णा वस्ती येथे तक्रार सोडविणाऱ्या तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. १७ जून-**
तक्रार सोडविण्यासाठी मध्ये आलेल्या एका तरुणाला तिघांनी विटेणे मारहाण केल्याची घटना थोरली इरण्णा वस्ती येथे मंगळवारी रात्री अकरा वाजता घडली. ईश्वर कृष्णा म्हेत्रे (वय ३३ वर्ष , रा. थोरली इरणावस्ती सोलापूर ) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून मंगळवारी रात्री घराजवळ तक्रार चालू असताना तो सोडविण्यासाठी गेला असता त्याला तू का मध्ये पडतो असे म्हणून सालोमन ज्योती, सुनंदा ज्योती व विनोद ज्योती या तिघांनी मिळून विटेने मारहाण केली. यात डोक्याला जखम झाल्याने त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात शेजारी उमेश भंडारे यांनी मध्यरात्री दाखल केले.

# ज्येष्ठांच्या आरोग्य सुरक्षेसाठी आरोग्य विभाग दक्ष

## सुरु केली विशेष मोहिम

### वृद्धाश्रमात आरोग्य तपासणी, मार्गदर्शन आणि पॅलिएटिव्ह केअर सेवांचा आढावा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून-**
ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकांना दर्जेदार, सन्मानपूर्वक आणि सर्वसमावेशक आरोग्य सेवा मिळण्यासाठी आरोग्य विभागाने पुढाकार घेतला आहे. मोरवंची येथील प्रार्थना फाउंडेशन वृद्धाश्रमात पॅलिएटिव्ह केअर अंतर्गत विशेष भेट व मार्गदर्शन कार्यक्रम घेतला. वृद्धांच्या आरोग्यविषयक गरजांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला.

अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे यांनी वृद्धाश्रमास भेट देऊन तेथील २४ ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला. वाढत्या वयात आरोग्याची काळजी कशी घ्यावी, नियमित तपासण्यांचे महत्त्व आणि निरोगी जीवनशैली कशी अंगीकारावी याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग कार्यक्रमांतर्गत रक्तदाब, मधुमेह, कर्करोग व क्षयरोग तपासणीविषयी माहिती देण्यात आली. वृद्धाश्रमातील आरोग्य सुविधांचा आढावा घेताना तेथील सेवा समाधानकारक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तत्पूर्वी त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र शिरापूर येथे भेट देऊन परिसर पाहणी केली. औषध भांडार विभागाची तपासणी करून कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. तसेच सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेऊन कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी मार्गदर्शन केले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अरुण पाथरुडकर, जिल्हा सांख्यिकी अधिकारी हेमंत पवार उपस्थित होते.

> **सातत्यपूर्ण आरोग्य सेवा देणार**
> ज्येष्ठ नागरिकांना अधिक सुलभ, प्रभावी आणि सातत्यपूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभाग कटिबद्ध आहे.
> **- डॉ. नंदकिशोर घाडगे,**
> अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी.

# खोटले येथील स्वामींच्या पालखीचे वटवृक्ष मंदिरात आगमन

## चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते स्वागत



▶ खोटले येथील स्वामींच्या पालखीचे वटवृक्ष मंदीरात स्वागत करताना चेअरमन महेश इंगळे व अन्य भक्त.

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि १७ जून -**
मालवण तालुक्यातील श्री क्षेत्र खोटले येथील पालखी सोहळा स्वामी भक्तांसह आज येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानमध्ये विसावली. अधिक मासाचे औचित्य साधून कोकणातील मालवण खोटले येथून स्वामी भक्तांसह आलेल्या श्री स्वामी समर्थ मंदिराच्या पालखी सोहळ्याचे स्वागत श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन, नगरसेवक महेश इंगळे यांनी स्वागत केले.

टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि श्री स्वामी समर्थच्या जयघोषात पालखीचे वटवृक्ष मंदिरात आगमन झाल्यानंतर पालखीसोबत आलेल्या स्वामी भक्तांच्या उपस्थितीत मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या अधिपत्याखाली स्वामी दरबारात विशेष पूजा आणि आरती झाली. पालखी सोहळ्याचे आयोजन गणेश घाडीगावकर यांनी केले होते. यावेळी खोटले येथील श्री स्वामी समर्थ मंदिराचे मठाधिपती गणेश घाडीगावकर, समिती प्रमुख सल्लगार चंद्रकांत बंड, सचिव शैलेश सावंत, सदस्य नाना परब, उपाध्यक्ष विद्याधर गांवकर, कोशाध्यक्ष विठ्ठल परब, अलका विभुते यांचा मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी स्वामी कृपावस्त्र, प्रसाद देऊन सत्कार केला. यावेळी मंदिराचे चेअरमन महेश मालक इंगळे यांच्या हस्ते पालखी सोहळा संयोजक आणि स्वामी भक्तांना स्वामी प्रसाद देण्यात आला.

खोटले येथील स्वामीभक्तांनी स्वामी सेवेचा आनंद घेतला. अक्कलकोट येथील स्वामी दरबारात मिळालेल्या स्वागताबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी प्रथमेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, विपूल जाधव, श्रीकांत मलवे, महेश मस्कले आदींसह खोटले ग्रामस्थ तसेच मुंबई व कोकण येथील स्वामीभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



### महापौर विनायक कोंड्याल यांनी केले महाराणा प्रताप यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून -**
महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त सात रस्ता येथील महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी शहराध्यक्षा तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत, नगरसेवक श्रीनिवास दायमा, नगरसेवक शिवाजी वाघमोडे, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावंकर, उज्ज्वल दीक्षित, श्रीकांत डांगे, नलिनी चंदेले, दर्शन दुबे, गौरव पवार, नागेश चंदेले, जय साळुंखे, अमित पवार, विजयसिंह हजारे, आशिष परदेशी, अनुपसिंह बायस, पवनसिंह राजपूत, विजय पुकाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# बेला फौंडेशनच्या चित्रकला, बुद्धिबळ स्पर्धेचे बक्षीस वितरण



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि १७ जून -**
श्री स्वामी समर्थ राजेराय मठ, अक्कलकोट येथे बेला फौंडेशनच्या वतीने आयोजित छंद वर्गाचा समारोप तसेच चित्रकला व बुद्धिबळ स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

श्री स्वामी समर्थ राजेराय मठातील पादुका स्थापनेला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त तसेच सद्गुरू बेलानाथ महाराज यांच्या २३ व्या पुण्यतिथी सप्ताहाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी छंद वर्ग, चित्रकला स्पर्धा व बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन केले होते. उपक्रमांना विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनी आपली कला, कल्पकता, बौद्धिक क्षमता व सर्जनशीलता यांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मठाचे अध्यक्ष अॅड. शरद फुटाणे होते. व्यासपीठावर मठाचे उपाध्यक्ष विकास दोडके, सचिव डॉ. किसन झिपरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवर व विश्वस्तांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. पाहुण्यांचे स्वागत बेला फौंडेशनचे अध्यक्ष अॅड. श्रद्धांक झिपरे यांनी केले. चित्रकला, बुद्धिबळ स्पर्धा व छंद वर्गात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके, प्रमाणपत्रे व सन्मानचिन्हे देऊन गौरवले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे, मेहनतीचे व यशाचे कौतुक केले.

सचिव डॉ. किसन झिपरे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे, मेहनतीचे व स्पर्धेतील यशाचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातही सहभाग घेऊन व्यक्तिमत्त्व विकसित करावे, असे सांगितले. छंद वर्गातील विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य, नाटक व विविध सांस्कृतिक कार्यक्रम समारंभाचे विशेष आकर्षण ठरले. सादरीकरणासाठी अतुल जाधव यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल जाधव यांनी केले. आभार प्रदर्शन पुष्पा जाधव यांनी केले. कार्यक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवर, पालक, विद्यार्थी, सेवेकरी व कार्यकर्त्यांचे त्यांनी आभार व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी बेला फौंडेशनच्या नामीत झिपरे, धनंजय गायकवाड, पुष्पा जाधव, अमृता पोतदार, जनक झिपरे, रतिकांत पाटील, जयसिंग बर्वे, आनंद पाटील, अमरीश तसेच कुंभार यांनी विशेष परिश्रम घेतले. याचबरोबर श्री स्वामी समर्थ राजेराय मठातील सर्व सेवेकरी व विद्यार्थ्यांनीही मोलाचे सहकार्य केले.

### सांगोला विद्यामंदिर येथे तीन प्रशासकीय नियुक्त्या

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१७ जून-**
सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजमध्ये सेवानिवृत्तीमुळे रिक्त असलेल्या प्रशासकीय पदांवर उपमुख्याध्यापकपदी प्रदीप धुकटे, उपप्राचार्यपदी प्रा.शिवशंकर तटाळे आणि पर्यवेक्षकपदी शुभांगी घोंगडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. या नवनियुक्त बद्दल संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्या शीलाकाकी झपके, विश्वेश झपके, प्राचार्य चारूदत्त जगताप, पर्यवेक्षक उत्तम सरगर, काकासो नरूटे यांनी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जि.प. शाळेत प्रवेशासाठी भरतायेत घरपट्टी

## मांगीच्या सुजित बागल यांचा जि.प.शाळांची पटसंख्या वाढवण्यासाठी उपक्रम

### - २० पालकांनी घेतला पाल्यांचा जि. प. शाळेत प्रवेश



**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.१७ जून-**
करमाळा तालुक्यातील मांगी या गावातील ग्रामपंचायत सदस्य सुजित बागल हे गेल्या अनेक वर्षांपासून विविध उपक्रम राबवत आहेत. गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत पटसंख्या वाढावी, यासाठी त्यांच्याकडून खाजगी शाळांतून जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेणाऱ्या पाल्यांच्या पालकांची घरपट्टी ते भरतात. गेल्यावर्षी त्यांच्या या उपक्रमाला प्रतिसाद देत २० पालकांनी त्यांच्या पाल्यांना मांगी जिल्हा परिषद शाळेत घातले आहे.

वर्षभरापासून पटसंख्या कमी असल्यामुळे डबघाईला आलेल्या जिल्हा परिषद शाळांसाठी बागल कार्य करत आहेत. गेल्या वर्षी मांगी जिल्हा परिषद शाळेमधील जे पालक मांगी जिल्हा परिषद शाळेमध्ये आपल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश करतील अशा पालकांची घरपट्टी सुजित बागल यांनी भरलेली आहे. गेल्या वर्षी त्यांनी ग्रामस्थांसह मांगी पंचक्रोशीतील पालकांना आपल्या पाल्यांना जिल्हा परिषद शाळेत पाठवण्याचे आवाहन केले होते.

याही वर्षी मांगी जिल्हा परिषद शाळेत जवळपास १८ पालकांनी आपले पाल्यांचा प्रवेश घेतला आहे. याही वर्षी १८ पालकांची घरपट्टी सुजित बागल हे स्वतः ग्रामपंचायतीमध्ये भरणार आहेत. सुजित बागल यांनी अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात स्वतःला झोकून दिलेले आहे. मांगीसह तालुक्यातील गावा-गावांमध्ये सामाजिक उपक्रम राबवण्यात त्यांचे मोलाचे योगदान असते. मागील दोन-तीन वर्षांपासून पर्यावरणपूरक वृक्ष लागवडीतून हजारो झाडे बागल यांच्या माध्यमातून विविध ठिकाणी लावली आहेत.

आगामी काळात मांगीसह परिसरात किमान ५ हजार झाडे लावून जोपासण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे.

यावेळी मांगी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत वीर, वैशाली शेटे, सुनिता काळे, आशा देमुंडे तसेच निखील बागल, आण्णासाहेब बागल व सुजित बागल उपस्थित होते.

> गेल्या काही वर्षापासून विद्यार्थी पटसंख्येच्या कारणास्तव बंद पडत असणाऱ्या जिल्हा परिषद शाळा बंद पडू नये यासाठी मी इथून पुढेही तन-मन-धनाने काम करणार आहे. गांव-खेड्यातील पालकांनी जिल्हा परिषद शाळेतच आपल्या पाल्यांचे प्रवेश घ्यावेत.
> **सुजित बागल,** ग्रामपंचायत सदस्य, मांगी.

### रिक्षा चालकाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि. १७ जून-**
अज्ञात कारणावरून एका ४० वर्षीय रिक्षा चालकाने घरातील छताच्या लाकडीवाशाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोरेगाव परिसरातील पंचवटी नगरात बुधवारी दुपारी साडेबारा वाजता उघडकीस आली. शिवशंकर अंबादास देशमुख (वय ४० वर्ष, रा. प्लॉट नंबर ५०, एस आर पी एफ कॅम्प मागे, पंचवटी नगर, सोरेगाव) असे त्या गळफास घेतलेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे. घरात कोणी नसताना शिवशंकर याने स्वतःला गळफास लावून घेतला. ही माहिती विजापूर नाका पोलिसांना समजली असता हवालदार व्हि. डी. गायकवाड यांनी घटनास्थळी पोहचून सदरचा मृतदेह इतरांच्या साह्याने खाली उतरून येथील शासकीय रुग्णालयात दुपारी तीन वाजता शव विच्छेदनासाठी दाखल केला. मयत शिवशंकर देशमुख च्या पश्चात आई वडील, पत्नी, दोन मुले, दोन मुली, असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पुनर्मूल्यांकनानंतर आद्या शिंदेला १०० टक्के गुण; जिल्ह्यात ठरली एकमेव विद्यार्थिनी

**टेंभुर्णी, दि. १७ जून :**

इयत्ता दहावीच्या परीक्षेत टेंभुर्णी येथील महात्मा फुले विद्यालयाची विद्यार्थिनी आद्या सिद्धेश्वर शिंदे हिने पुनर्मूल्यांकनानंतर तब्बल १०० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात १०० टक्के गुण मिळवणारी ती एकमेव विद्यार्थिनी ठरली आहे.

प्रारंभी जाहीर निकालात आद्याला ९९.४० टक्के गुण मिळाले होते. मात्र गणित आणि सम ाजशास्त्र या विषयांमध्ये अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याने तिने मंडळाकडे पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केला होता. बोर्डाने नियुक्त केलेल्या



समितीने उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करून योग्य उत्तरांना अतिरिक्त गुण देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आद्याला गणित विषयात १०० पैकी १०० गुण, समाजशास्त्र विषयात ४ गुणांची वाढ दिली. सुधारित गुणांमुळे तिचे एकूण गुण १०० टक्क्यांवर पोहोचले. आद्याच्या या यशामुळे महात्मा फुले विद्यालयाने दहावी बोर्ड परीक्षेत सलग पाचव्या वर्षी १०० टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची परंपरा कायम ठेवली आहे. यशामागे तिच्या पालकांचे प्रोत्साहन तसेच शाळेतील शिक्षक नारायण भानवसे, विजय यादव, शरद सातव, विनोद जाधव, गगन गोडसे, योगेश शिंदे, अनंत घळके, सचिन खडके आणि सोहम व्यवहारे यांचे मार्गदर्शन कामी केले. विशेष म्हणजे आद्याने कोचिंग क्लासचे मार्गदर्शन घेतले नव्हते. तिचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार अभिजीत पाटील, जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीत शिंदे, जि.प. महिला व बालकल्याण सभापती अमृता वाघे, संस्थेचे अध्यक्ष नारायण भानवसे, प्राचार्य विजय यादव तसेच मुख्याध्यापक शोएब बागवान यांनी अभिनंदन केले आहे.

## महत्त्वाचे...



### 'फॅबटेक'च्या तीन विद्यार्थ्यांची अदानी ग्रीन एनर्जी कंपनीत निवड

**सांगोला, दि. १७ जून-**

फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथील इलेक्ट्रिकल विभागातील शुभम वानखंडे, प्रथमेश जाधव आणि निलेश लोंढे या विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखतीद्वारे अदानी ग्रीन एनर्जी कंपनीत निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ.रविंद्र शेंडगे यांनी दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेच्या बळावर राष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपनीत स्थान मिळवून फॅबटेक महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षणाची साक्ष दिली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ.रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा.धनंजय शिवपुजे, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ.संपतकुमार बोडापटला यांनी अभिनंदन केले.



### बार्शी शहर पोलिसांकडून हरवलेल्या मुलीचा काही तासात शोध

**बार्शी, दि. १७ जून-**

बार्शी शहरातील मांगडे चाळ परिसरातील रुद्राक्षा बाबासाहेब म ांगडे (वय ४ वर्षे) ही चिमुकली आज सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान घरातील कोणालाही न सांगता घरातून निघून गेली होती. मुलगी दिसून न आल्याने तिचे वडील बाबासाहेब दगडू मांगडे यांनी बार्शी शहर पोलीस ठाणे येथे येऊन माहिती दिली व मुलीचा शोध घेण्याची विनंती केली. बार्शी शहर पोलिसांकडून शहर परिसरात शोध घेत असताना सदर मुलगी टिळक चौक, बार्शी येथे सुखरुप मिळून आली. त्यानंतर तिला पोलीस ठाण्यात आणून तिच्या आई-वडिलांच्या समक्ष विचारपूस करण्यात आली. यावेळी तिने खेळणे घेण्यासाठी घरातून आल्याचे सांगितले. त्यानंतर मुलगी सुरक्षित असल्याची खात्री करुन तिला तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात सुखरुप देण्यात आले. मुलगी काही तासातच सुखरुप मिळाल्याने परिसरातुन बार्शी शहर पोलीस ठाण्याचे आभार मानण्यात आले. ही कामगिरी पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली संगप्पा मुळे, राहुल बोंदर, संतोष जाधवर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# पाणीसाठा फक्त पिण्यासाठीच वापरा

## जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचे निर्देश

## मान्सून लांबणीच्या पार्श्वभुमीवर जिल्हा प्रशासन दक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ जून -**

अल-निनोच्या प्रभावामुळे मान्सून लांबणीवर जाण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासन दक्ष झाले आहे. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित बैठकीत प्रशासनातील प्रम ुख अधिकाऱ्यांना पाणी काटकसरीने वापरण्याच्या दृष्टिकोनातून नियोजनाचे निर्देश दिले. त्यात उपलब्ध पाणीसाठा केवळ पिण्याच्या पाण्यासाठी वापरा, पाण्याची गळती, गैरवापर आणि थेट जलाशयातून उपसा याबाबत तात्काळ कारवाईचे निर्देश दिले.

बैठकीत अल- निनो व टंचाईच्या अनुषंगाने आढावा जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी घेतला. यावेळी महसूल उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रवीण पाटील, अधिक्षक अभियंता उजनी धरण सकृत खांडेकर, कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद सपताळे, उपअभियंता सोलापूर महानगरपालिका एस. व्ही. एकबोटे, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग आर्यन पवार, कार्यकारी अभियंता भीमा विकास विभाग प्रशांत कडुसकर, कार्यकारी अभियंता उजनी धरण व्यवस्थापन सुचेता डुंबरे, कार्यकारी अभियंता भीमा पाटबंधारे विभाग पंढरपूर जी.एस.कथले, वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण डॉ.एम.जे. शेख, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन ए.एस. तांबे, महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने उपस्थित होते.

बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी जलसंपदा विभागाला लघु, मध्यम बंधारे व धरणांम धील उपलब्ध पाणीसाठ्याची माहिती सादर करून पाण्याचे नियोजन करावे. त्याचा आढावा पुढील बैठकीत सादर करण्याचा आदेश दिले. जिल्ह्यात ७ मध्यम, ५६ लघु आणि ९० उप जलप्रकल्प आहेत. यापैकी ७ मध्यम प्रकल्पांपैकी ६ प्रकल्पांमधील पाणी पिण्यासाठी वापरता येईल, अशी माहिती देण्यात आली. तसेच उजनी धरणात सध्या ५०.६१ टीएमसी इतका पाणीसाठा शिल्लक असल्याचे अधीक्षक अभियंता उजनी धरण सकृत खांडेकर यांनी सांगितले. पंढरपूर येथील पिराची कुरोली येथील पाणी पंढरपूरला घेण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांचा विरोध असल्याचे खांडेकर यांनी सांगितले. तसेच घाटणी बंधाऱ्यातील पाणी कोळेगाव बंधाऱ्यात सोडल्यास १५ जुलैपर्यंत पाणीपुरवठा होईल, अशी माहितीही दिली.

**चारा छावण्या आणि टँकर पाणीपुरवठा व्यवस्थापन**

टँकरची मागणी येईल, त्यादिवशी त्या गावात टँकरने पाणीपुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले. पशुसंवर्धन विभागाने चारा छावण्या उभारण्याची वेळ येणार नाही, असे नियोजन करून ते पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचनाही दिल्या.

**प्रांत अधिकाऱ्यांना सूक्ष्म नियोजन व तात्काळ तयारीचे निर्देश**

प्रांत अधिकाऱ्यांनी कार्यक्षेत्रात आढावा बैठका घेऊन पाण्याचे सूक्ष्म नियोजन करावे. तसेच आजच भरारी पथकासाठी विविध विभागांनी कर्मचाऱ्यांची माहिती तात्काळ द्यावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सुचित केले. बैठकीस दूरदृश्य प्रणालीवरून सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी व इतर अधिकारी उपस्थित होते.




### पाणी बचतीसाठी जनजागृती आणि दैनंदिन वापरावर निर्बंध

अल-निनोमुळे संभाव्य दुष्काळाचा धोका लक्षात घेऊन सर्व नगरपालिका, नगरपरिषद, महापालिका, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत यांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा. तसेच पाणीबचत आणि काटकसरीने पाण्याच्या वापराबाबत जनजागृती करण्यास सांगण्यात आले. ग्रामपंचायत स्तरावर जिल्हा परिषदेचे सी.ई. ओ. बी.डी.ओ यांनी सूचना द्याव्यात, असेही नमूद केले. शहरातील स्विमिंग पूल व वाहन धुण्याचे सेंटर तात्काळ बंद करण्याचे निर्देश दिले. शेतकऱ्यांनी ७५ ते १०० मिलिमीटर पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये, याबाबत तालुका कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना सांगण्याच्या सूचना दिल्या.

### शेतीपंपांच्या थेट जोडण्या बंद, भरारी पथकांची निर्मिती

उजनी जलाशयाच्या पाण्यासाठी शेतीपंपाच्या थेट जोडण्या बंद करण्याबाबत माहिती देण्यात आली. तहसीलदार, प्रांत अधिकारी, पोलिस विभाग, जलसंपदा अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत भरारी पथके तयार करण्यास सांगितले. ज्या ठिकाणी थेट जलाशयातून पाणी उपसा करून शेतीसाठी वापर होत असेल, अशा ठिकाणी कारवाई करून तो उपसा तात्काळ थांबवण्याचे निर्देश दिले.

### पाणी गळती थांबवण्यासाठी उपाययोजना

जलसंपदा विभागातील मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये पाण्याची गळती होत असल्यास ती तात्काळ थांबवण्यासाठी उपाययोजना करावी, अशा सूचना दिल्या. नगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत, महापालिका यांच्या पाईपलाईनम धून पाण्याची गळती होत असल्यास ती दुरुस्त करण्याचे निर्देशही दिले.

### कमी पाण्यावरची आणि आंतरपिके घ्या

शेतकऱ्यांनी ७५ ते १०० मि.मी. पाऊस होईपर्यंत पेरणी करू नये, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सांगितले. कमी पाण्यावर येणारी पिके आणि आंतरपिके घेऊन, मूग आणि उडीद वगळता इतर पिके घेण्याचा सल्लाही भोसले यांनी दिला.



## कर्जमाफीच्या जाचक अटी रद्द करा; युवासेना ठाकरे गटाकडून निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ जून-**

कर्जमाफीच्या जाचक अटी रद्द कराव्यात, पीकविमा रद्द केलेले ट्रिगर पुन्हा लागू करावे. राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीमध्ये अनेक जाचक अटी लावल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी कर्जमाफीपासून वंचित आहेत. सरकारने या अटी रद्द कराव्यात व शेतकऱ्यांचा सातबारा खऱ्या अर्थाने कोरा करावा ही म ागणी यावेळी करण्यात आली.

पीक कर्जाबरोबरच शेती अवजारांसाठी घेतलेले कर्ज, सिंचन सुविधांसाठी घेतलेले कर्ज, कुक्कुटपालन, इमूपालन, पॉलिहाऊस शेतकऱ्यांचे कर्ज इत्यादी शेती कर्जांचा समावेशही कर्जमाफीच्या योजनेत करावा. सोनेतारण व मायक्रोफायनान्स कर्जही माफ करावे अशा मागण्या यावेळी युवासेना ठाकरे गट बार्शी यांच्यावतीने करण्यात आल्या आहेत. तसेच पिक विम्याचे वगळलेले ट्रिगर पुन्हा लागू करा, याबाबतचे मागण्यांचे निवेदन देण्यात आले मागण्यावर दखल न घेतल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे. यावेळी युवासेना उपतालुका प्रमुख स्वराज क्षीरसागर, युवासेना जिल्हा सचिव दिपक तिवाडी, युवासेना शहर सहसचिव अर्जुन सोनवणे, युवासेना समन्वयक पांडुरंग घोलप, युवासैनिक दिपक चुंगे, अभिषेक मडके, आनंद उकरंडे, राहुल बुरसे, महेंद्र गरड यांच्या सह युवासैनिक उपस्थित होते.

## खासदारांच्या पक्षांतरावरून शिवसैनिक संतप्त

### भाजप-शिंदे गटावर लोकशाही खच्चीकरणाचा आरोप

### विश्वासघाताचा हिशोब जनता घेईल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून -**

महाराष्ट्रातील शिवसेनेच्या काही खासदारांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत स्वतंत्र भूमिका स्वीकारल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये व शिवसैनिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. सोलापूर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत भाजप आणि शिंदे गटावर लोकशाहीची गळचेपी, विरोधकांना संपविण्याचे राजकारण आणि सत्तेचा गैरवापर केल्याचा आरोप केला आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे माजी जिल्हाप्रमुख प्रा. अजय दासरी यांनी शिवसेना ही निष्ठा, त्याग आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर उभी असलेली संघटना आहे. पक्षाच्या चिन्हावर, पक्षाच्या तिकिटावर आणि शिवसैनिकांच्या अथक परिश्रमावर निवडून आलेल्या काही खासदारांनी पक्षाशी द्रोहाचा मार्ग स्वीकारला असेल, तर तो मतदारांशी आणि शिवसैनिकांशी विश्वासघात आहे. नैतिकतेची जाणीव असेल तर अशा खासदारांनी प्रथम खासदारकीचा राजीनामा द्यावा. शिवसेनेच्या नावावर मते मिळवून नंतर वैयक्तिक स्वार्थासाठी पक्षांतर करणे ही जनतेची फसवणूक आहे. महाराष्ट्रातील जागरूक मतदार आणि निष्ठावंत शिवसैनिक हा प्रकार कधीही विसरणार नाहीत, अशी प्रतिक्रिया दिली आहे.

जिल्हाप्रमुख शरणराज केंगनाळकर यांनीही भाजप आणि शिंदे गटावर जोरदार टीका केली. देशात लोकशाही कमकुवत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. साम, दाम, दंड, भेद या नीतीचा वापर करून विरोधी पक्षांतील लोकप्रतिनिधींना फोडत आहेत, असा आरोप त्यांनी केला. एका पक्षाच्या विचारांवर निवडून आलेल्या प्रतिनिधींनी नंतर वेगळी भूमिका घेणे हे मतदारांच्या विश्वासाला तडा देणारे आहे. जनतेत निर्माण होत असलेली नाराजी भविष्यात मोठ्या राजकीय उद्रेकाचे रूप धारण करू शकते, असा इशाराही त्यांनी दिला आहे. यापूर्वीही काही आमदारांनी पक्ष सोडला होता, मात्र शिवसेना अधिक बळकटपणे उभी राहिली. काही व्यक्ती पक्ष सोडून जाऊ शकतात, पण विचारधारा, जनाधार आणि लाखो शिवसैनिकांची निष्ठा कुणीही घेऊन जाऊ शकत नाही. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली संघटनबांधणी अधिक जोमाने केली जाईल आणि या विश्वासघाताचा हिशोब जनतेच्या न्यायालयात मागितला जाईल, असा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. एकुणच या घडामोडींमुळे राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. कार्यकर्त्यांमध्ये संताप आणि संघटनात्मक हालचालींना वेग आला आहे.






## विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला योग्य मार्गदर्शन मिळाल्यास समाजाची प्रगती

### अविनाश भारती यांचे प्रतिपादन

### आवताडे प्रतिष्ठनतर्फे गुणवंतांचा गुणगौरव

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ जून -**

विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला योग्य मार्गदर्शनाची जोड मि ळाली की समाजाच्या प्रगतीचा मार्ग सुकर होतो असे प्रतिपादन व्याख्याते अविनाश भारती यांनी केले.

कै. महादेवराव बाबुराव आवताडे प्रतिष्ठानतर्फे इयत्ता दहावी व बारावीमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. यावेळी ते बोलत होते. आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते श्रीराम मंगल कार्यालय पंढरपूर येथे त्याचबरोबर जोगेश्वरी मंगल कार्यालय, मंगळवेढा येथे अशा दोन ठिकाणी मिळून ६२५ गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरवले. आ. आवताडे यांनी सांगितले की, आजच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षम ता असून योग्य दिशा, सातत्यपूर्ण मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर ते भविष्यात मोठे यश संपादन करू शकतात.

कार्यक्रमासाठी युटोपियन शुगरचे चेअरमन उमेश परिचारक, बार्शीचे विजय राऊत, माजी नगराध्यक्ष प्रकाश गायकवाड, उपनगराध्यक्ष प्रा. येताळा भगत, पंढरपूर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, म ाजी उपसभापती विजयसिंह देशम ुख, नगरसेवक किरण घाडगे, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर, रमेश भांजे, उद्योजक हणमंत दुधाळ, उद्योजक जनार्दन शिवशरण, यशोदा पतसंस्थेचे चेअरमन नीला आटकळे, पंढरपूर पंचायत समितीचे सभापती डॉ. शुभम आगावणे, मंगळवेढा पंचायत सभापती दिपाली ताड, उपसभापती अर्जुन मल्लाळे, प्रतिष्ठानचे सचिव सरोज काझी, कार्याध्यक्ष आझाद दारूवाले, संचालक दादासाहेब ओमणे, संचालक संजय माळी, त्याचबरोबर कै.महादेवराव बाबुराव अवताडे प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ, नगरपरिषद, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आदींचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

# आरोग्यसेवक पदांच्या २५ टक्के पदोन्नतीचा नियम कागदावरच

## सोलापुरातील ९९ पात्र कर्मचारी प्रतीक्षेत

## डिसेंबर २०२५ मध्ये सेवाप्रवेश नियमांत सुधारणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ जून-**

महाराष्ट्र शासनाने डिसेंबर २०२५ मध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करून आरोग्य सेवक (पुरुष) पदासाठी पदोन्नतीची नवी संधी उपलब्ध करून दिली आहे. या सुधारणेमुळे जिल्हा परिषद सेवेत कार्यरत गट-ड (परिचर) कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवक (पुरुष) पदावर पदोन्नतीचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र सोलापूर जिल्हा परिषदेकडून अद्याप या संदर्भातील पदोन्नती प्रक्रिया सुरू न केल्याने पात्र कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे.

ग्रामविकास विभागाने १७ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार गट-ड (परिचर) पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेले कर्मचारी आरोग्य सेवक (पुरुष) पदासाठी पदोन्नतीस पात्र ठरणार आहेत. यासाठी विज्ञान विषयासह उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक करण्यात आले आहे. तसेच नियम लागू होण्यापूर्वी सेवेत असलेल्या आणि तीन वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या दहावी उत्तीर्ण परिचर कर्मचाऱ्यांनाही विशेष तरतुदीअंतर्गत पुढील पाच वर्षांपर्यंत पदोन्नतीची संधी देण्यात आली आहे.

सुधारित नियमांनुसार आरोग्य सेवक (पुरुष) पदावरील २५ टक्के पदे पदोन्नतीने आणि ७५ टक्के पदे थेट भरतीद्वारे भरण्याची तरतूद करण्यात आली आहे. पदोन्नती मि ळाल्यानंतर कर्मचाऱ्यांना बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करणे बंधनकारक राहणार आहे. मात्र शासनाच्या या निर्णयानंतरही सोलापूर जिल्हा परिषद प्रशासनाने पदोन्नतीसाठी पात्र कर्मचाऱ्यांची यादी तयार करणे, रिक्त पदांचा आढावा घेणे, विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेणे किंवा पात्र कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागविणे यांसारखी कोणतीही प्रशासकीय प्रक्रिया अद्याप सुरू केलेली नसल्याची माहिती समोर आली आहे.

यामुळे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील तब्बल ९९ पात्र परिचर कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवक (पुरुष) पदाची नियुक्ती मिळण्याची प्रतीक्षा कायम आहे. शासनाने स्पष्ट नियमावली जाहीर करून सहा महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही स्थानिक पातळीवर अंमलबजावणी होत नसल्याने संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



### पदोन्नतीची प्रक्रिया रखडल्याने आर्थिक व सेवाविषयक नुकसान

आरोग्य विभागातील कर्मचारी संघटनांच्या मते, ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतला असला तरी जिल्हा परिषद स्तरावरील विलंबामुळे त्याचा अपेक्षित लाभ कर्मचाऱ्यांना आणि आरोग्य यंत्रणेला मिळत नाही. अनेक कर्मचाऱ्यांनी आवश्यक शैक्षणिक पात्रता व सेवेची अट पूर्ण केली असूनही पदोन्नतीची प्रक्रिया रखडल्याने त्यांचे आर्थिक व सेवाविषयक नुकसान होत असल्याचे सांगितले जात आहे.

### प्राथमिक आरोग्य यंत्रणेला मोठा दिलासा

सोलापूर जिल्हा परिषद प्रशासनाने शासनाच्या सुधारित नियमांनुसार पदोन्नती प्रक्रिया तातडीने सुरू करून रिक्त पदे भरण्याची मागणी संबंधित कर्मचारी व संघटनांकडून करण्यात येत आहे. ग्रामीण आरोग्य सेवेतील मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता आरोग्य सेवक (पुरुष) पदांची नियुक्ती लवकरात लवकर झाल्यास प्राथमिक आरोग्य यंत्रणेला मोठा दिलासा मिळू शकतो, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.